CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
आसमंतसह
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | रविवार, ३१ मे २०२६ । वर्ष ४ थे अंक ८३ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघाची विविध क्षेत्रे एकमेकांपासून भिन्न आहेत. या प्रत्येक क्षेत्राच्या जन्माचे, उत्पत्तीचे कारण, हेतू वेगवेगळा आहे. प्रत्येकाची घटना, कार्यपद्धती वेगवेगळी आहे. परंतु या सर्वांचे विचारविश्व एक आहे.

**स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# गरज भासल्यास 'ऑपरेशन सिंदूर २.०'

## लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचा सज्जड इशारा

◆ **पुणे, ३० मे**

भारत आता 'ऑपरेशन सिंदूर २.०'ची तयारी करीत आहे. पहलगामवर झालेल्या दशतवादी हल्ल्यानंतर विरोधी देशाला कशाप्रकारे उत्तर देता येईल याबाबत आम्ही तयारी करीत आहोत. 'ऑपरेशन सिंदूर बंद' झाले, असे कोणी समजू नये असा सज्जड इशारा लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शनिवारी दिला.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या खडकवासला येथील क्षेत्रपाल मैदानावर १५० व्या तुकडीचा दीक्षान्त संचालन समारंभ जल्लोषात पार पडला. यावेळी एकूण ३५३ कॅडेटस्नी तीन वर्षांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करीत दीक्षान्त संचालनात सहभागी झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लष्कर प्रमुख उपेंद्र द्विवेदी बोलत होते. याप्रसंगी लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल संदीप जैन, एनडीएचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी, डेप्युटी कमांडंट एअर व्हाइस मार्शल राजेश वर्मा उपस्थित होते.

जनरल द्विवेदी म्हणाले की, ४२ वर्षांपूर्वी मी एनडीएमधून प्रशिक्षण पूर्ण केले आणि आज या ठिकाणी दिक्षान्त समारंभाचा प्रमुख पाहुणा आहे. ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. तुमच्यापैकीच एक कॅडेट भविष्यात माझ्या पदावर येणार आहे. त्यासाठी तुम्हाला खूप मेहनत घ्यावी लागेल, कर्तव्यकठोर रहावे लागणार आहे. यंदा पहिल्यांदाच एनडीएमध्ये १२ मित्रदेशांतील २४ कॅडेट्सचा सहाभाग होता, त्यांनीही हे प्रशिक्षण पूर्ण केले. इतर देशांशी मैत्रिपूर्ण संबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. मात्र, जे देश आपल्यावर हल्ला करतात त्यांना आपण खंबीरपणे प्रत्युत्तर देतोच, त्याचे प्रतीक म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' आहे. कॅडेटने कौशल्य, सामर्थ्य, अनुकूलन क्षमता आणि सर्वांगीण दृष्टिकोन आदी गुण बाळगणे आवश्यक आहे. महिला कॅडेटस्? देखील एनडीएचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करीत असून, त्यांना पुरुष कॅडेटस्? इतकाच समान दर्जा आहे. युद्ध क्षेत्रात महिला आता नेतृत्व करण्यात मागे नाहीत, ही आपल्या दृष्टीने अभिमानाची आणि कौतुकाची बाब आहे, असे जनरल द्विवेदी यांनी सांगितले.

प्रारंभी जनरल द्विवेदी यांनी संचलनाची पाहणी केली आणि विविध पथकांची मानवंदना स्वीकारली. यावेळी तीन चेतक हेलिकॉप्टर्स, सुपर डिमेनो विमान आणि सुखोई विमानांनी संचलन मैदानावरून उड्डाण करत मानवंदना दिली. ◀(तभा वृत्तसेवा)



एनडीएच्या विद्यार्थ्यांकडून मानवंदना स्वीकारताना लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी

### मयांक चौधरीने केले नेतृत्व

कॅडेट मयांक चौधरी याने यावर्षी संचालनाचे नेतृत्व केले. संचलनात एकूण १२५० कॅडेट्स सहभागी झाले होते. कॅडेट रोहित काजला यास सुवर्णपदक, कॅडेट पीयूष रौतला यास रौप्यपदक तर कॅडेट साहिल शर्माला कांस्यपदक मिळाले. 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ बॅनर' हा मानाचा पुरस्कार चार्ली स्क्वाड्रनला मिळाला. ■

### यंदाच्या तुकडीत १८ मुलींचा सहभाग

**एनडीएमधील या तुकडीतून ३५३ कॅडेट्सने एनडीएचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यामध्ये २९२ जण लष्करात, ४३ जण नौदलात तर ८१ जण वायुदलामध्ये पुढील एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना होणार आहेत. यात १८ मुली भारतीय सैन्यदलात अधिकारी पदी दाखल झाल्या.** ■

# स्मार्ट शहरांबरोबर स्मार्ट गावांचीही गरज

### नितीन गडकरी यांचे प्रतिपादन | देश सामर्थ्यशाली बनण्याची गरज




◆ **पुणे, ३० मे**

देशाला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यशाली बनवायचे असेल, तर ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्राचा विकास वाढवणे ही महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे स्मार्ट शहरांबरोबर स्मार्ट गावे आणि सिंचनाला सर्वोतच्च प्राधान्य देण्याची नितांत गरज आहे, अशी भूमिका केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी येथे मांडली.

वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनकडून (विस्मा)'साखर आणि जैवऊर्जा' परिषदेला संबोधताना त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार बजरंग सोनवणे, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, महासचिव पांडुरंग राऊत, व्हीएसआयचे महासंचालक संभाजी कडू पाटील आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, भारताचे अर्थकारण कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. १९४७ पासून आजपर्यंत जेवढा विकास आणि प्रगती या क्षेत्रात होणे अपेक्षित होती, तेवढी झालेली नसून, त्यासाठी आणखी प्रयत्नांची आवश्यकता आहे. कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये इतर क्षेत्राच्या तुलनेत कमी प्रगती झाली. परिणामी गावांमधून शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर वाढले आहे.

शेतकऱ्यांनी देखील या गोष्टीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक खतांऐवजी सेंद्रिय खतांवर अवलंबून उत्पादन घेणे आवश्यक आहे. अधिक उत्पादनापेक्षा पूरक आणि उत्कृष्ट प्रतीचे उत्पादन घ्यावे; तरच उच्च प्रतीची उत्पादन निर्मिती होईल. देश परदेशात मागणी वाढेल. निर्यात धोरणाला चालना मिळून राष्ट्रवादाला चालना मिळेल. कारखान्यांनी इथेनॉल आणि बायो इंधन निर्मितीकडे जास्तीजास्त वळावे. साखरेवर अवलंबून न राहता उपपदार्थ करण्यावर भर देणे महत्वाचे ठरेल, असे गडकरी यांनी नमूद केले.

बागडे म्हणाले,ऊसाचे क्षेत्र वाढविण्यापेक्षा एकरी उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. यंदा कारखान्यांची क्षमता वाढल्याने गाळप हंगाम लवकर संपला. परिणामी साखरेचा उतारा कमी झाला. साखर कारखाने नोव्हेंबरमध्ये सुरू केले पाहिजेत, तरच उतारा मिळेल. बाबासाहेब पाटील म्हणाले,साखर उद्योगामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. अनेक कारखान्यांनी गरज नसताना क्षमता वाढ केली, त्याचा फटका बसला. देशाची व्यवस्थाच कृषीवर आहे. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बी. बी. ठोंबरे यांनी प्रास्ताविक केले तर खजिनदार महेश देशमुख यांनी आभार मानले.◀(तभा वृत्तसेवा)

### विनम्र अभिवादन



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आज तारखेप्रमाणे जयंती

### महत्त्वाचे

**आयपीएल अंतिम सामन्याचा थरार आज**




**अहमदाबाद** : येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि माजी विजेता गुजरात टायटन्स यांच्यादरम्यान १९ व्या इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा 'हायव्होल्टेज' अंतिम सामना खेळला जाणार आहे. रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील बंगळुरू जेतेपद कायम राखण्यास, तर शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स दुसऱ्यांदा आयपीएल जिंकण्यास उत्सुक असेल, त्यामुळे ही अंतिम लढत चुरशीची होणार आहे. बंगळुरूविरुद्धच्या क्वालिफायर १ मधील पराभवानंतर शुभमन गिलचा गुजरात टायटन्स संघ बदला घेण्यासाठी सज्ज आहे. ■

# दिल्लीवरील दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

## आयएसआयसह समर्थित नऊ अतिरेक्यांना अटक

◆ **नवी दिल्ली, ३० मे**

दिल्ली पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करीत राष्ट्रीय राजधानीत भीषण दहशतवादी हल्ले घडवण्याचा कट उधळला. पाकिस्तानची पाताळयंत्री गुप्तचर संस्था आयएसआयच्या आदेशावरून हल्ल्याचा कट रचणाऱ्या मुंबई अंडरवर्ल्डशी संबंधित नऊ दहशतवाद्यांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या. त्यांना दिल्लीतील महत्त्वाच्या आस्थापना आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यास सांगण्यात आले होते.

अटक केलेले दहशतवादी पाकिस्तानी सूत्रधारांच्या संपर्कात होते तसेच आयएसआयच्या इशाऱ्यावर ते हल्ला घडवण्याचा कट रचत होते, अशी माहिती दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने दिली. त्यांना दिल्लीतील संवेदनशील भागांमध्ये हल्ले करण्याचे काम सोपवण्यात आले होते. सुरक्षा कर्मचाऱ्यांवरही हल्ला करण्याची त्यांची योजना होती. त्यांच्या ताब्यातून अनेक घातक शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. हे नेटवर्क देशातील महत्त्वाच्या आस्थापनांना लक्ष्य करण्याचा कट रचत होते. संभाव्य लक्ष्यांमध्ये वीजप्रकल्प आणि वितरण केंद्रे, विमानतळे, रेल्वे स्थानके आणि इतर सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या संस्थांचा समावेश होता. सुरक्षा कर्मचाऱ्यांनाही लक्ष्य केले जाणार होते.

◀(वृत्तसंस्था)

### दिल्ली, मुंबई, राजस्थान, पंजाबमध्ये कारवाई

तपास यंत्रणांनुसार दहशतवाद्यांना दिल्ली, मुंबई, राजस्थान आणि पंजाबमधून अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून अत्याधुनिक परदेशी शस्त्रे, ग्रेनेड आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेली स्फोटके तस्करीच्या माध्यमातून सीमेपलीकडून भारतात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. ■

### दाऊद-शहजाद भट्टी कटाचे सूत्रधार

या नेटवर्कमधील एक गट पळपुटा गुंड दाऊद इब्राहिमच्या इशाऱ्यावर कार्यरत होता. दुसरा गट पाकिस्तानातील शस्त्रास्त्र तस्कर शहजाद भट्टीच्या नेतृत्वात कटकारस्थान आखत होता. या संपूर्ण कटाचा सूत्रधार आयएसआय असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली. ■

### आंतरराष्ट्रीय संबंधांची सखोल चौकशी

स्पेशल सेलचे वरिष्ठ अधिकारी या नेटवर्कचा निधीपुरवठा, शस्त्रपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय संबंधांची सखोल चौकशी करीत आहेत. या नेटवर्कचे इतर सदस्य देशाच्या विविध भागांमध्ये सक्रिय आहेत का, याचाही तपास यंत्रणा करीत आहेत. ■

## सोनारपूरमध्ये अभिषेक बॅनर्जींना मारहाण

◆ **कोलकाता, ३० मे**

पश्चिम बंगालच्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सोनारपूरमध्ये तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्यावर स्थानिक लोकांनी हल्ला केला. त्यांच्यावर दगड, अंडी आणि चपला फेकत धक्काबुकी व मारहाण करण्याचा प्रयत्न झाला. यात अभिषेक यांचे शर्टही फाडण्यात आले. अखेर त्यांना हेल्मेट घालून त्या भागातून बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे बंगालचे राजकारण चांगलेच तापले आहे.

निवडणुकीनंतरच्या हिंसाचारात ठार झालेल्या पक्षाच्या एका कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी अभिषेक बॅनर्जी शनिवारी त्यांच्या घरी गेले होते. यादरम्यान, काही अज्ञात लोकांनी अभिषेक यांच्यावर दगड, चपला आणि अंडी फेकली. तसेच त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करण्याचा प्रयत्न करीत चोर-चोर अशी घोषणाबाजी केली.




# बनावट नोटा चलनात आणणारी टोळी जाळ्यात



पोलिसांनी जप्त केलेल्या बनावट नोटा

### सात आरोपी अटकेत

◆ **मालेगाव, ३० मे**

मालेगाव पोलिसांनी बनावट नोटा चलनात आणणाऱ्या टोळीविरुद्ध कारवाई करीत सात आरोपींना अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून २३ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या.

२९ मे रोजी सायंकाळी अमानी येथील विकास गवळी यांच्या पेट्रोल पंपावर इनोव्हा कार डिझेल भरण्यासाठी आली होती. कारमधील लोकांनी २ हजार रुपयांचे डिझेल भरले. पंप कर्मचाऱ्याला १ हजार रुपयांच्या खऱ्या नोटा आणि ५०० रुपयांच्या दोन बनावट नोटा देण्यात आल्या.

या नोटांवर भारतीय बच्चों का बँक, चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया असे लिहिलेले होते. नोटांबाबत संशय आल्याने पंप कर्मचाऱ्याने वाहन थांबवण्यास सांगितले व याची माहिती पंप मालक विकास गवळी यांना दिली.

त्यानंतर पोलिसांना कळविण्यात आले. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता कारमधून ५०० रुपयांच्या ४,७०० बनावट नोटा आढळून आल्या. पोलिसांनी कारमधील सात जणांना ताब्यात घेऊन वाहनासह मालेगाव पोलिस ठाण्यात आणले आणि गुन्हा दाखल केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.◀(तभा वृत्तसेवा)

## आर्थिक वर्षात जीडीपी राहणार ७.३ टक्के

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील संघर्षाुळे विस्कळीत झालेला व्यापार, कच्च्या तेलाच्या भावात झालेली वाढीतही आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा दर (जीडीपी) ७.३ टक्के राहणार असल्याचा अंदाज भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) वर्तवला आहे. ही वाढ मागील वर्षातील ७.१ टक्क्यांच्या तुलनेत अधिक आहे. उपभोग खर्च आणि स्थिर गुंतवणूक यामुळे जीडीपीत वाढ होण्याची शक्यता आहे.

**NEET/JEE Foundation**
**शाळेतच संपूर्ण तयारी**

- फक्त ८वी, ९वी (७५% पेक्षा जास्त गुण)
- गुणवत्ताधारक विद्यार्थी मर्यादित प्रवेश
- कॉलेजचे अनुभवी प्राध्यापक व स्वतःचे छापील स्टडी मटेरिअल

**सुयश विद्यालय (अनिवासी)**
१६५-अ, रेल्वे लाईन्स, सोलापूर

**सुयश गुरुकुल/सेंट्रल स्कूल (निवासी / अनिवासी)**
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.

**सुयश गुरूकुल ज्युनिअर कॉलेज**

- इयत्ता अकरावी/ बारावी super 20/20
- मर्यादित प्रवेश (८५% पेक्षा जास्त गुण)
- State Board/CBSE Board
- विद्यादान योजना संपूर्ण शिक्षण निशुःल्क (हुशार व गरीब विद्यार्थ्यांना)
- 90% पेक्षा अधिक मार्क असणाऱ्या विद्यार्थ्याना २५-५०% स्कॉलरशिप

संपर्क - **सुयश गुरूकुल**
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर
मोबा.७६२०७०९२३७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पाण्यासाठी पाकिस्तानच्या 'दश दिशा'

## भारताच्या दणक्याचा परिणाम ● सिंधू जलकरार स्थगितीमुळे ७० टक्के भागांत वणवण

### कराचीत भीषण परिस्थिती ● अनेक भागांत दुष्काळी संकट

**इस्लामाबाद, ३० मे**

जम्मू-काश्मीरातील पहलगाम येथे एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जलकरार स्थगित करीत सीमापार जाणारे पाणी रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा परिणाम आता पाकिस्तानच्या अंगलट येत आहे. पाकिस्तानच्या ७० टक्के भागात भीषण पाणीटंचाई असून, नागरिकांना पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले आहे.

आर्थिक राजधानी कराची शहरात कराची भीषण पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या कडाक्यात शहरातील बहुतांश भागांत पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. पाणी संकटामुळे कराचीसह देशातील विविध भागांत शुक्रवारपासून सरकारविरोधात नागरिकांचे आंदोलन सुरू आहे.

शनिवारी कराची शहरात पीटीआय पक्षाच्या नेतृत्वातील आंदोलनात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले. सरकाच्या धोरणामुळे देशात जलसंकटाची परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला. भारतातून वाहणाऱ्या नद्यांतील पाण्याचा प्रवाह कमी झाला आहे, तर अनेक नद्या कोरड्या झाल्या आहेत. पर्यायाने पाकिस्तानच्या कृषी आणि अर्थव्यवस्थेवर दबाव वाढला आहे.



#### समस्या सोडवण्यात सरकार अपयशी

रहमान म्हणाले, पाकिस्तान पीपल्स पार्टीच्या नेतृत्वाखालील सरकार जवळपास दोन दशकांपासून सत्तेत असूनही कराचीच्या दीर्घकालीन पाणी समस्या सोडवण्यात अपयशी ठरल्या आहे. कराचीतील ७० टक्के लोकसंख्या ताहनेने व्याकुळ आहे. गुलिस्तान-ए-जौहर, गुलशन-ए-इकबाल, अझीझाबाद, लियाकतबाद, उत्तर नाझिमाबाद आणि उत्तर कराची या भागांमध्ये पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले आहे. भारताविरोधी धोरणामुळे देशावर ही परिस्थिती आली, असा आरोप त्यांनी केला.

#### शेतीसाठी मिळेना पाणी


सिंधू जलकरारानुसार, पाकिस्तानला सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांवर प्राथमिक हक्क मिळाला होता. या नद्यांतून मिळणाऱ्या पाण्यातून ८० टक्केपेक्षा जास्त सिंचन आणि विजेची गरज भागवली जाते. मात्र, भारताने करार स्थगित केल्याने पंजाब आणि सिंध प्रांतांत दुष्काळाची परिस्थिती आहे. नद्या कोरड्या असून, पिकांसाठी पाणी उपलब्ध होत नाही. भारताने नवीन साठवणूक आणि वीजप्रकल्प उभारले, तर पाकिस्तानच्या अडचणीत वाढ होईल.

#### भारताशी तडजोड करावी

हाफिज नईम यांनी सिंध सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट बोर्डवरही निशाणा साधताना म्हटले की, तब्बल ४३ अब्ज रुपयांचा निधी मिळूनही पाण्यासाठी नागरिकांना वणवण फिरावे लागत आहे. लोकांना पिण्यासाठी, आंघोळीसाठी, स्वच्छतेसाठी पाणी खरेदी करावे लागते. पाकिस्तानी सरकारने भारताशी तडजोड करून सिंधू जलकरारावर मार्ग काढावा. परिस्थिती अशीच राहिल्यास देशात दुष्काळाची परिस्थिती अधिक तीव्र होईल. दूषित पाणी प्यायल्याने अतिसार, कावीळ आणि इतर आजाराचा उद्रेक होत आहे.

कराचीसारख्या शहरांतील लोकांसाठी रोजचे पाणी मिळवणेही कठीण होत असल्याची माहिती जमात-ए-इस्लामीचे प्रमुख हाफीझ नईम-उर-रहमान यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

(वृत्तसंस्था)



हिमाचल प्रदेशातील शिमला येथे पावसानंतर टेकड्यांवर दाटून आलेल्या ढगांमुळे या परिसराचे सौंदर्य अधिकच खुलले

# मणिपुरात पाच बंडखोराना अटक

**इम्फाळ, ३० मे**

मणिपूरच्या इम्फाळ पश्चिम आणि पूर्व जिल्ह्यांमध्ये सुरक्षा दलांनी दोन प्रतिबंधित संघटनांशी संबंधित पाच बंडखोरांना अटक केली, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली.

प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या (पीएलए) दोन सक्रिय सदस्यांना, यात एका महिलेचाही समावेश आहे, गुरुवारी या दोन जिल्ह्यांतून अटक करण्यात आली. ते इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील दवाखाने आणि औषध दुकानांमधून खंडणी गोळा करीत होते, असे पोलिसांनी सांगितले. या संघटनेच्या आणखी एका सक्रिय कार्यकर्त्याला इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील संजेनबाम मानिंग लेकाई येथील त्याच्या निवासस्थानातून अटक करण्यात आली. प्रतिबंधित कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या (पीडब्ल्यूजी) दोन सक्रिय सदस्यांना बुधवारी त्यांच्या निवासस्थानातून अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

# ट्रॅक्टर-ट्रॉलीचा अपघात; सहा ठार, ४० जखमी

**भोपाळ, ३० मे**

मध्यप्रदेशातील अनुपपूर जिल्ह्यात भरधाव ट्रॅक्टर-ट्रॉली रस्त्याच्या कडेला उलटून झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला तर, ४० जण जखमी आहेत. करणपथर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बिजाउरा गावाजवळ शनिवारी हा अपघात झाला.

पद्मनियाहू येथील रहिवासी नागरिक बिजाउरा येथील मंदिरात ट्रॅक्टर-ट्रॉलीतून पूजेसाठी जात होते. बिजाउरा गावाजवळील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टर-ट्रॉली रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्यात उलटली. स्थानिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. अपघातग्रस्ताना तत्काळ पाली सामुदायिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले.

डॉक्टरांनी सहा जणांना मृत घोषित केले तर, इतर ४० जणांवर उपचार सुरू असल्याची माहिती अतिरिक्त पोलिस अधीक्षक जगन्नाथ मार्कम यांनी दिली.

मुख्यमंत्री मोहन यादव यांनी घटनेबद्दल शोक व्यक्त करताना म्हणाले की, बिजाउरा गावातील रस्ते अपघातातील अकाली मृत्यू आणि जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मंदिरात भाविकांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर-ट्रॉली उलटल्याने हा अपघात झाला. राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत देण्यात येईल.

(वृत्तसंस्था)

# भारत-कॅनडा व्यापारी संबंधांना नवी गती

## गुंतवणुकीला चालना देण्यासाठी विशेष व्यासपीठाची सुरुवात

**नवी दिल्ली, ३० मे**

भारत आणि कॅनडाने व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी एक नवीन व्यापार आणि गुंतवणूक व्यासपीठ सुरू केले आहे. दोन्ही देशांनी व्यावसायिक संपर्क, लोकांमधील संबंध आणि गुंतवणूक सहकार्य अधिक दृढ करण्यास सहमती दर्शवली.

भारत आणि कॅनडाने दोन्ही देशांतील व्यवसायांना एकत्र आणण्यासाठी आणि व्यावसायिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यापार आणि गुंतवणूक व्यासपीठ सुरू केले आहे. ही माहिती शुक्रवारी परराष्ट्र मंत्रालयाने संयुक्त निवेदनातून जारी केली. दोन्ही देशांनी



लोकांमधील संबंध, व्यावसायिक गतिशीलता आणि थेट व्यावसायिक संपर्क वाढविण्यासाठी सहमती दर्शवली आहे.

कॅनडा-भारत व्यापार आणि गुंतवणूक मंचाचा शुभारंभ केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते ओटावा येथे करण्यात आला. नवीन व्यावसायिक भागीदारी आणि व्यावसायिक संबंधांना चालना देण्यासाठी कॅनेडियन आणि भारतीय व्यावसायिक नेत्यांना एकत्र आणणारा एक प्रमुख मंच आहे. दोन्ही देशात होणारा मुक्त व्यापार करार बाजारपेठेतील प्रवेशाचा विस्तार करण्यासाठी, लवचिक पुरवठा साखळ्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि द्विपक्षीय आर्थिक वाढीस सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

(वृत्तसंस्था)

# इराणच्या हल्ल्यात अमेरिकेचे १२ सैनिक जखमी

**अत्याधुनिक रीपर ड्रोन नष्ट**

## कुवेतच्या लष्करी, हवाई तळावर क्षेपणास्त्रांचा मारा



**दोहा, ३० मे**

शांतता करारासाठी वाटाघाटी सुरू असताना अमेरिका-इराणचे परस्परावर हल्ले सुरू आहेत. शुक्रवारी अमेरिकेच्या वायुदलाने बंदर अब्बास शहरात केलेल्या भीषण हल्ल्याला प्रत्युत्तर देत इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशवरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) शनिवारी रात्री कुवेतमधील अमेरिकन लष्करी आणि हवाई तळावर क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा केला. यात १२ सैनिक जखमी झाले असून, पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले.

इराणच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत अमेरिकेने अत्यंत प्रगत आणि प्राणघातक रीपर ड्रोनचा मारा केला, आयआरजीसीने हे ड्रोन नष्ट केल्याचा दावा केला आहे. इराणच्या हल्ल्यात १२ सैनिक जखमी झाल्याच्या माहितीला अमेरिकेचा संरक्षण विभाग पेंटागॉनने दुजोरा दिला आहे. होर्मुझ जलमार्गात तैनात अमेरिकेच्या नौदलावर क्षेपणास्त्राचा मारा केल्याचे आयआरजीसीनी निवेदनात म्हटले आहे.

बंदर अब्बास शहरावर केलेल्या हल्ल्याचा सूड घेण्यात आला, अमेरिकेच्या प्रत्येक हल्ल्याला ताकदीने प्रत्युत्तर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. दुसरीकडे पेंटागॉनने म्हटले की, गेल्या २४ तासांत इराणने कुवेतच्या अली अल सालेम हवाई तळावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला केला. हवाई संरक्षण प्रणालीने इराणचे क्षेपणास्त्र (फतेह-११०) नष्ट केले. त्याचे अवशेष हवाई तळावर पडले, ज्यात अमेरिकन सैनिक जखमी झाले.

(वृत्तसंस्था)

#### समृद्ध युरेनियमवर तडजोड नाही

**इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी सांगितले की, अमेरिकेसोबत अद्याप कोणताही करार अंतिम झालेला नाही. दोन्ही बाजूंमध्ये संदेशांची देवाणघेवाण सुरू आहे. समृद्ध युरेनियमच्या तपशीलांवर आमची कोणतीही चर्चा झालेली नाही. युरेनियम संदर्भात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. होर्मुझ जलमार्गावरील नियंत्रण इराण आणि ओमानशी संबंधित आहे, त्यात अमेरिकेचा हस्तक्षेप अमान्य आहे.**

#### करारासाठीची बैठक निर्णयाशिवाय संपली

इराणने पाठविलेल्या शांतता कराराच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षतेत वाशिंग्टन येथे बैठक झाली. ट्रम्प यांचा प्रस्ताव स्वीकारण्यास नकार दिल्याने ही बैठक कोणत्याही अंतिम निर्णयाशिवाय संपली. इराणसोबत संघर्षविराम वाढवण्याच्या आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याच्या प्रस्तावित कराराबाबत ट्रम्प यांनी निर्णय घेतला नसल्याचे व्हाईट हाऊसने निवेदनात म्हटले आहे.

## चित्रपट वार्ता

### 'शक्तिशालिनी' चंबळच्या लोककथांवर आधारित

**मुंबई** : दरोडेखोर आणि रक्तरंजित संघर्षांच्या कथांसाठी चर्चेत असलेल्या चंबळमध्ये सध्या चित्रपटांचे चित्रीकरण सुरू आहे. मॅडॉक फिल्म्सने त्यांच्या आगामी 'शक्तिशालिनी चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी मुंबई आणि हैदराबादमधील स्टुडिओ सेट्सऐवजी चंबळच्या खऱ्या लोकेशनची निवड केली आहे. अभिनेता विशाल जेठवा या चित्रपटात पूर्णपणे नवीन आणि तीव्र अवतारात दिसणार आहेत. चित्रपटात अनीत पड्डा शालिनीच्या भूमिकेत दिसणार आहे. कथा एका सामान्य ग्रामीण मुलीपासून सुरू होते, तिचे आयुष्य रहस्यमय घटनांनंतर पूर्णपणे बदलते. हळूहळू तिला स्वतःतील वेगळ्या शक्तींचा अनुभव येतो. निर्मात्यांनी तिच्यात होणारे परिवर्तन दृश्यात्मकदृष्ट्या वेगळे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.




### तरडेंनी केली 'मुळशी पॅटर्न-२'ची घोषणा

**मुंबई** : प्रवीण तरडेंच्या 'देऊळ बंद-२'ची सर्वत्र चर्चा होत असतानाच त्यांनी आता 'मुळशी पॅटर्न' या चित्रपटाचा दुसरा भाग लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याची अधिकृत घोषणा केली. हा चित्रपट इतका खतरनाक असेल की, तुमच्या अंगावर काटा येईल, असे प्रवीण तरडे म्हणाले. 'मुळशी पॅटर्न-१' या चित्रपटातून शेती विकायची नसते, राखायची असते, असे सांगितले होते. 'मुळशी पार्ट-२' मधून, तुझ्या माझ्या घराचे स्वप्न महाग का झाले, याचे उत्तर मिळणार असल्याचे प्रवीण तरडे म्हणाले. चित्रपटाचे नाव 'मुळशी पॅटर्न पार्ट-२ तुमच्या घराच्या भिंतीतल्या वाळूची गोष्ट' हे आहे.



### नवऱ्यासह अंकिता पोहोचली अबू धाबीला

**मुंबई** : टीव्ही अभिनेत्री अंकिता लोखंडे सध्या पती विकी जैनसोबत अबू धाबीच्या ट्रीपवर आहे. तेथील काही व्हेकेशन फोटोज तिने समाज माध्यमांवर शेअर केले आहेत. अंकिताने अबू धाबीमधील अनेक फोटो पोस्ट केले आहेत. यामध्ये ती शहरात फिरताना दिसते. एका रेस्टॉरेंटमध्ये ती विकीसोबत बसलेली दिसते. तर आनंदी क्षणांची काही चित्रे तिने शेअर दिसत आहे. याच्या कॅप्शनमध्ये तिने माझ्या कॅमेरा रोलमधील अबू धाबीचे थोडेसे प्रेम, फिरणे, हसणे आणि आठवणी बनवणे, असे लिहिले आहे. यातील काही फोटोंमध्ये अंकिता वेस्टर्न ड्रेसमध्ये दिसते आहे. हे फोटो व्हायरल होताच समाज माध्यम वापरकर्त्यांनी कमेंट द्यायला सुरुवात केली. अनेक चाहत्यांनी विकी जैन आणि अंकिताच्या फोटोंचे कौतुक केले.



# निसर्गाचा प्रकोप, अनेक राज्यांमध्ये हाहाकार

## वादळी पावसामुळे बिहार, उत्तरप्रदेशमध्ये ४८ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली, ३० मे**

अनेक दिवसांच्या तीव्र उष्णतेनंतर शुक्रवारी बदललेल्या वातावरणामुळे अनेक राज्यांमध्ये हाहाकार उडाला आहे. वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिटीसह सर्वत्र विध्वंस झाला. विद्युत खांब आणि झाडे कोसळल्याने वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. खराब हवामानामुळे अनेक विमानांचे मार्ग बदलण्यात आले. वादळी पावसामुळे बिहार, उत्तरप्रदेशमध्ये ४८ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

वादळी पाऊस आणि गारपिटीचा बंगालसह उत्तराखंड, झारखंड, मध्यप्रदेश, राजस्थानलाही फटका बसला आहे. रात्री उशिरा सुरू झालेल्या वादळ, पाऊस आणि गारपिटीचा संपूर्ण उत्तरप्रदेशला फटका बसला. बुंदेलखंड आणि पूर्वांचलला सर्वाधिक प्रभावित आहे. ईशान्य रेल्वेच्या वाराणसी विभागातील चौरी चौरा आणि गौरी बाजार रेल्वे स्थानकांदरम्यान रेल्वे मार्गावर चार झाडे कोसळली. झाशी-लखनौ रेल्वे मार्गावर रेल्वे वाहतूक थांबली.

#### रेल्वेगाड्या जागेवरच थांबल्या

ओराई आणि भुआ स्थानकांदरम्यान विजेचा खांब कोसळल्याने झाशी-लखनौ रेल्वे मार्गावरील रेल्वे वाहतूक थांबवण्यात आली आहे. वाराणसीमध्ये ताशी ७५ किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा वाहत होता. प्रयागराजने मे महिन्यात एका दिवसात सर्वाधिक पावसाचा ५५ वर्षांचा जुना विक्रम मोडला. पहाटे १ ते ५ या चार तासांत ६१ मिमी पावसाची नोंद झाली. यापूर्वीचा विक्रम १८ मे १९७१ रोजी ५४ मिमी पावसाचा होता.

नेपाळमधील पावसामुळे पश्चिम चंपारण जिल्ह्यात गंडक नदीला पूर आला आहे. कोडरमा रेल्वे मार्गावरील रेल्वे वाहतूक तीन तास विस्कळीत झाली होती. खराब हवामानामुळे पाटणा विमानतळावर चार विमानांचे मार्ग बदलण्यात आले तर ३६ विमानांना विलंब झाला.



#### ५० पेक्षा जास्त पर्यटकांची सुटका

शुक्रवारी सायंकाळी रुद्रप्रयागच्या तुंगनाथ-चोपटा परिसरात झालेल्या भीषण वादळ आणि वीज कोसळल्याने दोन भावांचा मृत्यू झाला, तर तिघे जण जखमी झाले. वादळादरम्यान, अनेक पर्यटक तुंगनाथ-चोपटा परिसरात अडकले होते. शासन आणि मदत यंत्रणांनी अडकलेल्या ५० हून अधिक पर्यटकांची सुटका केली.

#### दक्षिण बंगालमध्ये सात जणांचा मृत्यू

दक्षिण बंगालमध्ये शुक्रवारी दुपारी भीषण वादळ, मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटाने हाहाकार उडाला. यात रात्री उशिरापर्यंत सात जणांच्या मृत्यूच्या वृत्ताला दुजोरा मिळाला, तर अनेक जण जखमी झाले. उत्तराखंडमध्ये हेमकुंड साहिबमध्ये शुक्रवारी बर्फवृष्टी झाली.

(वृत्तसंस्था)

# देशातील सौर सेल्स वापरणे बंधनकारक

## उद्यापासून नियमात बदल ● आयातीला बसणार आळा ● परदेशी चलनाची बचत

**नवी दिल्ली, ३० मे**

भारतात उत्पादित झालेले सौर सेल्स वापरणे १ जूनपासून बंधनकारक असणार आहे. आयात कमी करणे आणि परदेशी चलनाची बचत करण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याची माहिती वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकातून दिली.

नव्या नियमानुसार घर, व्यावसायिक किंवा उद्योगाच्या ठिकाणी यापुढे लावल्या जाणाऱ्या सौर ऊर्जा पॅनेलमध्ये देशात तयार झालेल्या सौर सेल्सचाच वापर करावा लागणार आहे.

सौर सेल्स हा सौर पॅनेलवरील असा घटक जो सूर्यप्रकाशाचे विजेत रूपांतर करण्याचे काम करतो. सौर सेल्सची देशात मोठ्या प्रमाणात आयात होते. ही आयात थांबवण्यासाठी व देशांतील सौर सेल्स निर्मितीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतला. दरम्यान दरवर्षी २०० गिगावॅट इतकी वीज निर्माण करू शकतील, इतके सौर पॅनेल दरवर्षी भारतात तयार केले जातात. परंतु, सौर सेल्सचे उत्पादन भारतात कमी प्रमाणात होते. ३० गिगावॅट वीज निर्मिती करू शकतील इतकेच सौर सेल्स भारतात तयार केले जातात. पर्यायाने भारताला सौर सेल्ससाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून राहावे लागते.



#### आदेशात काय म्हटले ?

**केंद्र सरकारच्या नव्या आदेशानुसार १ जूननंतर सुरू होणाऱ्या सर्व 'नेट-मीटरिंग' व 'ओपन एक्सेस' सौर प्रकल्पांसाठी देशात उत्पादन झालेले सौर सेल्स वापरणे बंधनकारक असेल. 'नेट-मीटरिंग' प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने छतावर लावलेल्या सौर पॅनेलचा समावेश होतो. 'ओपन ऍक्सेस' प्रकल्प प्रामुख्याने व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांची गरज पूर्ण करतात, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहक थेट विकासकांकडून ऊर्जा खरेदी करतात.**

#### लहान उद्योगांची चिंता वाढणार

केंद्र सरकारच्या नव्या नियमामुळे सौर संच उत्पादन करणाऱ्या लहान उद्योगांची चिंता वाढली आहे. लहान उद्योग सौर सेल्सचे उत्पादन करत नाही, तर मोठे उद्योग सौर सेल्सची निर्मिती स्वतः करतात. यापुढे लहान उद्योगांना मोठ्या उद्योगांकडून सौर सेल्स विकत घ्यावे लागतील. मोठे उद्योग देखील सौर ऊर्जा क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे स्पर्धात्मक पातळीवर लहान उद्योगांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

(वृत्तसंस्था)

### विमान इंधनाच्या दरात १२१ टक्के वाढ

**दुबई** : मध्यपूर्वेतील तणामुळे तेल पुरवठ्यात आलेल्या व्यत्ययामुळे विमान इंधनात तब्बल १२१.१ टक्क्यांची वाढ झाली, तर कच्च्या तेलाचे दर ७७.७ टक्क्यांनी वाढले आहे, अशी माहिती इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या (आयएटीए) अहवालात देण्यात आली. आयएटीएचे महासंचालक विली वॉल्श यांनी सांगितले की, इंधनाचे दर दुप्पट झाल्याने विमान कंपन्या हा वाढीव खर्च थेट ग्राहकांवर ढकलत आहेत. त्यामुळे तिकिटांचे दर वाढत आहेत. अमेरिका-इस्रायल-इराण युद्धामुळे विमान कंपन्यांना आपले मार्ग बदलावे लागले. पर्यायाने एप्रिल महिन्यात मध्य पूर्वेतील विमान कंपन्यांच्या प्रवासी मागणीत ४६.६ टक्क्यांची मोठी घट नोंदवली गेली. आता विमान सेवा पूर्वपदावर येत आहे.

# अहिल्यादेवी, मल्हारी मार्तंड, म्हाळसा, बानू यांचे जिवंत देखावे ठरले लक्षवेधी

## गजीनृत्य, ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आली शोभायात्रा

## विद्यापीठातर्फे अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव सांगता समारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मे-**

धनगरी गजीनृत्य, ढोल-ताशांच्या निनादात, कैताळाच्या गजरात आणि पिवळ्या फेट्यांच्या साक्षीने निघालेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची भव्य शोभायात्रा म्हणजे अहिल्यादेवींच्या कार्याला वाहिलेला मानाचा मुजरा ठरला. अहिल्यादेवी, मल्हारी मार्तंड, म्हाळसा आणि बानू यांच्या रुपातील जिवंत देखाव्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंती सप्ताह सांगतानिमित्त शनिवारी नॉर्थकोट मैदान ते अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व पोलिस आयुक्त एम.राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते शोभायात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

अहिल्यादेवींच्या वेशातील कलाकाराने साकारलेली साधी पण तेजस्वी वेशभूषा, कपाळावरील कुंकू, हातातील शिवपिंड आणि चेहऱ्यावरचे सात्विक भाव यामुळे प्रत्यक्ष अहिल्यादेवींचे भासमान रूप साकारले. मल्हारी मार्तंड, म्हाळसा आणि बानू या देखाव्यांनीही विशेष दाद मिळवली. हातात खड्ग आणि भंडारा घेऊन घोड्यावर स्वार झालेला मल्हारी मार्तंडांचा देखावा पराक्रमाची साक्ष देत होता. म्हाळसा आणि बानू यांच्या पारंपरिक वेशभूषा, अलंकार आणि भावभिनयांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. शोभायात्रेत सहभागी झालेल्या महिलांनी डोक्यावर परिधान केलेले पिवळे फेटे आकर्षणाचा वेगळाच रंग भरत होते. अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिधान केलेल्या हजारो पिवळ्या फेट्यांमुळे शोभायात्रेला भव्यता आणि एकसंधतेची आगळी ओळख प्राप्त झाली. या शोभायात्रेत प्र-कुलगुरु प्रा.डॉ. लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, प्रा.देवानंद चिलवंत, डॉ.आयेशा रंगरेज, अधिसभा सदस्य रोहिणी तडवळकर, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, अध्यासन केंद्राचे संचालक डॉ.प्रभाकर कोळेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.केदारनाथ काळवणे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ.श्रीकांत अंधारे आदी सहभागी झाले होते. उपकुलसचिव डॉ.उमराव मेटकरी, सहाय्यक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुनील थोरात आणि उपाध्यक्ष कांचन आघाव यांच्या समितीने शोभायात्रेचे उत्कृष्ट नियोजन केले. संपूर्ण शोभायत्रेचे सूत्रसंचालन सहायक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे यांनी केले.









## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : लोकमाता, आदर्श राज्यकर्ती आणि भारतीय संस्कृतीचे तेजस्वी पर्व


भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे, योद्धे आणि समाजसुधारक होऊन गेले; परंतु लोककल्याण, न्यायप्रियता आणि मानवतेचा आदर्श घालून देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अद्वितीय आहे. त्यांच्या जीवनात धैर्य, करुणा, कर्तव्यनिष्ठा, धर्मभावना आणि लोकसेवा यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यामुळेच भारतीय जनमनसाने त्यांना 'लोकमाता' हा सर्वोच्च मान बहाल केला.

अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथे झाला. त्यांचे वडील मानकोजी शिंदे यांनी त्या काळातील सामाजिक बंधने झुगारून आपल्या कन्येला शिक्षण व उत्तम संस्कार दिले. लहानपणापासूनच त्या बुद्धिमान, संवेदनशील आणि सेवाभावी होत्या. गरिबांना मदत करणे, धार्मिक ग्रंथांचे वाचन करणे आणि लोकांच्या दुःखात सहभागी होणे हा त्यांच्या स्वभावाचा भाग होता.

लग्नानंतर त्या होळकर घराण्यात आल्या. सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांच्या अंगी असलेले नेतृत्वगुण ओळखले आणि त्यांना प्रशासन, न्यायव्यवस्था व राज्यकारभाराचे शिक्षण दिले. पती खंडेराव होळकर यांच्या मृत्यूनंतर आणि पुढे मल्हाररावांच्या निधनानंतर राज्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. अनेक संकटांना सामोरे जात त्यांनी अत्यंत कुशलतेने इंदूर संस्थानाचा कारभार सांभाळला.

अहिल्यादेवी न्यायप्रिय आणि लोकहितवादी शासक होत्या. त्यांच्या राज्यात भ्रष्टाचाराला थारा नव्हता. गरीब, शेतकरी, व्यापारी आणि दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांनी करप्रणाली सुलभ केली, दुष्काळग्रस्तांना मदत केली आणि प्रजेच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांच्या राज्यात सुख, समृद्धी आणि सुव्यवस्था नांदत होती. अहिल्यादेवींचे कार्य केवळ इंदूरपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी संपूर्ण भारतातील धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी मोठे योगदान दिले. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार हे त्यांचे सर्वात प्रसिद्ध कार्य मानले जाते. याशिवाय काशी, गया, सोमनाथ, द्वारका, उज्जैन, हरिद्वार आणि रामेश्वरम येथे मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि तलाव बांधून त्यांनी जनसेवा व संस्कृतीसंवर्धनाचे कार्य केले. महिलांच्या सन्मान आणि सक्षमीकरणासाठीही त्यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. विधवा आणि निराधार महिलांना आधार दिला. त्यांचे जीवन आजच्या महिलांसाठी आत्मविश्वास, कर्तव्यनिष्ठा आणि नेतृत्वाचे प्रेरणास्थान आहे. युवकांसाठीही त्यांचा आदर्श तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांनी सत्ता म्हणजे लोकांची सेवा हे आपल्या कृतीतून सिद्ध केले. अहिल्यादेवींच्या जीवनाचा केंद्रबिंदू मानवता होता. त्यांचे अध्यात्म कर्मप्रधान होते. त्या मानत की ईश्वरभक्ती म्हणजे मानवसेवा. जाती, धर्म आणि वर्गभेद यांच्यापलीकडे जाऊन त्यांनी सर्वांची सेवा केली. म्हणूनच त्यांचा दरबार न्यायाचे मंदिर म्हणून ओळखला जात असे. आजच्या काळात वाढता स्वार्थ, भ्रष्टाचार आणि सामाजिक विषमता पाहता अहिल्यादेवींचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांची जयंती केवळ स्मरणाचा दिवस नसून त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याची संधी आहे. समाजात न्याय, प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि मानवता रुजवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील तेजस्वी सूर्य आहेत. त्यांचे कार्य आणि विचार पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**- डॉ. गुरबसप्पा नीलकंठ करपे,**
**अणदूर ता. तुळजापूर, जि. धाराशिव**



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

दिनेश गुणे

# ‘झुरळझेप’ नव्हे, ‘गरुडभरारी’!

ऊर्जेचा एक नियम असतो. ती साठवून ठेवून गरजेप्रमाणे वापरता येत नाही. ती निर्माण होताच वापरली नाही तर वाया जाते. तरुणाई हीदेखील एक ऊर्जाच असते. केवळ वाढते वय म्हणजे तरुणाई नव्हे. या वयाबरोबर ऊर्जादेखील वाढत असते. मन विकसित होत असते. नवनव्या गोष्टींमध्ये रस निर्माण होत असतो, नवनव्या गोष्टी करून पाहण्याची ऊर्मी उफाळून येत असते आणि त्याला वाट करून दिली नाही तर तिचा उद्रेक होतो. तरुणाईची ऊर्जा अशी विस्फोटाच्या दिशेने वाया जाऊ द्यायची नसेल तर तिचा वेळीच विधायक वापर व्हायला हवा. अन्यथा, या ऊर्जेच्या वारूवर कोणीही स्वार होईल आणि या वारूचा लगाम व्यवस्थित हाताळता आला नाही तर तो बेफाम उधळून भलत्याच दिशेला भरकटत जाईल हीच भीती अधिक असते. तरुणाईला ऊर्जेच्या वारूवर स्वार होण्याची उत्सुकता असते, पण लगाम आणि मांड यांवर ‘कमांड’ नसेल, तर फसलेल्या दिशेला वळणारा वारू विध्वंसासही कारणीभूत ठरू शकतो, हे यापूर्वी अनेकदा दिसून आले आहे. भारत हा तरुणाईच्या ऊर्जेने संपन्न असलेला देश आहे. या देशातील ६५ टक्के लोकसंख्या तरुण वयोगटातील म्हणजे पस्तिशीच्या आतील असल्यामुळे या देशात तरुणाईच्या ऊर्जेची कमतरता नाही आणि ही ऊर्जादेखील सतत काही वेगळ्या वाटांचा शोध घेणारी आहे. त्यामुळे तिचा योग्य आणि वेळीच वापर करून घेणे हे समाज आणि व्यवस्थांसमोरील मोठे आव्हान आहे. या तरुणाईने आपली क्षमता सिद्ध केली आहे, बुद्धिमत्तेच्या स्पर्धेत जगाच्या तुलनेत कोठेही मागे नाही याचे अनेक पुरावेही दिले आहेत, म्हणूनच तरुणाईच्या ऊर्जेला नेमकी आणि विधायक दिशा देण्याचे नवनवे प्रयत्न देशात सुरू असतात. या तरुणाईच्या काही अपेक्षाही आहेत. त्या वास्तव आहेत यात शंका नाही. ही ऊर्जा देखील साठवून ठेवता येणार नसल्याने तिचा वेळीच वापर व्हावा ही यापैकी महत्त्वाची वास्तविक अपेक्षा आहे.

सुमारे सात वर्षांपूर्वी, डिसेंबर २०१९ मध्ये आपल्या अखेरच्या जनसंवादाच्या जाहीर कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक महत्त्वाचा मुद्दा चिंतनासाठी देशासमोर ठेवला होता. एका परीने पुढच्या दशकाचे भाकीतच त्यांनी वर्तविले होते. २१ व्या शतकात जन्मलेली पिढी देशाच्या विकासाला गती देण्यात सक्रिय भूमिका बजावणारी असल्याने, शतकासमोर असलेली असंख्य आव्हाने समजून घेत त्यांची मने विकसित होत होती. या पिढीलाच आजच्या, नवयुगाच्या भाषेतील ‘मिलेनियल्स’ म्हणून ओळखले जाते, तर काही जण त्यांना ‘जनरेशन झी’ किंवा ‘जेन झी’ म्हणतात. व्यापक अर्थाने, समाजमाध्यमांनी विकसित केलेली ही ‘सोशल मीडिया जनरेशन’ प्रतिभावान आहे आणि संवेदनशीलही आहे. समाजमाध्यमी मंचांवरून व्यक्त होणारे तिच्या प्रतिभेचे आविष्कार समाजव्यवस्थेला कधी चिंतन, तर कधी चिंतादेखील व्यक्त करण्यास भाग पाडतात. काहीतरी नवीन, वेगळे करण्याचे तिचे स्वप्न असते. तिची स्वतःची मतेही असतात आणि व्यवस्थेकडे लक्षदेखील असते. या पिढीला व्यवस्थेचा तिटकारा असतो किंवा ती व्यवस्था उलथून टाकण्याच्याच मानसिकतेत नेहमी असते असा याचा अर्थ नाही. उलट व्यवस्थेचे प्रामाणिक पालन करण्याचीच त्यांची इच्छा असते. या मानसिकतेस व्यवस्थेकडून प्रामाणिक प्रतिसाद त्यांना अपेक्षित असतो आणि तसा प्रतिसाद मिळाला नाही, तर मात्र ही पिढी अस्वस्थ होते. धैर्याने व्यवस्थेवर प्रश्नचिन्हे उमटवते, व्यवस्थेविरोधात दंड थोपटून उभीदेखील राहते आणि त्याला व्यापक जनआंदोलनाचे रूप देते. समाजमाध्यमांचे शक्तिशाली मंच अशा आंदोलनांमुळे उभे राहिलेले आजकाल जगातील अनेक आंदोलनांमधून दिसून आले आहे. त्यामुळे व्यवस्थेच्या विरोधातील त्यांची भूमिकादेखील विधायकच मानली जाते आणि त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची प्रामाणिक दखल घेऊन त्याची उत्तरे शोधणे ही व्यवस्थेची जबाबदारी असते. कारण व्यवस्थेची घडी बिघडली, तर अराजकता निर्माण होते. या अराजकतेचा आणि अव्यवस्थेचा ‘जेन-झी’ला तिरस्कार आहे. अव्यवस्था आणि अस्थिरता याबद्दल त्यांच्या मनात प्रचंड चीड आहे. आसपासच्या सहजपणे घडून जाणाऱ्या घटनांमधूनही ते दिसून येते. बस थांब्यावर, विमानतळावर, सिनेमा थिएटरमध्ये किंवा कोठेही, कोणी रांगेत उभे असताना मध्येच एखादा घुसला, तर सर्वांत आधी आवाज उठवणारे तरुणच असतात. आणि अशी एखादी घटना घडली, तर इतर तरुण लगेच मोबाईल फोन काढून त्याचा व्हिडीओ बनवतात आणि पाहता पाहता तो व्हिडीओ व्हायरलही होऊन जातो. यामुळे चूक करणाऱ्यालाही आपण काय केले याची जाणीव होते! थोडक्यात, पठडीबाज पद्धतीऐवजी एक नवीन प्रकारची व्यवस्था, नवीन प्रकारचे युग, नवीन प्रकारची विचारसरणी आणि व्यवस्थेची नव्या युगाला अनुसरून असलेली नवी घडी ही या पिढीची अपेक्षा आहे.

ऊर्जा आणि गतिशीलतेने भारलेली मने नेहमी तरुणच असतात. बदल घडवून आणण्याची शक्ती आणि मानसिकता अशा मनांमध्येच असते. त्यामुळे, ही पिढी आपल्या तारुण्याचा कसा वापर करते यावर त्यांचे भविष्य आणि जीवन अवलंबून असते, अशी स्वामी विवेकानंदांची भावना होती. युवा पिढीने समृद्ध असलेल्या कोणत्याही देशात, कल्पना आणि नावीन्यपूर्ण संशोधन, जोखीम घेण्याची तयारी आणि हाती घेतलेले कोणतेही काम पूर्ण करण्याची असीम जिद्द या तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात. कोणत्याही विपरीत परिस्थितीने समोर उभी केलेली आव्हाने पेलण्याची हिंमत या पिढीच्या अंगी असलेल्या ऊर्जेतून ओसंडत असते. कोविडसारख्या जीवघेण्या महामारीच्या संकटात याचा अनुभव देशाने घेतला असल्याने, आव्हाने झेलून परतविणे हा या पिढीसाठी चमत्कार नव्हे, तर सहजसाध्य खेळ असतो.

तरुणाईच्या प्रतिभेचे नवी क्षितिजे उजळणारे ‘स्टार्ट अप’ नावाचे एक क्षेत्र भारतात झपाट्याने उदयास आले आहे. स्टार्टअपच्या जागतिक युगाचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताच्या तरुणाईमध्ये आहे, हे आता सिद्ध होऊ लागले आहे. वर्षानुवर्षे भारतात स्टार्टअपमध्ये विक्रमी गुंतवणूक होत असल्याने हे क्षेत्र वेगाने पुढे जात आहे. लहानमोठ्या शहरांतही या क्षेत्राची व्याप्ती पसरू लागली आहे. आजकाल जगात सर्वाधिक चर्चेत असलेल्या युनिकॉर्नच्या जगातही भारत वेगाने भरारी घेत आहे. सात हजार कोटी रुपयांहून अधिक किमान मूल्य असलेल्या या क्षेत्रात दहा वर्षांपूर्वी जेमतेम नऊ-दहा युनिकॉर्न होते. आता प्रत्येक दहा



दिवसांमागे एका नव्या युनिकॉर्नची निर्मिती होत आहे. हा आश्चर्यजनक वेग म्हणजे, तरुणाईची केवळ ‘झुरळझेप’ नव्हे, तर ‘गरुडभरारी’ म्हणावी लागेल. या वाढीचे आणखी एक वेगळेपण सांगितले जाते. ते म्हणजे, आपल्या देशातील युवकांनी हे यश कोविड महामारीच्या काळात प्राप्त केले आहे. आज भारतातील अनेक युनिकॉर्ननी एक अब्जाहूनही अधिक मूल्यांचा टप्पा पार केला आहे आणि देश-विदेशातून या क्षेत्राला मोठा पाठिंबा मिळत आहे.

जेन झी पिढीच्या या क्रांतीचे आणखी एक वेगळेपण अलिकडे अधोरेखित होताना दिसते. १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली ही पिढी आजकाल केवळ सोशल मीडियावर मत व्यक्त करणारी पिढी राहिलेली नाही; ती सरकारे बदलवू शकणारी राजकीय शक्ती बनली आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने, हवामान संकट, सामाजिक न्याय आणि डिजिटल स्वातंत्र्य या प्रश्नांवर या पिढीने अनेक देशांत प्रस्थापित सत्तांना हादरे दिले. जगातील अनेक देशांत या पिढीने व्यवस्था उलथवून टाकल्या. नव्या व्यवस्थांचा उदय झाला. यामागे या पिढीच्या निश्चित अशा काही अपेक्षा होत्या. मोठ्या अपेक्षांनिशी प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या या पिढीने परिवर्तने घडवून आणली, पण त्यानंतर त्यांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या का, हा प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. कारण, जगात ज्या ठिकाणी असे परिवर्तन घडले, तेथील आजचे वास्तव फारसे आशादायक नाही असेच दिसते.

रस्त्यावरच्या संघर्षातून सत्तापालट घडवून आणणे तुलनेने सोपे असते, ज्या अपेक्षाभंगामुळे असंतोष उफाळलेला असतो, त्या अपेक्षांचे पूर्तता करणे आणि असंतोषाची कारणे दूर करणे अत्यंत कठीण असते. कारण तरुणाईचा हा असंतोष केवळ एखाद्या नेत्याविरुद्ध नव्हे, तर संपूर्ण आर्थिक-सामाजिक व्यवस्थेविरुद्ध होता, हे त्या त्या घटनांतून स्पष्ट दिसते. त्यामुळे, व्यवस्था बदलण्यासाठी घोषणांपेक्षा संस्थात्मक सुधारणा आवश्यक असतात, हेच वर्तमानाचे वास्तव आहे. याची उदाहरणे जगातील जेन झीच्या आंदोलनानंतरच्या परिस्थितीतून स्पष्ट झाली आहेत. बांगलादेशात विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी आरक्षण आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात उग्र आंदोलन उभारले. परिवर्तनानंतर नव्या सत्ताधाऱ्यांनी डिजिटल स्वातंत्र्य, रोजगारनिर्मिती आणि शिक्षणसुधारणा यांची आश्वासने दिली. काही प्रमाणात पोलिस कारवाईवरील नियंत्रण, ऑनलाईन अभिव्यक्तीवरील निर्बंध कमी करणे आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन अशी पावले उचलली गेली. मात्र वस्त्रोद्योगावर अवलंबून अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करू शकलेली नाही. महागाई आणि युवक बेरोजगारी कायम आहे. त्यामुळे आंदोलनातील ऊर्जा आता, व्यवस्था बदलली; पण वास्तविक जीवन बदलले का, या विचाराने अस्वस्थ झाली आहे.

श्रीलंकेतील २०२२ मधील जेन झीच्या आंदोलनाचेही तेच झालेले दिसते. या आंदोलनाने सरकार बदलले, पण अर्थव्यवस्थेत काही फरक पडलाच नाही. या आंदोलनाची उभ्या जगाने दखल घेतली. तरुणाईच्या अपेक्षांचे आणि रोषाचे उग्र दर्शन घडविणाऱ्या या आंदोलनातून इंधनटंचाई, महागाई आणि आर्थिक अस्थिरतेची चिंता ऐरणीवर आली आणि तरुणांनी राष्ट्राध्यक्षांना पदत्यागास भाग पाडले. नंतरच्या सरकारांनी आयएमएफ करार, करसुधारणा, भ्रष्टाचारविरोधी चौकशा आणि प्रशासनिक पारदर्शकतेची भाषा केली. काही आर्थिक स्थैर्य आलेही; पण तरुणांना अपेक्षित असलेली रोजगारक्रांती किंवा राजकीय संस्कृतीतील आमूलाग्र बदल घडले नाहीत. उलट काटकसरीच्या धोरणांमुळे तरुणांवर आर्थिक ताण वाढला.

यातून एक गोष्ट स्पष्ट झाली. ती म्हणजे, रस्त्यावरची क्रांती सशक्त असते. तीमधून तरुणांच्या अपेक्षा सज्जडपणे व्यक्त होतात आणि तिच्या दबावामुळे सरकारे बदलू शकतात. पण व्यवस्थेची बिघडलेली घडी त्यानंतर तातडीने बदलता येत नाही. आंदोलनासारख्या उपायांनी कर्जबाजारी अर्थव्यवस्था काही महिन्यांत बदलत नाही. चिली नावाच्या टिकलीएवढ्या देशातही शिक्षणखर्च, विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध पेटलेल्या तरुणांच्या आंदोलनातून डाव्या विचारांचे तरुण नेतृत्व सत्तेत आले. विद्यार्थिदशेत आंदोलन करणारे गॅब्रिएल बोरिक नवे राष्ट्राध्यक्ष झाले. नव्या सरकारने किमान वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा, महिलांचे अधिकार आणि पर्यावरणीय धोरणांवर भर दिला. पण आर्थिक मंदी, संसदीय विरोध आणि लोकांच्या अतिउच्च अपेक्षा यामुळे बदलांचा वेग कमी पडला. नव्या संविधानाचा मसुदाही जनतेने नाकारला आणि आंदोलनातून जन्मलेल्या या क्रांतीने अपेक्षाभंगाची निराशाच जनतेच्या पदरी पडली. आंदोलनातील आदर्शवाद आणि सत्तेतील व्यवहारवाद या दोन बाबी भिन्न असतातच. पण आदर्शवादाच्या दबावामुळे सत्तेतील व्यवहारवाद तातडीने नमते घेतोच असे नाही. उलट, या दोहोंमध्ये संघर्ष होण्याचीच शक्यता अधिक असते. फ्रान्समध्ये पेन्शन सुधारणा, महागाई आणि बेरोजगारीविरोधात तरुण मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले. मात्र येथे पूर्ण सत्तापालट झाला नाही. तरीही सरकारला काही सामाजिक सवलती, रोजगार प्रशिक्षण योजना आणि हरित उद्योगांत गुंतवणूक वाढवावी लागली. तरीही, फ्रान्समधील तरुणांमध्ये राजकीय व्यवस्थेविरुद्धची नाराजी शमलेली नाही. संपूर्ण युरोपातच, उजव्या आणि डाव्या टोकाच्या राजकारणाकडे तरुणांचा ओढा वाढण्यामागे हेच कारण मानले जाते. ट्युनिशिया, इजिप्त, लिबियासारख्या देशांत तरुणाईने हुकूमशाहीविरुद्ध उठाव केले. सुरुवातीला लोकशाहीची आशा निर्माण झाली; पण अनेक ठिकाणी पुन्हा लष्करी नियंत्रण, यादवी संघर्ष किंवा आर्थिक अस्थिरता निर्माण झाली. कारण आंदोलनाने सत्ता उलथवली, पण मजबूत लोकशाही संस्था निर्माण केल्या नाहीत.

म्हणजे, जेन झीच्या अपेक्षांचे वेग आणि अपेक्षापूर्ती करण्यातील व्यवस्थांचा वेग वेगळा असतो, असा याचा स्पष्ट अर्थ आहे. सोशल मीडियाच्या युगाला तत्काळ बदल अपेक्षित असतो. पण अर्थव्यवस्था, रोजगार आणि शिक्षणव्यवस्था बदलण्यासाठी काही काळ जावाच लागतो. ‘जेन झी’ने परिवर्तन घडविलेल्या देशांतील अनेक देश कर्जबाजारी, महागाईग्रस्त किंवा जागतिक बाजारावर अवलंबून आहेत. त्यामुळे सरकारे लगेच रोजगारनिर्मिती करू शकत नाहीत. त्यामुळे, बदल हवा अशी या पिढीची तातडीची मागणी असली, तरी सत्तेतील हितसंबंध सांभाळण्याच्या कसरतीत त्याचा प्राधान्यक्रम कदाचित मागेदेखील पडतो. असंतोषातून सत्तापालट होतो, पण अपूर्ण अपेक्षांतून पुन्हा असंतोष जन्म घेतो. आणि मग समाज एका कायमस्वरूपी अस्थिर चक्रात अडकतो, हेच अनेक आंदोलनांतून दिसून येते. त्यामुळे केवळ आंदोलनांसाठी ताकद देणे ही तरुणाईची गरज नाही, तर या पिढीमध्ये भविष्याविषयीचा विश्वास रुजविणे हे खरे आव्हान आहे. भारतात ते शक्य आहे, कारण येथील जेन झी ही व्यवस्था ‘मोडीत काढण्याच्या’ विचाराची नाही, तर व्यवस्था ‘सुधारण्याच्या’ विचाराची आहे. आवाज वाढविण्यापेक्षा, विचाराची आणि तर्काची ताकद वाढविण्यावर या पिढीचा विश्वास आहे. समंजसपणा, संवाद आणि सहकार्यातूनही बदल घडविता येतात, हे या देशाने अनुभवलेले आहे. या संस्काराचे बाळकडू घेऊनच येथील ‘जेन झी’ घडते आहे. ▮

dineshgune@gmail.com

# ‘एआरओसी’ त्वरित लागू व्हावा

## विशेष

ॲड. अविनाश तेलंग

कम्युटेशन म्हणजे आपल्या पेन्शनचा ठरावीक भाग विकून, तेवढी रक्कम १५ वर्षे कमी घेणे आणि त्या बदल्यात एकमुस्त रक्कम प्राप्त करणे, यालाच अंशराशीकरण सुद्धा म्हणतात.

विकलेली रक्कम ✻१२✻घटक =मिळणारी रक्कम. हा घटक वयानुसार कमी, कमी होत असतो. आणि हा घटक तक्ताच दोषपूर्ण व अन्यायकारक आहे. १८ वर्षांनंतर नोकरी लागणे व त्यानंतर किमान १० वर्षे नोकरी आणि ६२ वर्षांपर्यंत कमाल नोकरी असा केवळ २८ वर्षे ते ६२ वर्षे असा हा तक्ता नाही, तर १६ वर्षे पूर्ण ते ८४ वर्षे पूर्ण, पुढील जन्म दिवस धरून, असा १७ ते ८५ वर्षांसाठी असलेला, जीवन विम्याचा मृत्युदर आधारित त्यावेळचा (१९५९ सालचा) अंतिम दर तक्ता (अल्टिमेट टेबल) आपल्या सर्वांना गैरलागू असलेला तक्ता, जसाच्या तसा लागू केला आहे. हाच पहिला अन्याय आहे.

जर विविध वयाच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येकी १०० रुपये पेन्शन विकली तर प्रत्येकाला १५ वर्षे = १८० महिने १०० रुपये प्रमाणे १८,००० रुपये परत करावे लागतात. आणि रक्कम मात्र खालीलप्रमाणे मिळते.

१८ वर्षे, घटक १९.२८, मिळतात २३,१३६ रु.

४२ वर्षे, घटक १५.१५, मिळतात १८,१८० रु.

१८ ते ४२ वर्षे जेवढे मिळतात, त्यापेक्षा कमीच भरावे लागतात, व्याजाचा प्रश्नच येत नाही. सर्वांचा गैरसमज आहे की, आता व्याजाचे दर कमी झाल्याने, परतफेड कालावधी कमी झाला पाहिजे, हे कारणच चुकीचे आहे. मात्र ४२ वर्षांनंतर, जसे जसे वय वाढते, तशी तशी रक्कम कमी कमी मिळते.

५५ व्या वर्षी घटक ११.४२, रक्कम = १३,७०४ रु.

६० व्या वर्षी घटक ९.८१, रक्कम = ११,७७२ रु.

अशाप्रकारे खूपच जास्त रक्कम भरावी लागते. म्हणून हा वयावर आधारित तक्ता बदलला पाहिजे.

३१ डिसेंबर २००५ पर्यंत परतफेड करताना हा तक्ता लागू होता. हा अन्याय कमी वाटला म्हणून की काय, सहाव्या वेतन आयोगाने, ०१.०१.२००६ पासून एलआयसीचे (९४-९५) अल्टिमेट टेबल्स ॲण्ड ८ पर्सेंट इंटरेस्ट लोडिंग असलेला नवीन तक्ता लागू केला. त्यामुळे अन्याय अधिकच वाढला. ६०वर्षे वयाच्या व्यक्तीला १०० रुपये पेन्शन विकल्यावर पूर्वी ११,७७२ रुपये मिळत. आता फक्त ९८३३ रुपये म्हणजे १९३९ रुपये कमी मिळतात आणि भरावे मात्र १८,००० रुपये लागतात. पूर्वी ३३.६१ टक्के पेन्शन विकल्यावर मिळणारी रक्कम मिळण्यासाठी आता ४० टक्के पेन्शन कमी होते. म्हणजे ६.३९ टक्के जास्त पेन्शन विकावी लागते. हे दुहेरी नुकसान आहे. रक्कम कमी घ्या व जास्त भरा. ६० वर्षे व्यक्तीसाठी ८ टक्के सरळ व्याजाने १४१ महिन्यांत म्हणजे ११ वर्षे ९ महिन्यांत संपूर्ण वसुली होते. पण शासन १५ वर्षे कालावधी कमी करत नाही. गुजरात सरकारने हा कालावधी १२.१०.२०२२ पासून १३ वर्षे केला आहे.

दुर्दैव असे की, २००६ पासून गेल्या २० वर्षांत कोणत्याही ट्रेड युनियन, मजूर संघटना, शासकीय, केंद्र व राज्य कर्मचारी, जिल्हा परिषद संघटना, यांनी कोणीही या अन्यायाविरुद्ध आंदोलन उभे केले नाही. कोणत्या कोर्टात आव्हान दिले नाही. आज कालबाह्य झालेला तक्ता रद्द करावा, ही मागणी केली नाही. १९५९ सालचा मृत्युदर तक्ता, दर बराच वाढूनही आज ६७ वर्षांनंतर कायम आहे. उलट ८ टक्के व्याजही लागू झाले आहे. वेलफेअर स्टेटचे कर्तव्य शासन पूर्णपणे विसरले आहे. हे चित्र बदललेच पाहिजे.

या अन्यायावर एकच उपाय म्हणजे ‘ऑल रँक वन कम्युटेशन’ (एआरओसी) लागू करणे. वयाचा भेदभाव न करता, सर्वांना समान घटक १० हा लागू करणे. म्हणजे ४२, ४८, ५०, ५५, ६० वर्षे, वय कोणतेही असो, १०० रुपये पेन्शन विकल्यावर त्याला १००✻१२✻१० (घटक) = १२,००० रुपये मिळतील. जे १०० रुपयेप्रमाणे १२० महिन्यांत म्हणजे फक्त १० वर्षांत वसूल होतील. शासन व कर्मचारी, कोणाचेही नुकसान नाही. सर्वांना समान न्याय. वयानुसार होणारा अन्याय कायमचा दूर होणार. आज नोकरीत असलेले सुखावतील. हा एकमेव पर्याय आहे.

**शासनाची भूमिका :** केंद्र सरकारने कोर्टात भूमिका मांडली की, ही योजना ऐच्छिक आहे. कोणावरही जबरदस्ती नाही. मात्र ज्यांनी पेन्शन विकली, त्यांना १५ वर्षे रक्कम भरावीच लागेल. येथे सरकारला लोकहिताचा विसर पडला आहे.

पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयाने सीडब्ल्यूपी २४९०/२०२४ व ८२२२/२०२४ मध्ये, ज्यांच्या वसुलीला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा अर्जदारांच्या वसुलीला स्थगिती दिली. मात्र नंतर अशाच ७०७ रिट याचिका दाखल झाल्या आणि अंतिम सुनावणीमध्ये त्या सर्व खारीज केल्या. त्यामुळे मिळालेली स्थगिती रद्द झाली. दि. १८.०३.२०२४च्या उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर आधारित ‘सीएटी’ मुंबईने ११.१२.२०२४ ला, १२ वर्षे वसुली पूर्ण झालेल्या अर्जदार कर्मचाऱ्यांच्या पुढील वसुलीला स्थगिती दिली. त्याच आधारावर ‘एमएटी’ नागपूरने देखील अंतरिम स्थगितीचे आदेश दिले आहेत. अजूनपर्यंत कोणत्याही उच्च वा सर्वोच्च न्यायालयाने गुणवत्तेवर आधारित अंतिम निर्णय दिलेला नाही. १७.०१.२०१९ ला दिलेली दिल्ली उच्च न्यायालयाची स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने १५.०४.२०१९ ला खारीज केली आहे.

**सर्वांत महत्त्वाचे :** रवी मलिक, जनरल सेक्रेटरी, अखिल भारतीय पेन्शनर्स असोसिएशन यांना २६.०२.२०२६ ला केशव माधव शर्मा, अव्वर सचिव, पेन्शन मंत्रालय,भारत सरकार यांनी स्पष्टपणे कळविले आहे की, विक्री पेन्शन वसुली कालावधी कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार कोणत्याही कोर्टाला नाही. तो फक्त वित्त मंत्रालयाला व पेन्शन मंत्रालयाला आहे. तसेच आठवे वेतन आयोग सुद्धा याबाबत निर्णय घेऊ शकते. मात्र आजपर्यंत हा वसुली कालावधी कमी करण्याबाबत या तीन संस्थांकडे कोणतेही निवेदन, सूचना, आवेदन प्राप्त झालेले नाही. आणि अंतिम तारीख ३१ मे २०२६ आहे. लेखकाने वैयक्तिक आणि संस्थांमार्फत तीन निवेदने वेतन आयोगास पाठविली आहेत. ▮

९४२००७४१२५
अध्यक्ष, ज्येष्ठ ना. महामंडळ विदर्भ, नागपूर

# तंबाखू व्यसनाचे चिंताजनक बदलते प्रकार

## प्रासंगिक

चिन्मय पाठक

तंबाखू सेवनांतील धोक्यांची जाणीव जनेतला करून देणे आणि तंबाखू सेवन सोडण्यास प्रवृत्त करणे या हेतूने जागतिक आरोग्य संघटनेतर्फे दरवर्षी ३१ मे रोजी ‘विना तंबाखू दिन - (नो टोबॅको डे)’ पाळला जातो. १९८८ साली पहिल्यांदा ७ एप्रिलला ‘विना तंबाखू दिन’ अर्थात् ‘जागतिक धूम्रपान विरोधी दिन’ पाळला गेला. मात्र १९८८ सालीच एका ठरावाद्वारे ३१ मे हा कायमस्वरूपी ‘विना तंबाखू दिन’ पाळला जाईल असे करण्यात आले. वर्षभर चालणाऱ्या या मोहिमेद्वारे धूम्रशलाका (सिगारेट), बिडी, हुक्का इत्यादी मार्गांनी धूम्रपानाद्वारे तंबाखूचा प्रत्यक्ष धूर ओढणारे आणि धूम्रपान करणाऱ्यांनी हवेत सोडलेल्या तंबाखूच्या धुराची शिकार होणारे दुय्यम किंवा अप्रत्यक्ष तंबाखूसेवकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची दाहकता लोकांपर्यंत पोहचविणे तसेच प्रभावी धोरणांद्वारे तंबाखूचे सेवन कमी होण्यासाठी मुत्सद्देगिरी करणे यावर भर दिला जातो. ‘‘तंबाखू आकर्षणाचा बुरखा फाडणे - निकोटिन आणि तंबाखूच्या व्यसनांचा मुकाबला करणे’’ हे यंदाच्या ‘विना तंबाखू दिनाचे’ सूत्र आहे.

तंबाखू सेवनाने होणाऱ्या निरनिराळ्या व्याधींमुळे जगात अंदाजे ऐंशी लाख लोक दरवर्षी मृत्युमुखी पडतात. यातील सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे हे मृत्यू कर्करोग, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग आणि दीर्घकालीन श्वसन विकार किंवा फुफ्फुसांचे प्रदीर्घ आजार यासारख्या वेदनादायक रोगांनी येतात. याशिवाय तंबाखूच्या व्यसनामुळे प्रजनन समस्या आणि प्रजनन क्षमता/वंध्यत्व समस्या, मधुमेह, रोगप्रतिकार प्रणाली आणि हाडांचे विकार, दातांच्या आणि डोळ्यांच्या व्याधी या आरोग्य विषयक समस्या तंबाखूसेवन करणाऱ्यांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतात.

जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात पंधरा वर्षांवरील वयोगटाचे सुमारे २६७ दशलक्ष लोक तंबाखूचे सेवन करतात. हे प्रमाण वयस्कांच्या लोकसंख्येच्या २९ टक्के



आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने बघता या व्यसनात भारतातील सुमारे २९ टक्के प्रौढ तंबाखूचे व्यसन करतात. याबाबत चीन पाठोपाठ भारताचे स्थान आहे. पुरुषांमध्ये तंबाखूच्या व्यसनाधीनतेचे प्रमाण ४२ टक्क्यांपेक्षा थोडे जास्त, तर महिलांमध्ये हेच प्रमाण सुमारे १४ टक्के आढळते. ग्रामीण भारतात ६८ टक्के घरांमध्ये हे व्यसन पोहोचले असून शहरी भागात ४५ टक्के घरांमध्ये तंबाखूचे सेवन केले जाते. दुर्दैवाने आर्थिक उदारीकरणानंतर जीवनशैलीत दिवसेंदिवस वाढत असलेले ताणतणाव यामुळे तंबाखूची व्यसनाधीनता वाढताना दिसते. आणि ती शहरी महिलांमध्ये वाढताना दिसते.

तंबाखू व्यसनाचे भारतात तीन प्रकार आढळतात. पहिला आणि सर्वांत जास्त प्रमाणात असलेला प्रकार म्हणजे गुटका, सुगंधी किंवा साधा पानमसाला (खर्रा किंवा मावा), या प्रकारे चावून खाण्याचा. दुसरा प्रकार म्हणजे धूम्रपान म्हणजेच बिडी, धूम्रशलाका (सिगारेट) ओढणे. या परंपरागत पद्धतीच्या जोडीला सध्याच्या तरुणाई - जेन झीमध्ये आणखी एका प्रकारे तंबाखूचा शिरकाव झाला आहे, तो म्हणजे वेप, ज्यात घातक प्रमाणात निकोटिन सेवन घडते. तिसरा प्रकार म्हणजे तपकीर किंवा नस. जी नाकावाटे किंवा दात घासायला दंतमंजनासारखी वापरली जाते. हा तिसरा प्रकार सुदैवाने अस्तंगत होण्याच्या दिशेने प्रवास करतो आहे.

एखाद्या व्यसनाला सामाजिक मान्यता मिळते तेव्हा त्या व्यसनाला क्षुल्लक मानले जाण्याचा धोका असतो. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ यांचे सेवन करणे ही एक नकारात्मक कृती असली तरी तिच्याकडे सामान्यतः दुर्लक्ष केले जाते. मात्र ते कर्करोगासारख्या आजाराला आमंत्रण देणारे ठरते. धूम्रशलाकेचा (सिगारेट) आणि बिडीचा धूर त्रासदायक असल्याने तंबाखू कंपन्यांनी ई-सिगारेट काढल्या. त्यामुळे कमी धुरात तितकाच नशा मिळते असे म्हणतात. अमली पदार्थांना दोन प्रकारांमध्ये विभागले जाते. पहिल्या प्रकारात येतात अवसादक किंवा संवेदना मंदावणारे (डिप्रेसेंट). हे मानवी मनाला शांत करणारे आणि सुस्ती आणणारे पदार्थ असतात. या प्रकारात झोपेच्या गोळ्या, दारू, हेरॉईन यासारख्या काही अमली पदार्थांचा समावेश होतो. दुसरा प्रकार म्हणजे उत्तेजक (स्टिम्युलेन्ट्स) पदार्थ यात निकोटिन, ॲफेटामिन यासारखे पदार्थ येतात. भारतात तंबाखूचा वापर त्यातील निकोटिनद्वारे उत्तेजन मिळवायला केला जातो असे रुग्णांवर मानसोपचार करताना आढळते. अनेक वेळा तंबाखूने सुरू झालेले व्यसन हळूहळू इतर अमली पदार्थांपर्यंत जाऊन पोहोचते. उपचारांदरम्यान अनेकवेळा व्यसनाच्या बाबतीत बोलताना रुग्ण सांगतात की आम्ही हेरॉईनच्या जोडीला तंबाखूचे सेवन करतो, ज्याने नशा वाढते.

वरील सर्व चित्र भयावह असले तरी देखील एक जागतिक आरोग्य संघटना, विविध देशांतील सरकारे, निरनिराळ्या सामाजिक संस्था यांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे या व्यसनांच्या विरोधात वातावरण तयार होताना दिसते. तंबाखूच्या व्यसनाला मधल्या काळात लाभलेली प्रतिष्ठा आणि समाजमान्यता असली तरी तंबाखूचा धोका हा शालेय पातळीवर जनजागृतीद्वारे आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. जनजागृतीच्या जोडीला शाळेच्या १०० मीटर आवारात तंबाखूजन्य पदार्थांची दुकाने लावण्यास मज्जाव आहे. त्यांना दूर नेण्यात आणि कायद्याची अंमलबजावणी करण्यात सर्व नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. पौगंडावस्थेतील मुलांना तंबाखूच्या किंवा इतर व्यसनांमुळे होणाऱ्या उपायांची शास्त्रशुद्ध माहिती मानसशास्त्रज्ञांद्वारे शाळांमधून दिली जाते. धूम्रशलाकांच्या डब्यावर मोठ्या आकारात मुखाच्या कर्करोगाचे भयावह चित्र प्रकाशित केले जाते. तसेच चित्रपट किंवा मालिकांमध्ये धूम्रपानाचा प्रसंग असल्यास त्यावेळी इशारा देणारी सूचना दाखविणे इत्यादी उपाय केले जातात. अनेक वृत्तपत्रांनी आणि माध्यमांनी तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिराती प्रकाशित करणे बंद केले आहे.

आजच्या विना तंबाखू दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी या व्यसनाविरुद्ध एकत्र येऊन लढण्याचा संकल्प करूया! ▮

(लेखक पुण्यात क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट आहेत.)
९५१८९३१३०८

## रविवारची पत्रे

### मोदींच्या परदेश दौऱ्याचे फलित!

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नुकताच यूएई, नेदरलॅण्ड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांचा दौरा आटोपत ऊर्जा, संरक्षण आणि प्रौद्योगिकी क्षेत्रात गेमचेंजर करार करत ऐतिहासिक निर्णय घेतले. इटली दौऱ्यात दोन्ही देशांनी १५ प्रमुख करार केले ज्यामध्ये रक्षा उद्योग, दुर्मिळ खनिजे, कृषी, समुद्री वाहतूक, समुद्री उत्पादने, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याचा समावेश आहे. दोन्ही देशांनी २०२९ पर्यंत द्विपक्षीय व्यापार २० अब्ज यूरोपर्यंत पोहोचवण्याचे लक्ष्य ठेवले आहे आणि रक्षा उद्योगासाठी एक डिफेन्स इंडस्ट्रियल फ्रेमवर्क जाहीर केले आहे, ज्याद्वारे हेलिकॉप्टर आणि समुद्री शस्त्रे यांसारख्या सैन्य उपकरणांचा संयुक्त विकास आणि उत्पादन होणार आहे.

मोदींच्या ताज्या यूएई दौऱ्यात भारत आणि यूएई दरम्यान ५ अब्ज डॉलर्सचे ऐतिहासिक करार झाले, ज्यामध्ये संरक्षण, ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचा समावेश आहे. या करारांमध्ये सामरिक संरक्षण भागीदारी (अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा संयुक्त विकास, गुप्तचर माहिती देवाणघावण, दहशतवादविरोधी सहकार्य), स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह (यूएई भारतात ३० मिलियन बॅरल कच्चे तेल साठवेल) आणि पुरवठा करार समाविष्ट आहेत. नॉर्वेमध्ये झालेला दौरा ४३ वर्षांनंतर एका भारतीय पंतप्रधानाचा पहिला दौरा होता आणि या दौऱ्यात भारत-नॉर्वे या दोन्ही देशांनी एकूण १२ करारांवर स्वाक्षरी केली. या दौऱ्यातील सर्वांत महत्त्वाची घोषणा म्हणजे द्विपक्षीय संबंध ‘हरित धोरणात्मक भागीदारी’’च्या स्तरावर आणण्यात आले. नॉर्वेने औपचारिकपणे इंडो-पॅसिफिक ओशन्स इनिशिएटिव्हमध्ये सहभागी होण्याची घोषणा केली, ज्यामुळे समुद्री सुरक्षेतील सहकार्य वाढेल आणि भारत-नॉर्वे डिजिटल विकास भागीदारीची सुरुवात झाली. नेदरलॅण्ड्सच्या तीन दिवसीय दौऱ्यादरम्यान डच पंतप्रधान रॉब जेटन यांच्यासोबत महत्त्वपूर्ण चर्चा केली आणि दोन्ही देशांनी आपले द्विपक्षीय संबंध व्यवहारिक भागीदारीवरून व्यूहात्मक भागीदारी पातळीवर नेण्यास सहमती दर्शवली. भारत-स्वीडन दुहेरी संबंधांना रणनीतिक सहमतीच्या स्तरावर नेणे, भारत-स्वीडन तंत्रज्ञान आणि एआय गलियारा सुरू करणे आणि पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचे ध्येय निश्चित करणे यांचा समावेश होतो.

मोदींच्या या पाच दिवसीय दौऱ्यात भारताला ऊर्जा सुरक्षा, महत्त्वपूर्ण खनिजे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संरक्षण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात लाख-कोटींचे ‘गेमचेंजर’ करार झाल्याने भारताचे आर्थिक आणि रणनीतिक महत्त्व वाढले आहे. मोदींच्या या कूटनीतिक यशाने भारताच्या जागतिक संबंधांमध्ये नवी चालना मिळाली असून, विकसित युरोपीय देशांशी आणि मध्यपूर्वेतील प्रमुख अर्थव्यवस्थांशी भविष्यातील सहकार्याचा पाया दृढ झाला आहे.

**पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री**/९४२३११९४७५

### मृत्यूचे ठेकेदार

तरुण भारततील शनिवारी ‘‘विषारी दारूचे १५ बळी; पाच जण गंभीर’’ ही पुणे-पिंपरीची बातमी आणि ‘‘टपऱ्यांवरील कारवाईत पोलिसांना मृत्यूचा बाजार दिसला नाही का?’’ हा हडपसर स्थानिक नागरिकांचा सवाल वाचून हातभट्टीवाल्यांना अभय देणारे सारेच मृत्यूचे ठेकेदार आहेत असे म्हणावेसे वाटते. उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्रकरणाच्या मुळाशी जा. पण आर्थिक हितसंबंधांचे खूळ लागलेल्या माणसांतील पशूंचे मूळ शेवटी किडलेल्या व्यवस्थेपाशीच सापडणार हे त्यांनाही माहीत असावे. मुळात हातभट्टीवाले आपला पसारा ज्या जागेत मांडतात ती उपलब्ध करून देणारे, तसेच दारूतील भेसळीसाठी स्पिरिट, मिथेनॉल मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देणारे हे पोलिस खात्यातील कर्मचाऱ्यांना माहीत नसतील हे अशक्य वाटते. तरीही गेली अनेक वर्षे हे व्यवहार राजरोस चालू ठेवून अखेर मृत्यूला हैदोस घालायला मोकळे रान देणारी व्यवस्था ही निवडून दिलेल्या कारभाऱ्यांच्या आशीर्वादानेच सुरक्षित व सुरळीत राहू शकते हे सांगायला कोणी अंतर्ज्ञानी असायची गरज नाही. तेव्हा भेसळीचे पदार्थ पुरवठा साखळीतील सोकावलेले मोकाट मारेकरी, त्यांना संरक्षण देणारे स्थानिक भाई, दादा आणि स्थानिक पोलिस यांची कसून चौकशी करून, आरोपींशी त्यांची ओळखपरेड घडवून संबंधितांवर सदोष मनुष्यवधासाठीची कठोर शिक्षेची कारवाई जलद न्यायालयात केली जावी. ▮

**श्रीपाद कुलकर्णी**/बिबवेवाडी, पुणे

# विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुद्ध तक्रार

## अनैतिक संबंधांना विरोध केल्याचा राग; विवाहितेचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.३० मे -**

बार्शी येथे वास्तव्यास असलेल्या विवाहित सुरय्या पठाण (वय ३५) यांनी पती अमीर पठाण, सासू राशीद पठाण, नणंद शमा इनामदार, नणंद नजमा सय्यद आणि आसमा काझी यांच्याविरुद्ध शारीरिक व मानसिक छळ, मारहाण, शिवीगाळ आणि धमकावल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल केला आहे.

सुरय्या पठाण यांचा विवाह दि. २४ फेब्रुवारी २०१३ रोजी अमीर पठाण यांच्यासोबत झाला होता. विवाहानंतर काही काळ संसार सुरळीत सुरु होता.

सप्टेंबर २०१३ पासून पती, सासू आणि नणंद शमा इनामदार यांनी परमिट रुम व्यवसायासाठी माहेरहून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केल्याचा आरोप केला आहे. पैसे आणण्यास नकार दिल्यानंतर शिवीगाळ, मारहाण, उपाशी ठेवणे तसेच सतत मानसिक त्रास देण्यात दिला. नणंद नजमा सय्यद हिनेही वेळोवेळी छळ केल्याचा आरोप केला आहे.

२०२५ पासून पती अमीर पठाण यांचे आसमा काझी या महिलेशी अनैतिक संबंध असल्याचा संशय सुरय्या पठाण यांना आला. याबाबत जाब विचारल्यानंतर पतीकडून शिवीगाळ व धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच आसमा काझी हिनेही शिवीगाळ करुन मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शिंदे फॅमिलीच्या चार पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

## गोकुळ शुगर इंडस्ट्रीज; १५.७२ कोटींचे फसवणूक प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मे -**

न्यायालयातील दिवाळखोरीचे प्रकरण लपवून ठेवून बी हेवी मॉलासेस व सी हेवी मॉलासेस खरेदी व्यवहारात चेन्नई येथील एका कंपनीची तब्बल १५ कोटी ७२ लाख ५० हजार रुपयाची फसवणूक केल्याप्रकरणी धोत्री येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड मधील शिंदे परिवारातील चार संचालकांविरुद्ध फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

गोकुळ शुगरचा संचालक गणपत दत्ता शिंदे, व्यवस्थापकीय संचालक दत्ता बलभीम शिंदे, संचालक विशाल गणपत शिंदे आणि सीएफओ कपील बलभीम शिंदे (रा. गोकुळ साखर कारखाना, धोत्री, ता. दक्षिण सोलापूर) अशी गुन्हा दाखल केलेल्या आरोपींची नावे असून याप्रकरणी



राजगोपालन श्रीनिवासन रामस्वामी (वय ५१, रा. रामनाथ नगर, प्लेयर कोविल स्ट्रीट, पॉलीचर, जिल्हा कानचीपुरम, तमिळनाडू) यांनी फिर्याद दिली आहे.

वरील आरोपींनी फिर्यादीच्या आयडी पॅरी इंडिया लिमिटेड, चेन्नई या कंपनीसोबत बी हेवी मॉलासेस व सी हेवी मॉलासेस पुरवठ्याबाबत करार केला होता. मात्र, गोकुळ शुगर इंडस्ट्रीजविरुद्ध एनसीएलटी, मुंबई खंडपीठ क्रमांक १ येथे दिवाळखोरीसंदर्भातील अंतिम आदेश २७ जून २०२४ रोजी झालेला असतानाही ही बाब कंपनीपासून लपवून १५ कोटी ७२ लाख ५० हजार रुपयांची आगाऊ रक्कम आरटीजीएसद्वारे ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँकेतील गोकुळ साखर कारखान्याच्या खात्यावर जमा करण्यात आली. मात्र, करारानुसार मालाचा पुरवठा केला नाही. तसेच आगाऊ रक्कमही परत करण्यात आली नाही. याशिवाय, आरोपींनी संगनमत करून संबंधित रक्कम इतर खात्यांमध्ये, तसेच गोकुळ शुगरचा संचालक गणपत दत्ता शिंदेच्या पत्नीच्या खात्यावर आणि युवा गारमेंट या व्यवसायाच्या खात्यावर वळती करून घेतली.

खात्यात शिल्लक नसताना पुढील तारखेचे धनादेश देऊन कंपनीची फसवणूक केली.हा प्रकार सप्टेंबर २०२४ पासून आजतागायत नवीपेठ येथील युवा गारमेंट येथे घडल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक डी. काळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



# कर्मवीर मामांनी उपेक्षितांचे अंतरंग जाणले

### प्राचार्या कमल ठकार; कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० मे -**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी ज्ञाननिष्ठा, समाजनिष्ठा आणि विद्यार्थीनिष्ठा आयुष्यभर जोपासली. त्यांनी उपेक्षितांचे अंतरंग जाणून घेऊन त्यांच्या विकासासाठी अवघे आयुष्य वेचले, असे प्रतिपादन माजी प्राचार्या कमल ठकार यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातर्फे डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ठकार बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार राजेंद्र राऊत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, सचिव प्रकाश पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, माजी प्राचार्य चंद्रकांत मोरे, सदस्य विष्णू पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

ठकार म्हणाल्या की, कर्मवीरांनी साधेपणा आणि आपली त्यागी वृत्ती जीवनभर जोपासली. आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे. मुलींनी शिकावे आणि पुढे जावे असा त्यांचा विचार होता. अध्यक्षीय समारोप करताना माजी आमदार राऊत म्हणाले की, डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण देण्याचे अनमोल असे काम केले आहे. तत्कालीन प्रतिकूल परिस्थितीतून शैक्षणिक संस्था उभा केली. आरोग्य क्षेत्रात केलेल्या कामगिरीने अनेकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते.

प्रास्ताविक सचिव प्रकाश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किरण गाढवे यांनी केले. आभार सहसचिव अरुण देबडवार यांनी मानले.

# जायचं होतं मुंबईला झोपेने नेले दिल्लीला!

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.३० मे-**

अकरावी प्रवेशासाठी जातो, असे सांगुन घराबाहेर पडलेला तरुण कोणाला काही न सांगता मुंबईला जाण्यासाठी रेल्वेत बसला. पण गाडीत गाढ झोप लागल्याने जाग आल्यानंतर चक्क मुंबईला पोचला. दुसरीकडे आपला मुलगा कोठे गेला या चिंतेत घरचे लोक पडले होते. मात्र दिल्लीत उतरल्यावर मुलाने फोन करुन आपले ठिकाण कळवल्यानंतर सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

महाळुंग (ता. माळशिरस) येथील ओम नानासाहेब मुंडफणे हा ११ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी घरातून बाहेर पडला. तो पुन्हा घरी आलाच नाही. चार दिवसांपुर्वी तो गेला होता. त्याला मुंबई येथील आपल्या मामाकडे जायचे होते. परंतु घरचे परवानगी देणार नाहीत म्हणून त्याने तडक पुणे गाठले व शिवाजीनगर रेल्वे स्थानकातून दिल्लीला जाणाऱ्या गाडीत तो बसला. परंतु रेल्वेमध्ये त्याला झोप लागल्याने मुंबई येऊन गेल्याचे त्याला कळले नाही, तो थेट दिल्लीला गेला. तिथे उतरल्यावर त्याने मी कुठे आलो, असे एकाला विचारले त्याने तू दिल्लीला आला आहेस; तुला कोठे जायचे आहे असे विचारल्यावर त्याने मुंबईला उतरायचे होते असे सांगितले. त्यावर त्या इसमाने पुन्हा मुंबईचे तिकीट काढण्याचा सल्ला दिला त्याप्रमाणे त्याने तिकीट काढले. रात्रभर तिथेच थांबला. दरम्यान एक इसम त्याच्याजवळ आला व त्याला तू ओम रेडे का असे विचारले. घाबरलेल्या ओमने हो म्हणत आपण कसे मला ओळखले असे म्हणताच त्या इसमाने त्यास व्हिडीओ कॉल करून त्याचे मामाशी बोलणे करून दिले. त्यानंतर त्या मामाच्या मित्राने ओमला विमानाचे तिकीट काढून दिले व ओम घरी परतला. एकूणच या खळबळ जनक नाट्याचा असा शेवट झाला .

# संभाजी ब्रिगेड पुन्हा एकसंघ

### संभाजी महाराज चौकात जल्लोष, कार्यकर्त्यांत नवचैतन्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मे-**

मराठा सेवा संघाची आक्रमक युवा संघटना म्हणून ओळख असलेली संभाजी ब्रिगेड पुन्हा एकदा एकसंध झाल्याने राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत सोलापूर शहर व जिल्ह्यातील संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ तसेच विविध कक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि. ३० मे) छत्रपती संभाजी महाराज चौकात विजय जल्लोष साजरा केला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी, फुलांची उधळण आणि घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

मराठा सेवा संघाची स्थापना पुरुषोत्तम खेडेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १ सप्टेंबर १९९० रोजी अकोला येथे केली होती. त्यानंतर १९९१ मध्ये संभाजी ब्रिगेडची स्थापना झाली. आज मराठा सेवा संघाच्या विविध ३३ कक्षांपैकी संभाजी ब्रिगेड हा एक प्रभावी आणि सक्रिय कक्ष म्हणून कार्यरत आहे.

'शिव-फुले-शाहू-आंबेडकरी' विचारसरणीवर आधारित संविधानवादी आणि परिवर्तनवादी युवकांची एक आक्रमक फळी म्हणून संभाजी ब्रिगेडने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सामाजिक सलोखा, जातीय ऐक्य आणि दंगली रोखण्यासाठी संघटनेने तळागाळात केलेले कार्य व्यापकपणे चर्चिले गेले आहे. त्यामुळे अठरापगड जातीतील हजारो युवकांसह मुस्लिम समाजातील तरुणही या संघटनेच्या विचारांकडे आकर्षित झाले.

राज्यात विविध सामाजिक आणि जनहिताच्या आंदोलनांमध्ये संभाजी ब्रिगेडने नेहमीच आघाडीची भूमिका बजावली. मात्र, सुमारे दहा वर्षांपूर्वी २०१६ मध्ये संघटनेत फूट पडली होती. सामाजिक कार्यावर भर देणारा एक गट आणि राजकीय भूमिका स्वीकारून निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होणारा दुसरा गट अशा दोन प्रवाहांत संघटना विभागली गेली होती. या विभाजनामुळे कार्यकर्त्यांचे संघटनात्मक बळ कमी



झाले होते तसेच वैचारिक आणि राजकीय संभ्रमही निर्माण झाला होता.

मात्र, दहा वर्षांनंतर ही दरी मिटवत पुण्यात नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात प्रमुख नेते प्रवीण गायकवाड, मनोज आखरे आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी एकत्र येण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे संभाजी ब्रिगेडची ताकद पुन्हा एकवटली असून राज्यभरातून त्याचे स्वागत होत आहे.

सोलापुरातील कार्यकर्त्यांनीही या एकीकरणाचे स्वागत करत संघटनेच्या आगामी सामाजिक, शैक्षणिक आणि परिवर्तनवादी चळवळींना नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. संघटनेची एकजूट ही समाजपरिवर्तनाच्या लढ्याला अधिक बळ देणारी ठरेल, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील उपाध्यक्ष सदाशिव पवार, संभाजी ब्रिगेडचे सोमनाथ राऊत, प्रकाश ननवरे, श्याम कदम, सचिन जगताप, गिरीश जगदाळे, किरण घाडगे,प्रदीप कणसे, संभाजी भोसले, बाळासाहेब बागल, प्रीती कदम अभिंजली जाधव, यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी जिजाऊ ब्रगडच्या महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रिकेट समर कॅम्पमध्ये १५ वर्षीय मुलाचा मृत्यू

## शिवशक्ती मैदानावरील घटना; प्रशिक्षकांवर निष्काळजीपणाचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ३० मे-**

बार्शी शहरातील शिवशक्ती मैदान येथे सुरु असलेल्या क्रिकेट समर कॅम्पमध्ये झालेल्या गंभीर अपघातात १५ वर्षीय आरव ऊर्फ विरेन चौधरी या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृत मुलाचे वडील योगीराज चौधरी यांनी संबंधित आयोजक, प्रशिक्षक व जबाबदार व्यक्तींविरोधात दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

आरव हा बार्शी येथील सुलाखे हायस्कूलमध्ये नववीत शिकत होता. उन्हाळी सुट्टीनिमित्त मातृभूमी प्रतिष्ठान बार्शी व बार्शी तालुका क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रिकेट



आरव चौधरी

समर कॅम्पमध्ये त्याने प्रवेश घेतला होता. कॅम्पसाठी त्याच्या पालकांनी ३,५०० रुपये शुल्क भरले होते. दररोजप्रमाणे शनिवार दि. ३० मे रोजी सकाळी तो सरावासाठी शिवशक्ती मैदानावर गेला होता. यावेळी क्रिकेट पिच दाबण्यासाठी वापरण्यात येणारा हाताने ओढण्याचा जड रोलर काही लहान मुलांकडून ओढून घेतला जात होता. त्याचवेळी आरवचा तोल जाऊन तो खाली पडला आणि त्याच्या अंगावर रोलर गेल्याने तो गंभीर जखमी झाला. यावेळी उपस्थितांनी त्याला तातडीने उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

मृत मुलाचे वडील योगीराज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, कॅम्पमध्ये सुमारे ३५० मुले सहभागी होती. एवढ्या मोठ्या संख्येने मुले उपस्थित असताना जड वजनाचा रोलर चालवण्यासाठी कोणताही तज्ज्ञ कर्मचारी किंवा जबाबदार प्रौढ व्यक्ती उपस्थित नव्हती. संबंधित प्रशिक्षक विवेक दुगम व अक्षय देबडवार हे मुलांपासून दूर उभे असल्याचा आरोपही केला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, अल्पवयीन मुलांकडून धोकादायक स्वरुपाचे काम करुन घेणे आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना न करणे हा गंभीर निष्काळजीपणा असून यामुळेच त्यांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे संबंधित प्रशिक्षक, आयोजक आणि जबाबदार व्यक्तींवर भा.न्या.सं. कलम १०५, ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिस तपास सुरु आहे.

**CHANGE OF NAME**

I AM CHANGING MY NAME FROM MISTRI BINUKUMARI GOPINATH TO **BINU GOPINATH MISTRI** OR PASSPORT ISSUANCE RESIDING AT 131, SWAMI VIVEKANAND NAGAR, HOTGI ROAD,HATTURE WASTI, SOLAPUR-413224 MAHARASHTRA.

**मध्य रेल्वे**

सोलापूर विभाग

विद्युत (TRD) काम

वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाईट www.ireps.gov.in वर ऑनलाईन ई-टेंडर मागवत आहेत. टेंडर क्रमांक . SUR/TD/T/2016/15 कामाचे नाव : बोरीबियाल येथे अतिरिक्त लूप लाईन्सच्या तरतुदीच्या संदर्भातील विद्युत कामाचा भाग. अंदाजित खर्च : २,४४,४२,४६१.७० बयाणा रक्कम / बिड सिक्युरिटी : ४,८८,९००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने ऑफरची वैधता : ६० दिवस वेबसाईटवर टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ: २९/०६/२०२६ रोजी १५.०० वाजता (दुपारी ३:०० वाजता).

२५ **वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता/सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.

## अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई : आयुक्त

**सोलापूर :** नियमबाह्य बांधकामांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असून अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचे कठोर कारवाईचे धोरण आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. महानगरपालिकेच्यावतीने शहरातील अनधिकृत बांधकामांवर सुरू असलेल्या कारवाईची आयुक्तांनी पाहणी केली. याप्रसंगी त्यांनी भूमिका मांडली. आयुक्तांनी २९ नवी पेठ येथील सुरतवाला यांच्या जागेवरील तसेच शुक्रवार पेठ येथील जवाहर शहा यांच्या ३९९४/क-२ या ठिकाणावरील अनधिकृत बांधकाम पाडकाम कारवाईची पाहणी केली.

**खरेदीपुर्व जाहिर नोटीस**

तमाम लोकास विशेषतः मौजे कुर्डु ता. माढा जि. सोलापूर येथील व परिसरातील रहिवाशांना ह्या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकत वर्णन जि. सोलापूर ता. माढा मौजे कुर्डु हद्दीतील गट नं. ५७५/१ क्षेत्र ०२.०६ आर पो. ख. ०० हे ०९ आर एकुण ०२ हे १५ आर यापैकी ००.८० आर मधले क्षेत्र. सदर मिळकत ही श्री. दादाराव गोरख माने यांचे कब्जे वहिवाटीची आहे. यासी चतुर्सिमा- पुर्वेस- गट नं. ५७६, पश्चिमेस- गट नं. ६१४, दक्षिणेस- गट नं. ५७५ पैकी, उत्तरेस- गट नं. ५७५ पैकी वरील चतु:सिमेतील वरील मिळकत खरेदी देण्याचे ठरवुन मालक यांना इसार देखील दिलेला आहे. तसेच वरील मिळकत हि निर्वेध व निजोखीम असल्याची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अगर बक्षीसपत्र, गहाणखत, दान, टाच, लिज, पोटगी, खरेदीखत, साठेखत, इसारपावती इत्यादी कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसाचे आत कागदपत्रानिशी व पुरावानिशी आमचे अशिलांना लेखी स्वरुपात हरकत कळावावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखीम आहे असे समजुन आमचे अशील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

हि खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली असे. दि. २९/०५/२०२६.

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. संतोष विष्णू इंगळे**
**कुर्डु ता. माढा जि. सोलापूर**

प्रति,
सन्माननीय सभासद (सर्व)
श्री. हरीओम मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., बाळे, सोलापूर
विषय :- थकबाकी रक्कम भरणा करणेबाबत...
संदर्भ :- १. मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर यांचेकडील जा.क्र. ३९११/२०२६, दि. १२/०३/२०२६ रोजीचे प्राधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश.

२. मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र. १५७१/२०२०, दि. २०/०५/२०२० रोजीच्या क वर्गातील सहकारी संस्थांचे समिती निवडणूक प्रक्रियेमध्ये अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना.

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उक्त विषयी, संदर्भ क्र. १ दि. १२/०३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. हरीओम मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., बाळे, सोलापूर या संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी म्हणून सौ. पी. आर. संकट, सहकारी अधिकारी श्रेणी १ यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यास अनुसरून, संदर्भ क्र. २ दि. २०/०५/२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सूचित केल्यानुसार संस्थेचे प्राथमिक/प्रारूप मतदार यादी मुदत संपण्याच्या दिनांकावर किंवा प्राधिकरणाने दिलेल्या अर्हता दिनांकावर तयार करावयाची आहे.

प्राथमिक/प्रारूप मतदार यादी तयार करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ (१) व कलम २७ अन्वये पात्र असावा.

संस्थेचे सचिव/व्यवस्थापक यांनी संस्थेने प्राथमिक / प्रारूप मतदार यादी तयार करताना संस्थेच्या ''आय'' रजिस्टरशी मेळ घेवून तसेच ''जे'' रजिस्टर नुसार तयार केल्यानंतर कायद्यातील कलम २७ (१०) प्रमाणे थकबाकीदारांची नावे वगळून तसेच कायद्यातील अन्य संबंधित तरतुदींचे पालन करूनच केली जावी. अशा सूचना प्राप्त आहेत.

करीता आपणास या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते की, श्री. हरीओम मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., बाळे, सोलापूर या संस्थेतील आपण सभासद असून आपली दि. ३१/०३/२०२६ अखेरची थकबाकी संस्थेचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सोलापूर शाखा बाळे येथील खाते क्र. ११०७०२७९०००२५२ या चालू खात्यावर दि. १५ जून २०२६ पूर्वी भरणा करावी. तद्नंतरच आपले नाव प्राथमिक /प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केले जाईल. अन्यथा आपले नाव वगळून प्राथमिक/प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सौ. पी. आर. संकद)**
**प्राधिकृत अधिकारी,**
**श्री. हरीओम मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., बाळे, सोलापूर.**
**मो. नं. ९५७९९०१२३०**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय: १४/३० तळमजला, बी. विंग, कटारे कॉम्पलेक्स
कॉम्प्लेक्स, गांधीनगर, बि.नं. १०, सोलापूर, MH-413006
CIN: L17119PN1980PLC022962
ई-मेल : katarespinningmills@gmail.com
Ph.: 0217-2376555

**३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे विवरण**

| अ. क्र. | विशेष | तिमाही समाप्त/ चालू वर्ष समाप्त ३१ मार्च २०२६ (ऑडिट केलेले) | मागील वर्षात संबंधित ३ महिने संपले ३१ मार्च २०२५ (ऑडिट केलेले) | चालू वर्षाचा शेवट ३१ मार्च २०२६ (ऑडिट केलेले) | वर्ष ते तारीख आकडे/ मागील वर्ष समाप्ती ३१ मार्च २०२५ (ऑडिट केलेले) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | 170.35 | 159.65 | 363.04 | 536.43 |
| 2 | निव्वळ नफा / (तोटा) कालावधीसाठी (कर आधी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम) | (69.17) | (71.37) | (157.36) | (201.55) |
| 3 | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंतर) | (69.17) | (71.37) | (157.36) | (201.55) |
| 4 | करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण आयटम नंतर) | (128.24) | (42.86) | (216.43) | (173.04) |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न या कालावधीसाठी नफा / (तोटा) यांचा समावेश आहे (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | (128.24) | (42.86) | (216.43) | (173.04) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 285.00 | 285.00 | 285.00 | 285.00 |
| 7 | मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) | | | | |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्य) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) - १. मूलभूतः २. पातळ केलेले: | (4.50) | (1.50) | (7.59) | (6.07) |
| | निव्वळ नफा / (तोटा) कालावधीसाठी (कर आधी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम) | (69.17) | (71.37) | (157.36) | (201.55) |
| | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंतर) | (69.17) | (71.37) | (157.36) | (201.55) |

**टीप:**

**अ)** उपरोक्त **31** मार्च **2026** रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी **SEBI** (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, **2015** च्या नियमन **33** अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये दाखल केलेल्या तपशीलवार आर्थिक परिणामांचा एक उतारा आहे. चे संपूर्ण स्वरूप **31** मार्च **2025** रोजी संपलेल्या तिमाहीचे आणि वर्षाचे आर्थिक निकाल स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** वेबसाइटवर आणि कंपनीच्या **www. katarespinningmillslimited.com** वर उपलब्ध आहेत.

**ब)** वरील आर्थिक परिणामांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने **30** मे **2026** रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

**ठिकाण - सोलापूर**
**तारीख - 30/05/2026**

**सही/-**
**किशोर कटारे**
**व्यवस्थापकीय संचालक**
**(DIN-00645013)**






## महत्त्वाचे

### गुलवीर सिंगने मोडला माईल शर्यतीचा विक्रम

**क्लीव्हलँड** : येथे आयोजित २४ व्या म्युझिक सिटी ट्रॅक कार्निव्हलमध्ये विजेतेपद पटकावताना भारताचा स्टार लांब पल्ल्याचा धावपटू गुलवीर सिंग हा माईल (१६०९ मीटर) शर्यत चार



मिनिटांपेक्षा कमी वेळेत पूर्ण करणारा पहिला भारतीय ठरला. पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत आशियाई क्रीडा स्पर्धेचा कांस्यपदक विजेता असलेला २७ वर्षीय गुलवीर सिंग, याने शनिवारी पुरुषांच्या १ माईल प्रो शर्यतीत ३ मिनिटे ५५.६३ सेकंदांची कौतुकास्पद वेळ नोंदवित विजेतेपद पटकावले. अमेरिकेचे प्रतिनिधित्व करणारा ख्रिस्तोफर नाईट ३ मिनिटे ५९.७२ सेकंदांच्या वेळेसह दुसऱ्या स्थानी राहिला, तर अमेरिकेचाच ट्रिस्टन ट्रेविनो ४ मिनिटे ००.२७ सेकंदांच्या वेळेसह तिसऱ्या स्थानी राहिला. वर्ल्ड ॲथ्लेटिक्स कॉन्टिनेंटल टूर चॅलेंजर हा कार्यक्रम अमेरिकेतील ली युनिव्हर्सिटीच्या क्लीव्हलँड कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आला होता. गुलवीर सिंग सध्या अमेरिकेत सराव करत असून, आगामी ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी तो तिथे विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत आहे.

### तरीही मी लढत राहीन : विनेश

**नवी दिल्ली** : आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरण्यात अपयश आल्यानंतर, अत्यंत व्यथित परंतु कणखर बाणा बाळगणाऱ्या विनेश फोगाटने भारतीय कुस्ती महासंघावर जोरदार हल्ला चढवला. भारतीय कुस्ती महासंघातीलच काही घटकांना आपण लवकर मरावे असे वाटते, असा गंभीर आरोप तिने केला; तसेच सर्व प्रतिकूल परिस्थितींविरुद्ध आपला लढा अविरत सुरू ठेवण्याचा निर्धारही तिने व्यक्त केला. जेव्हा माझा पराभव झाला, तेव्हा डब्ल्यूएफआयचे काही पदाधिकारी आनंदोत्सव साजरा करत होते. त्यांना आता खुशाल आनंद साजरा करू द्या. मी अत्यंत हट्टी आणि ध्येयवेडी आहे; आलेले अडथळे केवळ माझा निर्धार अधिकच बळकट करतात. मी नक्कीच जोरदार पुनरागमन करेन व प्रत्येकाची तोंडे बंद करेन, असे विनेश म्हणाली.

### भारतीय खेळाडूंनी जिंकली तीन सुवर्णपदके

**हाँगकाँग** : चीनमधील हाँगकाँग येथे सुरू असलेल्या आशियाई १९ वर्षांखालील ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताने आपल्या पदकांच्या संख्येत आणखी तीन सुवर्णपदकांची भर घातली. यामध्ये शनिवारी झालेल्या पुरुषांच्या लांब उडी स्पर्धेत भारताने पहिले दोन क्रमांक पटकावण्याचा मान मिळविला.



शाहनवाजने ७.८४ मीटरची सर्वोत्तम उडी घेत लांब उडीत सुवर्णपदक जिंकले. त्याने आपलाच देशबांधव जिथिन याला मागे टाकले; जिथिनने ७.६६ मीटरची सर्वोत्तम उडी नोंदविली होती. पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेतही भारताने सुवर्णपदक निश्चित केले. बसंतने २.२० मीटरची उडी नोंदवत या स्पर्धेतील सर्वोच्च सन्मान मिळवला. पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस (अडथळ्यांची शर्यत) स्पर्धेत निखिल चंद्रशेखरने सुवर्णपदक पटकावले. त्याने ९:२५.४४ सेकंदांची वेळ नोंदवत हे सुवर्णपदक आपल्या नावी केले. महिलांच्या २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत, आरतीने २४.१२ सेकंदांची वेळ नोंदवत कांस्यपदक मिळवले. दरम्यान, पियुष राज, तहुरा खातून, मोहम्मद अशफाक आणि नीरू पाठक यांचा समावेश असलेल्या मिश्र ४४०० मीटर रिले संघाने ३:२०.२४ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले होते; मात्र, लेनच्या नियमाचे उल्लंघन केल्यामुळे या संघाला नंतर अपात्र घोषित करण्यात आले.

### ओसाका-सबालेन्का चौथ्या फेरीत

**पॅरिस, ३० मे**

येथे सुरू असलेल्या फ्रेंच ओपन टेनिस. स्पर्धेत महिला विभागात जपानच्या नाओमी ओसाका व बेलारूसच्या आर्यना सबालेन्काने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय नोंदवित चौथ्या फेरीत प्रवेश केला. या दोघीही चौथ्या फेरीत एकमेकीं विरुद्ध उभ्या ठाकणार आहे. नाओमी ओसाकाने अमेरिकन किशोरवयीन इवा जोविकवर ७-६(५), ६-७(३), ६-४ असा संघर्षपूर्ण विजय मिळविला आणि तिने आपल्या कारकिर्दीतील पहिल्यांदाच फ्रेंच ओपनच्या चौथ्या फेरीत प्रवेश केला. आता तिचा सामना जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या आर्यना सबालेन्काशी होईल. आर्यना सबालेन्काने ऑस्ट्रेलियाच्या दारिया कासात्किनाला ६-0, ७-५ असे हरवून फ्रेंच ओपनच्या चौथ्या फेरीत. आपले स्थान निश्चित केले.

# मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट व जयहिंद कुर्डुवाडी संघांचा विजय





### रेल्वे स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मे-**

रेल्वेच्या ७९ व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत' शनिवारी खेळवल्या गेलेल्या सामन्यांम ध्ये मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट आणि जयहिंद कुर्डुवाडी संघांनी अनुक्रमे आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजयी घोडदौड केली.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या पहिल्या सामन्यात मध्य रेल्वे इन्स्टिट्यूटने पुष्प जिमखानावर १६ धावांनी मात केली. पुष्प जिमखानाने प्रथम फलंदाजी करताना मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट निर्धारित २० षटकांत ८ बाद १३० धावा केल्या. यामध्ये अभिषेक पवार (३०), सिद्धार्थ नाका (२७), विश्वनाथ मुंढे (नाबाद २५) आणि प्रवीण देशेट्टी (२१) यांनी योगदान दिले. पुष्प जिमखानाकडून प्रशांत घोडकेने १६ धावांत २ बळी घेतले, तर मयूर राठोड, अजय माने व प्रशांत काशिद यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१३१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पुष्प जिमखाना संघाला २० षटकांत ९ बाद ११४ धावांपर्यंतच मजल मारता आली. त्यांच्याकडून ओम जाधवने ३०, नदीम शेखने २३ आणि प्रशांत काशिदने १६ धावा केल्या. मध्य रेल्वेच्या वेदांत काळे (३/१६) आणि सिद्धार्थ नाका (३/२३) यांच्या भेदक गोलंदाजीमुळे पुष्प जिमखानाला पराभवाचा सामना करावा लागला. आदित्य दडेने २ तर शुभम मेडने १ बळी घेतला. अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या सिद्धार्थ नाका याला रेल्वेचे वरिष्ठ खेळाडू अतुल देशपांडे यांच्या हस्ते सामनावीर पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी वासुदेव दोरनाल, राजा पटेल, लियाकत शेख, गौतम बनसोडे आणि अंबादास तोरा उपस्थित होते. सोहेल शेख व अनिल सलगर यांनी पंच म्हणून, तर साई पवार यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

दुपारच्या सत्रात जयहिंद कुर्डुवाडीने नाईट रायडर्सवर ६ गडी राखून विजय मिळिवला. प्रथम फलंदाजी करताना नाईट रायडर्स ९१ संघाने २० षटकांत ७ बाद ११८ धावा केल्या. सोमेश्वर तंबाके (३५ धावा), शुभम कांबळे (३५ धावा) आणि राहुल बंदपट्टे (२१ धावा) यांनी संघाचा डाव सावरला. जयहिंद कुर्डुवाडीकडून समाधान जगतापने १४ धावांत २ बळी घेतले. तर सचिन सुरवसे, मकरंद जाधव व दिनेश कणसे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

११९ धावांचे लक्ष्य जयहिंद कुर्डुवाडी संघाने अवघ्या १३ षटकांत ४ गड्यांच्या मोबदल्यात १२१ धावा करत सहज पार केले. दिनेश कणसे (३१ धावा), मकरंद जाधव (३१ धावा) आणि रितेश कोनले (नाबाद २१ धावा) यांनी संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. नाईट रायडर्सकडून अमोल आलमेलकरने २, तर शुभम कांबळे व राहुल बंदपट्टे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

दिनेश कणसे याला नागेश्वर राव यांच्या हस्ते सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी विक्रांत पवार उपस्थित होते. महेश सोनवणे व अनिल सलगर यांनी पंच म्हणून, तर साई पवार यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

**आजचे सामने**

सकाळी : मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट, सोलापूर विरुद्ध जयहिंद कुर्डुवाडीदुपारी : विजापूर क्रिकेट क्लब विरुद्ध साऊथ सोलापूर आपटे रेड.

# रजत पाटीदारला एलिट गटात सहभागी होण्याची संधी

**◆ अहमदाबाद, ३० मे**

सलग दोन आयपीएल विजेतेपद पटकावणारे महेंद्र सिंह धोनी आणि रोहित शर्मा हेच केवळ दोन कर्णधार आहेत. रविवारी बंगळुरूचा रजत पाटीदार या दोघांच्या पंक्तीत जाऊन बसू शकतो.



रविवारी अहमदाबादमध्ये जेव्हा रजत पाटीदार रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचे नेतृत्व करत त्यांना सलग दुसऱ्या आयपीएल अंतिम सामन्यासाठी मैदानात घेऊन जाईल, तेव्हा त्याला सलग दोन आयपीएल विजेतेपद पटकावणाऱ्या कर्णधारांच्या एका अत्यंत प्रतिष्ठित यादीत सहभागी होण्याची संधी मिळेल. परंतु, या शिखराकडे जाणारा त्याचा प्रवास मात्र लक्षणीयरीत्या वेगळा राहिला आहे.

२०१०-११ मध्ये जेव्हा धोनीने चेन्नई सुपर किंग्ससाठी सलग दुसऱ्या विजेतेपदाची कामगिरी पूर्ण केली होती, तेव्हा त्याने स्वतःला एक खरा महान खेळाडू व कर्णधार म्हणून आधीच प्रस्थापित केले होते; कारण त्यापूर्वीच २००७ मध्ये त्याने भारताला टी-२० विश्वचषक जिंकवून दिला होता आणि २००९ मध्ये भारताला कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानी नेले होते. २०१९-२० मध्ये जेव्हा रोहित शर्माने मुंबई इंडियन्सला सलग विजेतेपद मिळवून दिले, तेव्हा तोपर्यंत तो अनेकदा आयपीएल विजेतेपद पटकावणारा कर्णधार, आशिया चषक जिंकवून देणारा भारतीय कर्णधार आणि २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकात विक्रमी पाच शतके ठोकून संपूर्ण स्पर्धेवर आपली छाप पाडणारा खेळाडू ठरला होता. (वृत्तसंस्था)

# भारत-ऑस्ट्रेलिया महिला हॉकी मालिका बरोबरीत

**◆ पर्थ, ३० मे**



चार सामन्यांची महिला हॉकी मालिका बरोबरीत राखणारा भारतीय महिला संघ

येथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या चौथ्या आणि अंतिम मैत्रीपूर्ण सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाला ३-२ असा निसटता पराभव पत्करावा लागला; तरीही चार सामन्यांची ही मालिका भारताने २-२ अशी बरोबरीत सोडविवली. आगामी नेशन्स कप स्पर्धेच्या तयारीसाठी या दौऱ्यामुळे संघाला मोलाची गती मिळाली आहे.

या सामन्यात भारताने अत्यंत आक्रमक सुरुवात केली. सामन्याच्या अवघ्या दुसऱ्याच मिनिटाला नवनीत कौरने पेनॉल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या चरणात दीपिका सोरेंगने २३ व्या मिनिटाला अत्यंत सफाईदारपणे गोल केला. मध्यंतरापर्यंत भारताची ही २-० अशी आघाडी कायम होती.

तिसऱ्या चरणात ऑस्ट्रेलियाने जोरदार पुनरागमन केले. ॲबी विल्सन (४२ व्या मिनिटाला) आणि ऑलिव्हिया डाउन्सने (४४ व्या मिनिटाला) अगदी थोड्या अंतराने गोल करत सामन्यात बरोबरी साधली. सामन्याच्या अखेरच्या काही मिनिटांत कोर्टनी शोनलने (५८ व्या मिनिटाला) केलेल्या गोलमुळे यजमान ऑस्ट्रेलियाला ३-२ असा निसटता विजय मिळवता आला.

मालिकेतील पहिल्या सामन्यात पराभव पत्करावा लागल्यानंतरही, पुढील दोन सामने जिंकत संघाने जोरदार पुनरागमन केले. न्यूझीलंडमध्ये होणाऱ्या नेशन्स कप स्पर्धेने सुरू होणाऱ्या आगामी हंगामासाठी संघाने आपली तयारी आणि बांधणी सातत्याने पुढे चालू ठेवली आहे. (वृत्तसंस्था)

# सोलापूर स्पोर्टस्‌चा 'युनायटेड'वर दणदणीत विजय

### विजय चषक क्रिकेट स्पर्धा: दीपक राजुलचे झंझावाती शतक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मे-**

विजय चषक क्रिकेट स्पर्धेत शनिवारी सोलापूर स्पोर्ट्स ब संघाने युनायटेड इव्हनिंग संघाचा १० गडी राखून पराभव करत एकतर्फी विजय नोंदवला.

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर झालेल्या सामन्यात युनायटेड इव्हनिंगने दिलेले १३३ धावांचे आव्हान सोलापूर स्पोर्ट्सच्या सलामीवीरांनी अवघ्या ६.२ षटकांत एकही गडी न गमावता पूर्ण केले. यामध्ये सलामीवीर दीपक राजुल याने अवघ्या ३१ चेंडूंत नाबाद १०७ धावांची वादळी खेळी केली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा युनायटेड इव्हनिंग संघाचा निर्णय चुकला. सोलापूर स्पोर्ट्सच्या भेदक गोलंदाजीसमोर त्यांचा डाव पत्त्यासारखा कोसळला. आदित्य माने याने ७१ चेंडूंत ४२ धावा करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ लाभली नाही. सोलापूर स्पोर्ट्सकडून चेतन नराल आणि सार्थक कन्ना यांनी अचूक गोलंदाजी करत प्रत्येकी ३ बळी घेतले. त्यामुळे युनायटेड इव्हनिंगचा डाव ३९.३ षटकांत १३२ धावांवर संपुष्टात आला.

प्रत्युत्तरादाखल १३३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सोलापूर स्पोर्ट्सच्या सलामीवीरांनी मैदानावर धावांचा पाऊस पाडला. दीपक राजुलने पहिल्या चेंडूपासून आक्रमक खेळ करत अवघ्या ३१ चेंडूंत ८ चौकार आणि १२ षटकारांच्या मदतीने नाबाद १०७ धावा ठोकल्या. दुसऱ्या बाजूने त्याला समर्थ दोरनाल याने ८ चेंडूंत नाबाद २६ धावा करत मोलाची साथ दिली. या जोडीने ६.२ षटकांत १३६ धावा करत संघाला १० गडी राखून विजय मिळवून दिला. गोलंदाजीत ४ षटकांत केवळ १० धावा देत फलंदाजीत नाबाद शतक झळकावणाऱ्या दीपक राजुलला 'सामनावीर' घोषित करण्यात आले.

# खो-खो स्पर्धेत धाराशिव-ठाणे अंतिम फेरीत

### राज्य निमंत्रित महिला स्पर्धा : कबड्डीमध्ये मुंबई उपनगर, गंगाखेड, बारामती, सांगली उपांत्य फेरीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

राज्य निमंत्रित महिलांच्या खो खो स्पर्धेत ठाण्याचे ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशन व धाराशिवचे छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाने अंतिम फेरीत प्रवेश केला. कबड्डीमध्ये स्वराज्य स्पोर्ट्स क्लब मुंबई उपनगर, आनंदवन महिला संघ गंगाखेड (परभणी), बारामती स्पोर्ट्स क्लब व प्रोग्रेस अकॅडमी सांगली या संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला.



नार्थकोट प्रशालेच्या मैदानावर हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ यांच्या वतीने ही स्पर्धा सोलापूर जिल्हा कबड्डी व खो-खो असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने आयोजित केली आहे. खो-खो स्पर्धेतील उपांत्य सामन्यात दिव्या गायकवाड (४.00, २. ४0 मि. व ३ गुण), धनश्री कंक ( १.५0 मि. व ४ गुण) यांच्या अष्टपैलू खेळीमुळे ज्ञानविकास स्पोर्ट्स फाउंडेशनने ठाण्याच्याच शिवभक्त क्रीडा मंडळाचा १५-१३ असा पराभव केला. मध्यंतराची ७-४ ही आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली. शिवभक्तकडून रेश्मा राठोड (२.00, २. १0 मि. व २ गुण ) हिची लढत अपुरी ठरली.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात धाराशिवने रत्नागिरीच्या आर्यन स्पोर्ट्स क्लबवर ११-६ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळवला. अश्विनी शिंदे (३.५0 मि. व ३ गुण ) व सुहानी धोत्री (४ गुण व १. २0 नाबाद ) यांची अष्टपैलू खेळी संघास सहज विजय मिळवून दिली. रत्नागिरीकडून पायल पवार (१. 00 मि. व २ गुण) हिचे एकाकी प्रयत्न अपुरे पडले

कबड्डीच्या साखळी सामन्यात बारामतीने वैष्णवी क्लब परभणी ५३-२२ अशी सहज मात केली यात निकिता लंगोटे व वैष्णवी चव्हाण यांच्या चढाई उत्कृष्ट झाल्या. दुसऱ्या सामन्यात आनंदवन महिला संघ परभणीने विश्वशांती क्रीडा मंडळ ३७-१२ असा विजय मिळिवला. यात कीर्ती ढीगोळे, लावण्य वाडेकर, आसफिया शेख व यशस्वी इंगोले यांच्या चढाया व शितल मगळे, कावेरी आडे यांच्या पकडी प्रेक्षणीय ठरल्या. अन्य एका सामन्यात निकिता कवडे व कोमल महाजन यांच्या चढायामुळे बारामती अकॅडमीने नाशिक महिला संघास ५३-२८ असे नमविले. स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने सोलापूर महिला संघास ५१-२५ असे हरविले. यात याशिका पुजारी, प्रज्ञा माने, संस्कृती माने यांच्या चढाया आणि सायली सपकाळ, सई ताम्हणकर व श्रद्धा अचलेरी यांच्या पकडी उल्लेखनीय ठरल्या. दुसऱ्या सामन्यात साकिब रंगरेज (चढाई) व अक्षदा पादव (पकड) यांच्या खेळीमुळे स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने प्रोग्रेसिव्ह स्पोर्ट्स क्लब ४0-२१ नमविले.

**अन्य निकाल :** क्रांतीजोत क्रीडा मंडळ विजयी विरुध्द सोलापूर महिला संघ ६१-२३.

आनंदवन महिला संघ परभणी विजयी विरुध्द नाशिक महिला संघ ४५-३६.

**असे होणार उपांत्य सामने**

स्वराज्य स्पोर्ट्स क्लब मुंबई उपनगर विरुद्ध आनंदवन महिला संघ गंगाखेड परभणी. बारामती स्पोर्ट्स अकॅडमी बारामती विरुद्ध प्रोग्रेस अकॅडमी सांगली.

# अक्कलकोटमध्ये वटवृक्ष क्रिकेट लीग २ जूनपासून

**विजेत्या संघाला ४५ हजार ५५५ चे बक्षीस व चषक**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० मे-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांच्या वतीने मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील मैदानावर वटवृक्ष टफर्फ क्रिकेट लीगचे आयोजन केल्याची माहिती आयोजक संदीप केत आणि स्वराज वाले यांनी दिली.

याचे उद्घाटन २ जूनला सायंकाळी ५ वाजता नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी झाले आहेत. सर्व सामने ६ षटकांचे व लीग पध्दतीने खेळवले जातील. प्रत्येक संघात ८ + १ खेळाडू असतील. विजेत्या संघाला प्रथम तीन संघास अनुक्रमे रु.४५ हजार ५५५/-, २५ हजार ५५५/ व १५ हजार ५५५/-चे पारितोषीक नगरसेवक महेश इंगळे यांच्या वतीने देण्यात येणार आहे. सर्व सामने सायंकाळी ५ ते रात्री १0 या वेळेत खेळवले जातील. जास्तीत जास्त संघांनी या स्पर्धेत भाग घेऊन खेळाचा आनंद लुटावा.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

या लीगच्या उद्घाटन सोहळ्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत १0 वी आणि १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न होईल, अशी माहिती युवा नेते प्रथमेश इंगळे यांनी दिली.

# टायगर्स आणि रॉयल्स संघांचा विजय; मास्टर्स क्रिकेट अकादमी आंतर अकॅडमी क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

मास्टर्स क्रिकेट अकादमी आयोजित आंतर अकॅडमी क्रिकेट स्पर्धेत टायगर्स आणि रॉयल्स संघांनी विजय मिळिवले.

मास्टर्स अकॅडमी या क्रीडांगणावर या स्पर्धेचे उद्घाटन राजू बंदपटे, दत्तात्रय बडगु व राजवर्धन जिल्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पहिला सामना टायगर्स विरुद्ध चॅलेंजर्स यांच्यात खेळवला गेला. टायगर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना २0 षटकात ९ गडी बाद ११३ धावा केल्या. त्यात श्लोक मंगळवेडेकर याने २0 धावांचे योगदान दिले. चॅलेंजर्स संघाकडून गोलंदाजी करताना आर्यन निंबाळकर



याने ३ षटकात ९ धावा देत ४ बळी मिळवले. प्रत्युत्तरात ११४ धावांचा पाठलाग करताना टायगर्स संघाने १८ षटकात ७ गड्यांच्या मोबदल्यात लक्ष्य पूर्ण केले. त्यात वेदांत अकेन याने नाबाद ३१ धावा आणि विराज वाडेकर याने २0 धावा केल्या. चॅलेंजर्स संघाकडून गोलंदाजी करताना सक्षमने ४ षटकात २३ धावा देत ३ बळी, तर आदित्यने ३ षटकात १७ धावा देत २ बळी मिळवले. टायगर्स संघाने हा सामना ३ गडी राखून जिंकला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल आर्यन निंबाळकर याला सामनावीर घोषित करण्यात आले.

दुसरा सामना मास्टर्स रॉयल्स विरुद्ध मास्टर्स वॉरियर्स यांच्यात पार पडला. रॉयल्स संघाने प्रथम फलंदाजी करताना १२.२ षटकात सर्वबाद ६८ धावा केल्या. त्यात कृतिकेश नायडू याने १९ धावा केल्या. वॉरियर्स संघाकडून गोलंदाजी करताना अयान नदाफ याने ३.२ षटकात १२ धावा देत ५ गडी बाद केले, तर सक्षमने २ षटकात १0 धावा देत २ बळी मिळवले. ६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वॉरियर्स संघाचा डाव ६४ धावांवर संपुष्टात आला. त्यांच्याकडून श्रीहान कोडंम याने २४ धावा केल्या. रॉयल्स संघाकडून गोलंदाजी करताना आर्यन कंदलगावकर याने २.१ षटकात ८ धावा देत ३ बळी मिळवले. तसेच निखिल बिराजदारने २ षटकात ५ धावा देत २ बळी आणि श्लोकने ४ षटकात १३ धावा देत २ बळी मिळवले. हा सामना रॉयल्स संघाने ४ धावांनी जिंकला. या सामन्यात आर्यन कंदलगावकर याला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### मोडनिंब येथे भाजपाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**मोडनिंब, दि. ३० मे-**

मोडनिंब (ता.माढा) येथे भाजप युवा मोर्चा माढा तालुक्याच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. जिल्हा दूध संघाचे चेअरमन तथा भाजप नेते रणजीत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, भाजप नेते वैभव मोरे यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी सन्मान करण्यात आला. नूतन शहर मंडल निवडीकरिता अनिकेत गुरव व अमोल सरडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पवन गिड्डे यांना नवीन नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी भाजप तालुका महिला मोर्चा अध्यक्षा अर्चना सावंत, भाजप शहराध्यक्षा मनिषा गिड्डे तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.



### सांगोल्यात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**सांगोला, दि. ३० मे-**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती सांगोल्यात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित व्याख्यानात डी.जी.देशपांडे यांनी 'सावरकर-जीवन, कार्य आणि प्रेरणा' या विषयावर मार्गदर्शन करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे राष्ट्रप्रेम, अंदमानातील अमानुष छळाला सामोरे जाण्याचे अद्वितीय धैर्य तरुण पिढीसाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. याप्रसंगी इ.१० व १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार, गट विकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवाजी गायकवाड, नगरसेविका आशा यावलकर, उत्सव समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीनाथ बीडीकर, खजिनदार निलेश ताकभाते, प्रसिद्धी प्रमुख डॉ. मानस कमलापुरकर, नागेश जोशी, श्रीकांत देशपांडे, श्रीकांत हसबनीस, कौस्तुभ भोसेकर, संजय हसबनीस, गणेश देशपांडे, मंगेश कुलकर्णी, श्रीनिवास देशपांडे, ॲड. विशाल बेले, ॲड. सारंग वांगीकर, सचिन बेले, ओंकार कुलकर्णी, तेजस कुलकर्णी, कुमार कुलकर्णी, रवी कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, समर्थ देशपांडे, मंथन बेले, शेखर देशपांडे, सचिन देशपांडे, उदय पुजारी, सुदीप बेले, अनिल देशपांडे, प्रा.राजेंद्र ठोंबरे, प्रा.भगवंत कुलकर्णी, केदार जोशी, श्रीहरी कुलकर्णी, अनिता बेले, सुमेधा वांगीकर, सानिका जोशी, रेणुका लहुळकर, नम्रता जोशी, वैशाली बेले, शेंडेकर, अक्षय बाबर उपस्थित होते. सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी केले.

### उदय माने यांचा शिवसेनेत प्रवेश

**मोडनिंब, दि. ३० मे-**



टेंभुर्णी (ता.माढा) येथे शिवसेना (शिंदे) पक्षाच्या पदाधिकारी मेळावा व नवीन पदाधिकारी निवड कार्यक्रम पार पडला. यावेळी उदय माने यांनी भाजप सोडून शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केला. मेळाव्यास उद्योगमंत्री उदय सामंत, शिवसेना उपनेते शेवाळे, माढा लोकसभा संपर्कप्रमुख चंद्रहार पाटील, खासदार ज्योती वाघमारे, माढा तालुका शिवसेना नेते संजय कोकाटे, माजी आमदार शहाजीबापू पाटील तसेच माढा व करमाळा तालुक्यातील पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेशानंतर बोलताना उदय माने यांनी सांगितले की, 'माढा तालुक्यात गाव तिथे शिवसेनेची शाखा उभारण्याचा संकल्प आहे. बूथप्रमुख, गटप्रमुख व बीएलए नियुक्तीचे काम पूर्ण करून पक्ष संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. पक्षवाढीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना अधिक बळकट करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुक्याचे नेते संजय कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक काम अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धारही व्यक्त केला.

### जयवंत कोकाटे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. ३० मे-**

सोलापूर जनता सहकारी बँकेचे शाखाधिकारी जयवंत कोकाटे हे प्रदिर्घ ३६ वर्ष सेवेनंतर आज निवृत्त झाले. त्यानिमित्त शाखेत पालक संचालक पुरुषोत्तम उडता यांचे हस्ते सत्कार करण्यात आले.त्यावेळी त्यांचे परिवार,मित्र,बँकेचे ग्राहक,कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

बँकेचे खातेदार लक्ष्मीकांत दंडी यांनी बँकेमुळे मी घडलो.३६ वर्षाचा प्रदीर्घ सेवेत ग्राहक आपले दैवत असतो. ग्राहकाला त्याचे समाधान होईपर्यंत उत्तर द्यावे, हा पण जपल्याचे सांगितले. यावेळी पुरुषोत्तम उडता, काकासाहेब कुलकर्णी, आकुडे, बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले. आबात्तिनी, खुराडकर, आकूडे, चिलका, गोप यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन महेश लिंगमपेठ यांनी केली.आभार प्रदर्शन चिलका यांनी केले.

## निधन वृत्त...

### जालिंदर कचरे



**पिलीव, दि. ३० मे-**

माळिशरस तालुक्यातील कुसमोड येथील जालिंदर रामा कचरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# कासेगावचे कृषी सहायक अमोल देवकर निलंबित

## पुणे विभागीय कृषी सहसंचालक दतात्रय गावसाने यांची कारवाई; ग्रामस्थांच्या लढ्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३० मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील कृषी सहायक अमोल देवकर यांनी शेतकऱ्यांशी उद्धट वर्तन करून त्यांना अश्लिल भाषेत शिवीगाळ केल्याप्रकरणी कृषी सहायक देवकर यांचे निलंबन केले आहे. पुणे विभागीय कृषी सहसंचालक दतात्रय गावसाने यांनी ही कारवाई केली आहे.

देवकर यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी कासेगाव ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, तालुका पोलीस व तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन दिले होते. निवेदनाची दखल घेऊन तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांनी वरिष्ठ कार्यालयात देवकर यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार गावसाने यांनी ही कारवाई केली. कृषी सहायकाच्या वर्तनाचा निषेध म्हणून शुक्रवारी २९ मे रोजी कासेगाव येथे खरीप हंगाम विस्तार मोहीम कार्यक्रमावर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकला होता. त्यामुळे कृषी विभागाने याची दखल घेऊन देवकर यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करीत निलंबन केले आहे. निलंबन काळात उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

कासेगाव येथील शेतकऱ्यांची देवकर हे गावात येत नाहीत, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत नाहीत आणि व्हॉट्सॲप ग्रुपवर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत नाहीत, अशी तक्रार केली होती. या तक्रारीबाबत विचारणा केली असता देवकर यांनी संबंधित शेतकऱ्यांना अतिशय अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या घटनेची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. सरपंच यशपाल वाडकर यांनीही कृषी सहाय्यक अमोल देवकर यांच्या कार्यपद्धतीबद्दल तक्रारी केल्या होत्या. कासेगाव ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेत ही निलंबनाची कारवाई केल्याचे सांगण्यात येते.

**मंद्रूपच्या मंडल कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई कधी ?**

मंद्रूपचे मंडल कृषी अधिकारी किरण सावंत मंद्रूपच्या कार्यालयाला दांडी मारून शासनाची फसवणूक करीत आहेत. विविध शासकीय योजनांच्या लाभासाठी शेतकरी आल्यानंतर मंडल कृषी अधिकारी गैरहजर असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासकीय योजना कागदावरच राहिल्या आहेत. कार्यालयाला दांडी मारून शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवणाऱ्या मंडल कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार? असा सवाल उपस्थित होत आहे.

# झिंजेवस्ती येथील युवकाचा अपघाती मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० मे-**



माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील अरबाज बबलु मुलाणी ( वय २२) हा पिलीवहुन मळोली ह्या मामाच्या गावी दुचाकी ( एम एच बिके ८७२२) वरून जात असताना संध्याकाळी ७.३० च्या दरम्यान डॉ. पठाण यांच्या हॉस्पीटलजवळ उभ्या असणाऱ्या ट्रॉलीला जोराची धडक दिली. अपघातात डोक्याला गंभीर दुखापत होऊन प्रचंड रक्तस्त्राव झाला.

त्याला अकलूजमधील खाजगी रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले. याची नोंद माळशिरस पोलीस ठाण्यात झाली आहे.

तपासपोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार स्वरुप शिंदे हे करीत आहेत. अरबाजच्या वडीलांचे सहा वर्षांपुर्वी निधन झाले आहे. त्याचे वर्षापूर्वीच लग्न झाले असून अजुन मूलबाळही नाही त्याच्या पश्चात आई, पत्नी, बहीण असा परिवार आहे.



# बंधुभाव, शांततेचा संदेश देत ईद साजरी

## बार्शीतील विविध ईदगाहांमध्ये सामूहिक नमाज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० मे -**

इस्लाम धर्मातील बकरी ईद सण बार्शी शहरात २८ मे रोजी साजरा करण्यात आला. देशात शांतता, सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ होण्यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली.

सकाळी शहरातील विविध ईदगाह व मशिदींमध्ये मुस्लिम मोठ्या संख्येने एकत्र आले. सामूहिक नमाज पठण केले. नाईकवाडी ईदगाह येथे इमाम व खतिब मौलाना अन्वारुल हक यांचा नाईकवाडी परिवाराच्या वतीने वसीम नाईकवाडी यांच्या हस्ते सत्कार केला. त्यानंतर मौलानांच्या नेतृत्वाखाली सामूहिक नमाज पठण केले. नमाजानंतर एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छांची देवाणघेवाण केली.

ईदगाहचे व्यवस्थापक शफीक नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पिण्याच्या पाण्यासह विविध आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. यासाठी फारुक नाईकवाडी, तौफिक नाईकवाडी, वसीम नाईकवाडी, नदीम नाईकवाडी, माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, प्राचार्य अब्दुल रहेमान शेख, उद्योजक इक्बाल पटेल, इम्तियाज तांबोळी आणि आदम तांबोळी यांचे विशेष सहकार्य लाभले. मलिक ईदगाह येथे मौलाना सैफ मदनी यांच्या नेतृत्वाखाली, तर निजामुद्दीन ईदगाह येथे मौलाना मुफ्ती सलामत यांच्या नेतृत्वाखाली नमाज पठण केले.

**पोलिसांचा दिवसभर चोख बंदोबस्त**

ईद निमित्त शहरात शांतता व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तहसीलदार एफ. आर. शेख, विभागीय पोलिस अधिकारी अंजना कृष्णा, शहर पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे, नगर परिषद मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, शब्बीर वस्ताद यांनी सहकार्य केले.

# पंढरपूर पोलिसांचा डिझेल चोरांना दणका; ८ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपर, दि. ३० मे-**



येथील तालुका पोलिसांनी डिझेल चोरी प्रकरणी कारवाई करीत सुमारे ८ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एकाला ताब्यात घेतले असून त्याच्या इतर दोन साथीदारांचा शोध घेतला जात असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

तुंगत येथे २६ मे रोजी रात्री विशाल भोसले यांचे ट्रकमधून तिघे जण ब्रीजा गाडीमध्ये डिझेलचे ड्रम ठेवून फायबरच्या पाईपच्या साह्याने ट्रकमधून डिझेल चोरी करीत होते.त्यांनी तीन ड्रम डिझेल चोरी केली. त्यानंतर ट्रक मालक विशाल भोसले यास संशय आल्यानंतर त्यांनी ब्रिझा गाडीचा पाठलाग केला. ब्रिझा गाडी गुरसाळे बायपासला आल्यावर तेथे समाधान गुटाळ याचे हॉटेलसमोरील गाडीच्या बाजूला ब्रिझा गाडी लावून तेथेही तिघांनी तेथील ट्रकला प्लास्टिक पाईप लावून टाकीतून डिझेल चोरी करीत होते. परिसरातील लोकांनी आरडाओरडा केल्याने दोघे पळून गेले. यावेळी एका व्यक्तीला लोकांनी पाठलाग करून पकडले. पंढरपूर तालुका पोलिसांना याची माहिती दिली. त्यानंतर पंढरपूर तालुका पोलिसांनी घटनेच्या ठिकाणी जाऊन चोरी केलेले डिझेल , ब्रिजा कार व तीन मोबाईल फोन असा एकूण ८ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी दत्तात्रय महारुद्र लोहार (रा. मोहोळ, ता. मोहोळ) याला ताब्यात घेतले. त्याच्यासह इतर दोन साथीदारांविरुद्ध डिझेल चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय. मुजावर, सहाय्यक पोलिस निरीक्षक अक्षय सोनवणे व शहाजी गोसावी, पोलिस उपनिरीक्षक विक्रम वाढणे, भारत भोसले, दत्तात्रय तोंडले, एएसआय विजू गायकवाड, हवालदार जाडकर, नितीन चौरे, सुजित उबाळे, हवालदार साळुंखे, संजय गुटाळ, मंगेश रोकडे, हवालदार योगीराज खिलारे, सुहास देशमुख, दीपक भोसले, अभिमन्यू गरड यांच्या पथकाने केली आहे.

**आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता**

मागील दोन महिन्यात तुंगत गुरसाळेर रोडवर डिझेल चोरीच्या अनेक घटना घडल्या होत्या. आजच्या कारवाईतून डिझेल चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



# २२ वर्षांनी माजी विद्यार्थ्यांनी दिला शाळेच्या आठवणींना उजाळा

## स्नेह, कृतज्ञता आणि आनंदाचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० मे-**

कृष्णानंद विद्यामंदिर पाटील वस्ती, अकलूज येथे आयुष्याचा धावपळीत हरवलेल्या शाळेच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देणारा २००३-०४ या वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा तब्बल २२ वर्षांनंतर आयोजित करण्यात आलेला स्नेह मेळावा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. गुरुजनांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत असल्याचे पाहून गुरूजनांना अभिमान वाटत होता. कुणी डॉक्टर, वकील,अभियंता, शिक्षक, उद्योग-व्यवसाय, प्रगतशील शेतकरी तर कुणी सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करत असल्याचे अनुभव माजी विद्यार्थ्यांनी मनोगतातून व्यक्त केले. यावेळी अश्विनी काटकर(मगर), लक्ष्मी जाधव(बागल), रणजित काळे, दत्ता काटकर, तुषार माने यांनी मनोगतातून व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्ष, प्रामाणिकपणा, मैत्री तसेच सामाजिक बांधिलकी याविषयी बहुमोल मार्गदर्शन करत 'विद्यार्थी कितीही मोठे झाले तरी त्यांचे शाळा आणि शिक्षकांची असलेले नाते कधीच संपत नाही' असे भावनिक उद्गार काढत 'माणुसकी, प्रामाणिकपणा आणि संस्कार यांची साथ कधीही सोडू नये' असा अनमोल संदेश दिला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून काशेट्टी, तर शेटे, जावळे, काळे, लोटके, एच. बी. मगर, एस. एस.भगत, पाटील खटावकर, नारायणकर, बागवानइ. शिक्षक वृंद तसेच लोंढे, मुलाणी, साळुंखे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रदीप राजगुरू, योगेश माने, रुपाली पवार यांनी केले तर आभार आशा गायकवाड यांनी मानले.

# एटीएस परीक्षेत श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ३० मे-**

मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय एटीएस परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवले.

परीक्षेत ५२ विद्यार्थी बसले होते त्यातील सर्व उतीर्ण झाले आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी जिल्हा व केंद्राच्या गुणवत्ता यादीत प्राविण्य संपादन केले आहे. इयत्ता दुसरीतील अथर्व यादव १६८/२०० गुण, सुयश यमगर १६४/२०० गुण, जान्हवी बिराजदार १५२/२०० गुण, सान्वी बिराजदार १४४/२०० गुण, राघव शिंदे १३०/२०० गुण, श्लोक गुरव १३०/२०० गुण, साईसमर्थ मंगरूळे १३०/२०० गुण, रुद्र स्वामी १३६/२०० गुण, कल्पक हरवाळकर १३०/२०० गुण, मनस्वी हाके १२८/२०० गुण मिळवले. तिसरीतील स्पृहा झाकणे २१२/३०० गुण, समृद्धी जवळगे २०४/३०० गुण, स्वर्णश्री माळवदकर २१४/३०० गुण, चौथीतील श्रावणी व्हनमाने २०२/३०० गुण असे यश मिळवले. गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना सिद्धाराम व्हनसुरे, श्रीदेवी पाटील, युवराज बिराजदार, सुनिता शेजाळे व ज्योती भालके यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे, अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, मुख्याध्यापक सचिन जाधव व सुधाकर कामशेट्टी आदींनी अभिनंदन केले.

# पंढरपुरात भाजपतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मे-**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त माजी आमदार प्रशांत परिचारकयांच्या हस्ते, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत वि.दा. सावरकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

यावेळी गट नेते भागवत बडवे, सुजित सर्वगोड, माजी नगराध्यक्ष नगरसेवक लक्ष्मणराव शिरसट, नगरसेवक ॲड सुनिल वाळूजकर, अमोल डोके, सौरभ थिटे, माजी नगरसेवक अनिल अभंगराव सर, शैलेश बडवे, ऋषिकेश उत्पात,गुरुदास अभ्यंकर, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष रोहित पानकर आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले की,स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती दरवर्षी २८ मे रोजी साजरी केली जाते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महान क्रांतिकारी, प्रखर राष्ट्रवादी नेते, थोर साहित्यिक आणि समाजसुधारक म्हणून सावरकरांचे योगदान अतुलनीय आहे.स्वातंत्र्य वीर सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे झाला. लहानपणापासूनच



त्यांच्यावर राष्ट्रभक्तीचे संस्कार झाले होते. त्यांनी 'मित्रमेळा' आणि नंतर 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संघटनांची स्थापना केली होती ब्रिटीशांविरुद्ध सशस्त्र उठाव केल्याबद्दल त्यांना दोन जन्म ठेपेची (५० वर्षे) शिक्षा सुनावून अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये पाठवण्यात आले होते. रत्नागिरीत स्थानबद्ध असताना त्यांनी जातिभेद दूर करण्यासाठी 'पतित पावन मंदिर' स्थापन केले आणि सहभोजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते. हिंदुत्व विचारसरणी असल्याने हिंदुत्व' या संकल्पनेचे त्यांनी मांडणी केली आणि भारताला एक मजबूत राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहिले. माझी जन्मठेप', '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' आणि 'कमला' यांसारखी अजरामर पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी मराठी भाषेला अनेक नवीन शब्द दिले. यावेळी मोहन मंगळवेढेकर, मालोजी शेंबडे, अक्षय देशपांडे, गुरु दोडिया, कृष्णा कवडे, गणेश शिंदे नाईक शिलरत्न झेंडे, विकी अभंगराव उपस्थित होते.

**गौरव दिन म्हणून २८ मे हा दिवस साजरा**

दरम्यान सावरकर यांची जयंती हा दिवस देशभरात विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने २८ मे हा दिवस 'स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला...' ही त्यांची काव्यरचना आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवते ही भावना व्यक्त केली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ६ जणांच्या हत्येप्रकरणी १२ जणांवर गुन्हा दाखल



## ‘कर्नाटक’च्या चडचण येथील घटना

## जमीन खरेदीच्या वादातून भीषण हत्यांकाड

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, ३० मे-**

जमिनीच्या वादातून सहा जणांची सामूहिक हत्या करण्यात आल्याची घटना कर्नाटक राज्यातील चडचण येथील भीमातीर परिसरातील गोविंदपूर येथे घडली. या सहा जणांपैकी पाच जण एकाच कुटुंबांपैकी आहेत. याप्रकरणी कल्लणगौड ईश्वरगौड पाटील यांच्यासह १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. शनिवारी शवविच्छेदनानंतर चडचण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

चंद्रकांत निराळे (वय-५५), दुंडप्पा निराळे (वय-६५), शिवपुत्र निराळे (वय-५८), राहुल निराळे (वय-२५), समर्थ निराळे (वय-२३), शब्बीर अत्तार (वय-४५) असे खून झालेल्यांची नावे आहेत. याबाबत चैतन्यकुमार दुंडप्पा निराळे यांनी फिर्याद दिली. उत्तर विभागाचे आयजीपी संदीप पाटील, जिल्हा पोलिस अधीक्षक लक्ष्मण निंबरगी यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

निराळे कुटुंबाने निवरगी येथील तेली कुटुंबाची जमीन विकत घेतली होती. जमिनीवरील काटेरी झुडपे काढून साफसफाईचे काम सुरू असताना आरोपींनी विरोध केला. यासंदर्भात न्यायालयात वाद सुरु होता. निकाल निराळे कुटुंबाच्या बाजूने लागला होता. दरम्यान, आरोपींनी पीडितांच्या डोळ्यांत तिखट पावडर फेकत धारदार शस्त्रांनी हत्या केली. विशेष पथकाद्वारे आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

### युवतीला पळवून नेऊन केला होता विवाह

तेली कुटुंबातील एका युवतीशी कल्लणगौड पाटील यांच्या मुलाने पळवून नेऊन विवाह केला होता. या वैमनस्यातून त्याचा ट्रॅक्टरखाली चिरडून खून केल्याचा गुन्हा नोंद आहे. त्या प्रकरणानंतर संबंधित जमीन अनेक वर्षे पडीक राहिली होती. पुढे ती जमीन निराळे कुटुंबाने खरेदी केल्यानंतर पुन्हा वाद निर्माण झाला आणि त्याचे रुपांतर या भीषण हत्याकांडात झाल्याचे सांगितले जात आहे.

# बार्शीतील फरार गुटखा माफियांचे पोलिसांनाच खुले आव्हान!

- १२ दिवसांत दुसरा गुन्हा दाखल
- २८ लाखांच्या कारवाईनंतरही गुटखा रॅकेट सुरुच
- आयपीएस अंजना कृष्णा यांची धडक कारवाई
- मुख्य आरोपी बिलाल तांबोळी पुन्हा जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० मे-**

बार्शीतील फरार गुटखा माफियांनी पोलिसांनाच खुले आव्हान दिल्याचे दिसून येत आहे. याद्वारे बार्शी शहर व तालुक्यातील गुटखा माफियांचे जाळे किती खोलवर रुजले आहे, याचा प्रत्यय पुन्हा एकदा समोर आला आहे. अवघ्या १२ दिवसांपूर्वी २८ लाख रुपयांच्या प्रतिबंधित गुटख्याच्या मोठ्या साठ्यावर धाड टाकून कारवाई करण्यात आली होती.

या प्रकरणातील मुख्य आरोपी बिलाल शब्बीर तांबोळी हा अद्याप फरार असतानाच त्याच्यावर गुटखा विक्री व साठवणुकीप्रकरणी दुसरा गुन्हा दाखल झाल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. उपविभागीय पोलिस अधिकारी आयपीएस अंजना कृष्णा यांनी स्वतः धडक कारवाई करत बिलाल शब्बीर तांबोळी व सरफराज शरीफ बागड यांच्या गोडाऊनवर छापा टाकला होता.

या कारवाईत सुमारे २८ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला होता. त्यानंतर संबंधित गोडाऊन सील करण्यात आले होते. मात्र या कारवाई नंतरही मुख्य आरोपी फरार राहिले. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या कारवाईनंतरही बिलाल तांबोळी याचा गुटखा व्यवसाय बंद न पडता अधिक जोमाने सुरु असल्याचे उघड झाले आहे.

वैराग येथील निंबाळकर गल्लीत प्रतिबंधित गुटख्याचा साठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर दि.२९ मे रोजी छापा टाकण्यात आला. पोलिस अंमलदार गणेश कानिफनाथ चव्हाण व त्यांच्या पथकाने अयाज मुहम्मद मुलाणी यांच्या घराची झडती घेतली असता विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याचा मोठा साठा आढळून आला.

या कारवाईत पोलिसांनी एकूण ८७ हजार ९२० रुपयांचा माल जप्त केला. याप्रकरणी अयाज मुहम्मद मुलाणी (वय-३०, रा.निंबाळकर गल्ली, वैराग, ता.बार्शी), बिलाल शब्बीर तांबोळी (रा.बार्शी) यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ तसेच भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद पोलिस हेड कॉन्स्टेबल पेठकर यांनी केली असून, वैराग पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल कंगले पुढील तपास करत आहेत. फरार आरोपीचा पोलिसांकडून कसून शोध सुरु आहे. दरम्यान, गुटखा माफियांनी पोलिसांना दिलेल्या आव्हान यावरुन विविध चर्चांना उधाण आले आहे.

### आरोग्याशी खेळणाऱ्या रॅकेटवर कारवाई

गुटखा विक्रीच्या माध्यमातून तरुणाई, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या रॅकेटवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांतून होत आहे.

### गुटखा माफियायाचे जाळे मजबूत

मुख्य आरोपी फरार राहून गुटख्याचा व्यवसाय कसा सुरु ठेवू शकला? त्याला संरक्षण किंवा मदत कोणाकडून मिळत होती? स्थानिक स्तरावर त्याचे जाळे किती मजबूत आहे? अशा चर्चांना उधाण आले आहे.



# मासिक पाळी ही नैसर्गिक प्रक्रिया : डॉ. अश्विनी घंटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मे-**

मासिक पाळी ही महिलांमध्ये घडणारी नैसर्गिक प्रक्रिया आहे. मात्र समाजामध्ये तिच्याबद्दल गैरसमज आहेत. ते दूर झाले पाहिजेत, असे प्रतिपादन डॉ.अश्विनी घाटे यांनी केले.

मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन दिननिमित्त सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अॅन्ड अॅक्टिव्हिटीज-पुणे, सपोर्ट फाउंडेशन-सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चर्चासत्रात त्या बोलत होत्या.

मासिक पाळीदरम्यान स्वतः च्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. डॉ.कल्याणी लोंढे यांनी मासिक पाळीदरम्यान होणारे आजार व त्यावरील उपाय याबाबत मार्गदर्शन केले.

शिवानी बिराजदार यांनी पॉवर पॉईटच्या माध्यमातून मासिक पाळी संदर्भातील मांडणी करून विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा घडवून आणली. सपोर्ट फाउंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कदम यांनी प्रास्तविक केले.

यावेळी महिलांनी व मुलींनी मासिक पाळीदरम्यान येणाऱ्या अडचणी व समस्या निसंकोचपणे मांडल्या. सपोर्ट फाउंडेशनच्या समन्वयक पल्लवी वडणे यांनी सूत्रसंचालन केले. सुवर्णा वाघमरे यांनी आभार मानले.

याप्रसंगी अनुसंधान ट्रस्ट साथी या संस्थेच्या प्रतिनिधी तब्बू नगारे, सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड अॅक्टिव्हिटीज पुणेच्या प्रतिनिधी सुवर्णा वाघमरे, उळे गावच्या सरपंच सुमित्रा कोळी उपस्थित होत्या.

# राजमाता अहिल्यादेवींचा विचारवारसा शिखर पहारिया फाउंडेशनने जपला : डॉ.शिंदे

### शिलाई मशीन, सायकलचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आयुष्यभर प्रजेचे हित हेच आपले अंतिम ध्येय मानले. त्यांचा विचारवारसा शिखर पहारिया फाउंडेशनने जपत आहे, असे गौरवोद्गार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे यांनी काढले.



राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनतर्फे आयोजित केलेल्या १० महिलांना शिलाई मशीन, १० विद्यार्थ्यांना सायकल वाटपप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य अजरामर आहे.

स्वतःच्या आयुष्यात अनेक दुःखांचे डोंगर पेलूनही त्यांनी जनतेसाठी अन्नछत्रे, विहिरी आणि मंदिरांची उभारणी केली. त्यांच्याच नावाने सोलापूर विद्यापीठ ओळखले जाते, ही अभिमानाची गोष्ट आहे, असेही ते म्हणाले. विचारमंचावर उद्योजक विनोद मोटे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, धर्मराज गुंडे, तनवीर शेख, राज सलगर, कौशल शिंदे, विजयराज जमदाडे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रत्येक जातीचे प्रतिनिधित्व : पांडव

## पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघ शिक्षा वर्गाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मे-**

‘‘देशातील प्रत्येक जातीचे प्रतिनिधित्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघात असून, पहिल्या टप्प्यात भूमीपुत्र असणाऱ्या हिंदू समाजाला राष्ट्रीय बनवावे लागेल. त्यानंतर मुस्लिम आणि ख्रिश्चनांनाही आम्हाला राष्ट्रीय बनवायचे आहे,’’ असे प्रतिपादन सामाजिक समरसता गतीविधीचे अखिल भारतीय मंडळ सदस्य रमेश पांडव यांनी केले.

येथील हरिभाई देवकरण प्रशालेत आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या संघ शिक्षा वर्गाचा समारोप सोहळ्या प्रसंगी रमेश पांडव बोलत होते. व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे विभागीय अध्यक्ष संजीव पाटील, महापौर विनायक कोंड्याल, वर्गाचे सर्वाधिकारी शशिकांत फिरंगे, शहर संघचालक राजेंद्र काटवें वर्ग कार्यवाह प्रशांत सहस्त्रबुद्धे उपस्थित होते. प्रारंभी भारतमाता आणि संत रविदास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

श्री. पांडव म्हणाले, ‘‘संघ कोणाचीही मूळ परंपरा किंवा ओळख न बदलता सर्वांना राष्ट्रीय बनवतो. संघात जैन, बौद्ध, कबीरपंथी, महानुभाव, वैदिक सगळे येतात आणि देशहिताचा विचार करतात. संघाच्या शाखेत भगवा झेंडा, शिवरायांचा फोटो असतो; तिथे गाणी, खेळ, भाषणे होतात. शाखेत देशभक्त कार्यकर्ता निर्माणाचे कार्य होते.’’

बेसावध अवस्थेतील हिंदू समाजाचे लचके तोडले जात आहेत. म्हणून समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुषाने शस्त्राचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. हिंदू समाजाने आता स्वतःचे बलस्थान जागृत करून संघटित झाले पाहिजे, असे मत पांडव यांनी व्यक्त केले. संजीव पाटील म्हणाले, ‘‘संघाला समाज मान्यता व त्यागाची परंपरा लाभली आहे. मन, मनगट आणि मेंदू मजबूत करण्याचे काम या संघ शिक्षा वर्गातून झाले आहे. इथल्या प्रशिक्षणातून घडलेले स्वयंसेवक पुढे शिक्षण, समाजकार्य आणि राजकारणात देशाचे नेतृत्व करतील. चांगला माणूस घडविण्याचे काम संघ करत आहे.’’ शासकीय सात जिल्ह्यांतील २१३ स्वयंसेवकांनी वर्गात सहभाग घेतला; ज्यामध्ये शेतकरी, व्यावसायिकांसह नोकरदारही होते. समारोप कार्यक्रमात दंड, नियुद्ध, समता, योगासन, घोष यांचे शिस्तबद्ध सादरीकरण स्वयंसेवकांनी केले. १५ मे ते ३० मे या काळात हा वर्ग आयोजित करण्यात आला होता. सोलापूर जिल्हा सहकार्यवाह संजीव सिद्धूल यांनी आभार मानले.




### रा.स्व.संघाचा आरक्षणाला पाठिंबा

पांडव म्हणाले, ‘‘उपेक्षित, वंचित आणि अनुसूचित जाती-जमातींच्या घटकांना समाजजीवनात सहभाग मिळणे आवश्यक होते. आरक्षण म्हणजे प्रतिनिधित्व, या धर्तीवर सर्वांना सहभाग मिळाला आहे. या घटकाला जवळ करून मुख्य प्रवाहात आणले, तर राष्ट्राची प्रगती होते. हा घटक गेली हजार वर्षे पिछाडीला पडला होता. जोपर्यंत आरक्षण घेणारा स्वतःहून आरक्षण नाकारणार नाही, तोपर्यंत आरक्षणाला पाठिंबा असेल, असे संघाचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी म्हटले आहे.’’

### डॉ.आंबेडकरांच्या डोळ्यासमोर हिंदू समाजच होता!

‘‘डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानासोबत हिंदू कोड बिलही लिहिले. हे बिल पास करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी अत्यंत आग्रह धरला होता. त्यांचे मित्र किचनेर यांना लिहिलेल्या पत्रात डॉ. बाबासाहेबांनी नमूद केले होते की, हिंदू कोड बिल हे या देशाच्या दृष्टीने संविधानापेक्षा १०० पट अधिक महत्त्वाचे आहे. म्हणजेच, जो कोणी या समाजात काम करतो, त्याच्या डोळ्यासमोर हिंदू समाजच असतो. संघाने हिंदू, हिंदुत्व, हिंदू राष्ट्र हे शब्द स्वतःचे नाहीत, ते परंपरेतच आहेत; संघ फक्त त्याचे स्पष्टीकरण देतो,’’ असे रमेश पांडव यांनी सांगितले.

# जनकल्याण मल्टीस्टेटच्या वर्धापन दिनानिमित्त सांस्कृतिक महोत्सव

## बुधवारी जनकल्याण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मे-**

जनकल्याण मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त जनकल्याण मल्टीस्टेट व जनकल्याण फाऊंडेशन, सोलापूर यांच्या वतीने १ ते ३ जून दरम्यान हुतात्मा स्मृती मंदिर येथे दररोज सायंकाळी ६ वाजता विविध सांस्कृतिक, मनोरंजनात्मक व गौरव सोहळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष राजेंद्र हजारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार, दि.१ जून रोजी सायंकाळी ६ वाजता सिने अभिनेते कांतीनाना मळेगांवकर व बालगायिका, टीव्ही स्टार सहयाद्री मळेगांवकर प्रस्तुत खेळ रंगला पैठणीचा-न्यू होम मिनिस्टर हा बहारदार कार्यक्रम रंगणार आहे.

मंगळवार, दि.२ जून रोजी सायंकाळी ६ वाजता सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई निर्मित संगीत शिवस्वराज्यगाथा हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुधवार, दि. ३ जून रोजी सायंकाळी ६ वाजता जनकल्याण राज्यस्तरीय गौरव २०२६ पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामश्री रियाल्टी सोलापूरचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी हे राहणार असून इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

सन २०१६ पासून समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तब्बल १०५ मान्यवरांना जनकल्याण मल्टीस्टेट व फाऊंडेशनच्या वतीने गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यंदाचे सर्व कार्यक्रम नागरिकांसाठी खुले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जनकल्याण मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र हजारे व मुख्य कार्यकारी अधिकारी आशा राजेंद्र हजारे यांनी केले.

### ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांचाही पुरस्काराने सन्मान

यंदाच्या जनकल्याण राज्यस्तरीय गौरव २०२६ पुरस्काराने अर्थ व सहकार क्षेत्रातील योगदानाबद्दल चंद्रशेखर देशपांडे, समाजप्रबोधन व आध्यात्मिक क्षेत्रातील कार्याबद्दल सन्मीता शिंदे व गणेश शिंदे, उद्योग क्षेत्रातील कार्यासाठी प्रसाद कुलकर्णी तसेच पत्रकारिता व डिजिटल मीडिया क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राजा माने यांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप मानाची शाल, फेटा, श्रीफळ, मानपत्र व सन्मानचिन्ह असे आहे.

जनकल्याण

# सोलापुरात अनधिकृत बांधकामांवर महापालिकेची कारवाई

## शहरात चार ठिकाणी राबविली पाडकाम मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये सामासिक अंतर (मार्जिन), पार्किंग जागा तसेच नियमानुसार खुल्या ठेवावयाच्या जागांमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर आज कारवाई करण्यात आली. या मोहिमेत चार ठिकाणांवरील वाढीव व अनधिकृत बांधकामांचे पाडकाम पूर्ण करण्यात आले.



भवानी पेठ येथील टी.पी. क्र. ०२, अंतिम प्लॉट क्र. ९० एच/३२ या ठिकाणी मिळकतदार रामकृष्ण मल्लिकार्जुन रंगदाळ व इतर यांच्या मालकीच्या इमारतीच्या रिअर मार्जिनमध्ये बांधण्यात आलेला जिना तसेच संडास-बाथरूमचे अनधिकृत बांधकाम हटविण्यात आले. या कारवाईसाठी संबंधित मिळकतदारांनी स्वतः ब्रेकर व मजूर उपलब्ध करून देत सहकार्य केले.

बालाजी नगर येथील श्रीकांत चोपडा आणि सलगरवाडी येथील सय्यद मदनी यांच्या अनधिकृत गाळ्यांवर कारवाई करण्यात आली. नेहरू नगर येथील पलवेचा तसेच विजय देशमुख नगर येथील पिरजादे यांच्या जागेवरील सामासिक अंतरातील वाढीव बांधकामे व बाल्कनीचे पाडकाम करण्यात आले.

तसेच बोलकोटे नगर येथील अशोक तांबोळू यांच्या वाढीव बांधकामाचेही निष्कासन करण्यात आले.

ही कारवाई आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. यावेळी उपअभियंता आनंद जोशी, सहायक अभियंता इरशाद जरतार, कनिष्ठ अभियंते बसवराज बडगा, गणेश काकडे, अनिरुद्ध गदगे, दयानंद अवताडे, प्रमोद गोविंदवार, तौसीफ सय्यद, अतिक्रमण विभागाचे दीपक कुंभार तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गौरी घोरपडेची नवी मुंबई पोलिस दलात निवड

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३० मे -**

परंडा येथील भटक्या वैदू समाजातील गौरी सुभाष घोरपडे हिची महाराष्ट्र पोलिस दलात नवी मुंबई येथे निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. परंडा नगरपालिकेचे नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्या हस्ते हा गौरव सोहळा पार पडला.



वडिलांचे छत्र नसताना आईने डोक्यावर टोपले घेऊन प्लास्टिकचे साहित्य विक्री करत मुलीचे शिक्षण पूर्ण केले. आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गौरीने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या जोरावर पोलिस भरतीत यश मिळवले. यावेळी नगरसेवक सत्तार पठाण, वाजीद दखनी, रत्नकांत शिंदे, बबू जिनेरी, तन्वीर मुजावर, माजी उपनगराध्यक्ष मुसा हन्नुरे, माजी नगरसेवक जावेद पठाण, इरफान शेख, संजय घाडगे, ॲड. संदीप शेळके, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दत्ता रणभोर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

तसेच वैदू समाजातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गौरीचे अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### महास्वामीजींचे आई तुळजाभवानी मातेचे घेतले दर्शन

**तुळजापूर, दि.३० मे -**

महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरात काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी सदिच्छा भेट देत आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. महास्वामीजी यांनी देवीच्या चरणी पूजा-अर्चा करून राज्याच्या सुख-समृद्धीसाठी व जनकल्याणासाठी प्रार्थना केली. मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी पंढरपूर मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार विजयकुमार देशमुख, सिद्धय्या स्वामी, नगरसेवक केदारनाथ उंबरजे तसेच मंदिरातील पुजारी वर्ग उपस्थित होता. दर्शनानंतर भाविकांनी महास्वामीजींचे आशीर्वाद घेतले. तुळजापूरच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे कौतुक करत मान्यवरांनी भाविकांसाठी सुरू असलेल्या विविध सुविधा व विकासकामांची माहिती जाणून घेतली.

### तुळजामाता इंग्लिश मीडियम स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तुळजापूर, दि.३० मे -**

महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत तुळजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या इयत्ता ५ वीतील १९ व इयत्ता ८ वीतील १३ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. इयत्ता ८ वीमध्ये रोहित प्रदीप शिंदे याने २४२ गुणांसह प्रथम, आयुष राजेश जगताप द्वितीय (२०८ गुण) व असावरी अविनाश क्षीरसागर तृतीय (१९४ गुण) क्रमांक पटकावला. इयत्ता ५ वीमध्ये विक्रांत दयानंद जाधव प्रथम (१९८ गुण), दिशा दिनेश बिरकुटे द्वितीय (१७० गुण) व वीर सुरेश गुरव तृतीय (१६४ गुण) ठरला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संभाजी भोसले, सचिव धनंजय पाटील, प्राचार्या लोध, मुख्याध्यापक राजेश जगताप यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



### आयटीएसई परीक्षेत रिशांक वारे राज्यात द्वितीय

**भूम, दि.३० मे -**

आयटीएसई २०२५-२६ स्पर्धा परीक्षेत भूम येथील साठे कोचिंग क्लासेसचा विद्यार्थी रिशांक मंगेश वारे याने इयत्ता दुसरी गटातून महाराष्ट्र राज्यात द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल २६ मे रोजी साठे कोचिंग क्लासेसमध्ये त्याचा सत्कार करण्यात आला. क्लासच्या संचालिका माधवी भरत साठे यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांसाठी नेहमी सज्ज राहावे तसेच विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात समन्वय असणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमास पालक जान्हवी वारे, आप्पासाहेब सोनटक्के यांच्यासह अन्य पालक उपस्थित होते.

## सीमाप्रश्नावर एकजुटीची गरज : आ. पाटील

### नवोदित मराठी साहित्य संमेलनात सीमाभागातील मराठी अस्मितेचा जागर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मे -**

सीमाभागातील मराठी बांधवांवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी आणि मराठी भाषा, संस्कृती, अस्मिता व स्वाभिमानाच्या रक्षणासाठी सर्व राजकीय पक्षांनी मतभेद विसरून एकत्र येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन स्वागताध्यक्ष आमदार कैलासदादा पाटील यांनी केले.

अखिल भारतीय साहित्य परिषद आयोजित ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन २०२६ अंतर्गत झालेल्या काव्यमैफलीत ते बोलत होते. संमेलनाध्यक्ष डॉ. नंदकुमार राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या साहित्य सोहळ्यात मराठी अस्मितेचा प्रभावी जागर अनुभवायला मिळाला. काव्यमैफलीचे सूत्रसंचालन अखिल भारतीय साहित्य परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी केले. चारोळ्या, विनोदी टिपण्या आणि आशयघन निवेदनातून त्यांनी साहित्याच्या सामाजिक जबाबदारीवर भाष्य केले. कवीच्या लेखणीत समाजपरिवर्तनाची ताकद असते, असे मत त्यांनी व्यक्त केले.



यावेळी अखिल भारतीय साहित्य परिषद, कर्नाटक राज्य शाखेच्या वतीने बेळगाव व बिदर जिल्ह्यातील कवी-कवयित्रींनी सहभाग नोंदविला. सीमाकवी रवींद्र पाटील यांनी सादर केलेल्या 'माय' आणि 'लढा' या कवितांनी विशेष दाद मिळवली. 'माय' कवितेत सीमाभागातील मराठी माणसांच्या सात दशकांच्या वेदनांना शब्द देण्यात आले, तर 'लढा' कवितेत न्याय, स्वाभिमान आणि अस्मितेसाठी सुरू असलेल्या संघर्षाचा बुलंद हुंकार उमटला.

किरण पाटील, रोशनी हुंद्रे, अपर्णा पाटील, संजीवनी खंडागळे, स्मिता आळतेकर, अशोक सुतार, चंद्रशेखर गायकवाड, पूजा सुतार, मनीषा नाडगौडा आणि स्नेहल बर्डे यांनी विविध सामाजिक विषयांवर आधारित कविता सादर करून रसिकांची मने जिंकली.

## विधान परिषद निवडणुकीत भाजप विरुद्ध काँग्रेस सामना

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मे -**

आगामी विधान परिषद निवडणुकीत धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजप आणि काँग्रेस यांच्यात थेट लढत होण्याची चिन्हे आहेत. महाविकास आघाडीच्या जागावाटपात हा मतदारसंघ काँग्रेसच्या वाट्याला आल्याने काँग्रेसला येथे कठीण परीक्षा द्यावी लागणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### काँग्रेससमोर मोठे आव्हान...

या मतदारसंघात एकूण ८८१ मतदार असून भाजपचे ३०१ मतदार आहेत. महायुतीची एकूण मतसंख्या सुमारे ५३७ असल्याचे सांगितले जाते. तर काँग्रेसचे १५५ मतदार असून महाविकास आघाडीची एकूण मतसंख्या २४१ आहे. त्यामुळे संख्याबळाच्या दृष्टीने महायुतीचे पारडे जड मानले जात आहे.

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मतदारसंघात १९९४ मध्ये नरेंद्र बोरगावकर विजयी झाले होते. त्यानंतर २०००, २००६ आणि २०१२ मध्ये दिलीपराव देशमुख यांनी सलग तीन वेळा विजय मिळवत हॅटट्रिक केली होती.

मात्र २०१८ च्या निवडणुकीत भाजपचे सुरेश धस यांनी विजय मिळवत हा मतदारसंघ भाजपकडे खेचून आणला.

भाजपकडून माजी आमदार बसवराज पाटील, अर्चना पाटील चाकूरकर, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्यासह अनेक इच्छुक मैदानात आहेत. सध्याच्या राजकीय परिस्थितीत बसवराज पाटील यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दुसरीकडे काँग्रेसकडून माजी आमदार धीरज देशमुख आणि नळदुर्गचे अशोक जगदाळे यांची नावे चर्चेत आहेत. काँग्रेसची उमेदवारी कोणाला मिळणार आणि निवडणुकीत कोणते राजकीय समीकरण आकार घेणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

मात्र निवडणुकीच्या राजकारणात शेवटच्या क्षणापर्यंत अनपेक्षित घडामोडी घडू शकतात, हेही तितकेच खरे आहे.

## सेवानिवृत्त पोलीस अधिकारी उमाकांत करपे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३० मे -**



तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी उमाकांत बाबुराव करपे (वय ७०) यांचे शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी ६ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि. ३०) सकाळी अणदूर येथील करपे मळा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, आई, एक मुलगा, एक मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. ते सोलापूर शहर पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे यांचे वडील होत.

## अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतील प्रकरणांचा तातडीने निपटारा करा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मे -**

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल झालेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक शुक्रवार (दि. २९ मे) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले तसेच समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

बैठकीत मार्च २०२६ अखेर झालेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. त्यानंतर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

मार्च २०२६ अखेर पोलीस तपासावर प्रलंबित असलेल्या २१ प्रकरणांपैकी आठ प्रकरणांत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून एका प्रकरणाचा निपटारा करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. अद्याप १२ प्रकरणे प्रलंबित असून २७ मे अखेर आणखी चार प्रकरणांत दोषारोप अहवाल दाखल करण्यात आल्याचे जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्य सचिवांनी सांगितले.

सद्यस्थितीत एप्रिल २०२६ अखेर एकूण २६ प्रकरणे तपासावर प्रलंबित आहेत. त्यापैकी २४ प्रकरणे ६० दिवसांच्या आतील असून दोन प्रकरणे ६० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपासून प्रलंबित असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी पूजार यांनी संबंधित विभागांनी तपास प्रक्रियेत गती आणून पीडितांना वेळेत न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रकरणांचा नियमित आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## कृषीदूतांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मे -**

धाराशिव तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि उत्पादनवाढीसाठी मार्गदर्शन व्हावे, यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषी महाविद्यालय आळणी (गडपाटी) येथील ६३ कृषीदूत व कृषीकन्या विविध गावांमध्ये कार्यरत होणार आहेत.

### धाराशिव तालुक्यात ६३ कृषीदूत व कृषीकन्या गावागावांत कार्यरत...

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पोकरा योजनेतील आळणी, खेड, हिंगळजवाडी, खामगाव, तेर, वरुडा आणि उपळा या गावांमध्ये विद्यार्थी वास्तव्यास राहून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. यावेळी बीज प्रक्रिया, माती परीक्षण, कीड व रोग व्यवस्थापन, आधुनिक शेती पद्धती तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

विद्यार्थी प्रत्यक्ष शेतात जाऊन प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती देणार असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत विद्यापीठाचे संशोधन व तंत्रज्ञान शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे आवाहन केले.

## खुदावाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३० मे -**

खुदावाडी येथे शेतकरी वाचनालय, ग्रामपंचायत कार्यालय आणि ग्रामस्थांच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.

हनुमान मंदिर परिसरात आयोजित कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजूरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत खुदावाडी गावाने अनेक गुणी व कर्तृत्ववान व्यक्ती घडवल्या असून यंदाच्या निकालात मुलींनी उल्लेखनीय यश मिळविल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सरोजिनी कबाडे होत्या. यावेळी अमोल नरवडे, वसंत चिंचोले, वसंत कबाडे, ब्रह्मानंद कापसे, महामुनी, जळकोटे, रेवणसिद्ध स्वामी, माशाळकर, मनोहर घोडके, तुकाराम बोंगरगे, दिलीप भालेराव, हणमंत इटलकर यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक, युवक, महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत लिपिक भास्कर व्हलदुरे, ग्रंथपाल आप्पाराव चिंचोले, मनोहर सांगवे, हरिदास गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.



## फार्मावीक २०२६ मध्ये गुणवंत विद्यार्थी व पालकांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मे -**

महाविद्यालयात आयोजित 'फार्मावीक २०२६' कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे उपायुक्त संजय राम गुरव यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी तांत्रिक कौशल्ये आणि इंटर्नशिपचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी शिस्त, अभ्यासातील सातत्य आणि कौशल्य विकास कार्यक्रमांची माहिती दिली.

यावेळी नामांकित कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच जीपॅट २०२६ परीक्षेत यशस्वी ठरलेल्या ओंकार गंजे व सुमित चोपडे तसेच विद्यापीठ परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

'फार्मावीक २०२६' अंतर्गत क्रिकेट, रांगोळी, मेहंदी, बॉलिवूड डे व ट्रॅडिशनल डे स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. फार्मसी विभागप्रमुख डॉ. प्रीती माने यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### आचारीच्या मुलीची मुंबई पोलिस दलात भरारी...

## प्रियंका भांडेची जिद्द ठरली यशाची गुरुकिल्ली

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३० मे -**

कष्टाला पर्याय नाही याची प्रचिती देणारे यश कळंब येथील प्रियंका शाम भांडे हिने मिळवले आहे. अवघ्या १९ व्या वर्षी तिने मुंबई पोलिस दलात निवड मिळवत आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीचे फळ मिळवले.

खाकी वर्दीचे स्वप्न उराशी बाळगून प्रियंकाने गेली तीन वर्षे सातत्याने कठोर परिश्रम घेतले. सकाळी लवकर मैदानावरील सराव, दिवसभर लेखी परीक्षेची तयारी आणि सायंकाळी पुन्हा शारीरिक सराव असा तिचा दिनक्रम होता. रात्री उशिरापर्यंत अभ्यास करून तिने पोलिस भरतीची तयारी केली.



प्रियंकाचे वडील शाम महादेव भांडे हे लग्नसमारंभ व विविध कार्यक्रमांत आचारी म्हणून काम करतात. आई राधाबाई भांडे या देखील त्यांना हातभार लावतात. आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून प्रियंकाने प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर हे यश संपादन केले.

तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून तिचे आणि तिच्या कुटुंबीयांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## 'मी रमाई बोलतेय' एकपात्री नाटिकेने प्रेक्षकांना केले भावूक

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० मे -**

शहरात त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'मी रमाई बोलतेय' या प्रभावी एकपात्री नाटिकेच्या सादरीकरणाने उपस्थितांना भावूक केले. बुधवारी रात्री नगरपालिकेसमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर डॉ. वैभवी घारगावकर यांनी या नाटिकेचे सादरीकरण केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनंतकुमार कांबळे होते. उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, नगरसेवक बाबा मस्के, अश्विनीताई सोनकांबळे, मच्छिंद्र सरपे, रामभाऊ गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

नाटिकेतून माता रमाई यांच्या त्यागमय व संघर्षमय जीवनाचा प्रभावी वेध घेण्यात आला. आर्थिक अडचणी, मुलांचे आजारपण, संसारातील संकटे आणि या सर्व परिस्थितीतही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी त्यांनी दिलेल्या पाठिंब्याचे हृदयस्पर्शी चित्रण करण्यात आले. विशेषतः बाबासाहेब परदेशात असताना औषधोपचाराअभावी मुलांच्या मृत्यूची वेदना पत्रातून व्यक्त करणारा प्रसंग सादर होताच अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

यावेळी माता रमाई यांच्या जीवनावरील निबंध स्पर्धा तसेच संविधान गुणगौरव परीक्षेतील विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन संदीप कांबळे व राजेंद्र सूर्यवंशी यांनी तर आभार प्रा. संजय कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अविनाश भालेराव, किरण कांबळे, बाळासाहेब भोसले, सतीश ढोणे, जीवन सूर्यवंशी यांच्यासह कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. नाटिकेने माता रमाई यांच्या त्याग, समर्पण आणि संघर्षमय जीवनाची जिवंत अनुभूती देत उपस्थितांना त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

# राज्यपालांनी दिली पंढरपुरात एकात्मिक सैनिक संकुल उभारणीला मान्यता

## आ. अभिमन्यू पवारांचा पाठपुरावा यशस्वी

तभा वृत्तसेवा

औसा दि. ३० मे : पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येणाऱ्या माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी एकात्मिक सैनिक संकुल उभारण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे राज्यासह देशभरातील माजी सैनिकांना त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेरीज यश आले आहे.

महाराष्ट्रासह देशभरातील कोट्यवधी वारकरी भाविकांचे श्रद्धास्थान पंढरपुर मानले जाते. गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमधूनही मोठ्या संख्येने माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय दरवर्षी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येत असतात. विशेषतः आषाढी, कार्तिकी, माघी एकादशी तसेच मासिक वारीच्या काळात लाखो भाविकांसोबत मोठ्या प्रमाणात माजी सैनिकही येथे दाखल होतात.मात्र या काळात माजी सैनिकांसाठी स्वतंत्र, सुरक्षित आणि सन्मानजनक निवास व्यवस्था उपलब्ध नसल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. देशसेवेसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केलेल्या सैनिकांना दर्शनासाठी येताना निवासाची चिंता भेडसावत असल्याची बाब लक्षात घेऊन आमदार अभिमन्यू पवार यांनी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे पंढरपूर येथे माजी सैनिकांसाठी स्वतंत्र भक्तनिवास उभारण्याची मागणी पत्राद्वारे केली होती.



या मागणीची सैनिक कल्याण विभागाने सकारात्मक दखल घेतली असून आता या प्रकल्पाला प्रत्यक्ष गती मिळणार आहे. विशेष म्हणजे पंढरपूर येथे प्रस्तावित एकात्मिक सैनिक संकुल उभारणीस महामहिम राज्यपालांनी मंजुरी दिली आहे. सुमारे ५४.६१ कोटींच्या अंदाजपत्रकालाही मान्यता देण्यात आली आहे.यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून हा प्रस्ताव लवकरच शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे.प्रस्तावित एकात्मिक सैनिक संकुलामध्ये माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी निवास व्यवस्था, भोजन सुविधा, वैद्यकीय सेवा, माहिती केंद्र तसेच इतर आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे पंढरपूर येथे दर्शनासाठी येणाऱ्या हजारो माजी सैनिकांना मोठा आधार मिळणार असून त्यांच्या सन्मानाला साजेशा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

## आयटी कंपन्यांमध्ये निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

औसा दि.३० मे : रायल एज्युकेशन सोसायटी संचलित संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय (कॉक्सिट)लातूर येथे विविध नामांकित आयटी कंपन्यांमध्ये निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये औशातील ऋतूजा सगरेचा सत्कार माजी मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ. डॉ. एम. आर. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर सोसायटीचे उपाध्यक्ष श्री. एल. एम. पाटील, प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी, के. आर. जाधव यावेळी उपस्थित होते.

यावेळी कॅम्पस प्लेसमेंटद्वारे विविध आयटी कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा माजी मंत्री संजय बनसोडे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

माजी मंत्री संजय बनसोडे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आयटी क्षेत्रात मोठी घेतलेली भरारी घेतली अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रम आणि तंत्रज्ञानाची कास धरल्यास यश निश्र्चित आहे. लातूर जिल्ह्याचे नाव देशपातळीवर उंचावल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

आ. डॉ. एम. आर. पाटील यांनी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागाचे व सर्व शिक्षकांचे कौतुक केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देणे हेच आमचे ध्येय आहे. यापुढेही १००% प्लेसमेंटसाठी आम्ही प्रयत्नशील राहू.असे आश्र्वासन यावेळी दिले.प्रा. एस.बी. मुंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. या सत्कार समारंभाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. ३० मे : अहमदपूर तालुक्यातील अंधोरी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या सोहळ्यास महिलांची व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती आहे.

अंधोरी येथील अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदिरासमोर दि २४ मेपासून अखंड हरिनाम सप्ताह व

श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरू झाला आहे. हा सोहळा दि ३१ मेपर्यंत चालणार आहे. यात सकाळी ९ ते १२ ज्ञानेश्र्वर चरीत्र संताचे चरीत्र हभप बाळू महाराज डाके तर दुपारी २ ते ५ हभप अनंत महाराज बेलगावकर यांची भागवत कथा व नंतर दररोज अनुक्रमे दत्तात्रय येरबले, महादेव बैकरे, ज्ञानोबा मंगे, प्रकाश वाघमारे, बापुराव सारोळे, पंडित रड्डे, व्यंकट रड्डे, दिगंबर येलाले, मनोहर माने यांच्या वतीने अन्नदान केले जात आहे. रात्री

कीर्तन हभप बाळू महाराज डाके, हभप प्रणव महाराज तौर, हभप भरत महाराज सोडगीर, हभप रामकृष्ण महाराज मुंडे, हभप नरसिंग महाराज मोरतळे, हभप प्रसाद घडले महाराज, हभप कृष्णा महाराज यांचे कीर्तन दि २४ ते २९ मेपर्यंत पार पडले तर शनिवार बाळासाहेब महाराज कोद्रीकर यांचे कीर्तन होत आहे.

दि. ३१ मे रोजी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिवशी या सप्ताहाची सांगता हभप विजयानंद महाराज सुपेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. यावेळी समस्त अंधोरीकर यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समिती व गावकरी यांच्या वतीने करण्यात आले आहे. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी वारकरी, गायक, सिंथवादक, मृदंगाचार्य, विणेकरी, तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, युवा कार्यकर्ते, महिला व गावकरी परिश्रम घेत आहेत.

## महागाई आणि इंधन दरवाढीविरोधात निलंग्यात युवक काँग्रेसचे अनोखे मेलोडी आंदोलन

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ३० मे : देशात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किंमती आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात अभय दादा सोळुंके जिल्हा अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसच्या वतीने निलंगा येथे अनोखे आंदोलन करण्यात आले. शहरातील पेट्रोल पंप परिसरात झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी नागरिकांना मेलोडी चॉकलेट वाटप करून केंद्र सरकारचा निषेध नोंदवला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या मेलोडी रिलच्या माध्यमातून जनतेच्या समस्यांची थट्टा करण्यात आल्याचा आरोप करत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि युवकांचे जीवन कठीण झाले असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

या आंदोलनात महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस महेश लहू म्हेत्रे, निलंगा तालुका काँग्रेस अध्यक्ष विजयकुमार पाटील, प्रशांत वांजरवाडे, बालाजी सूर्यवंशी, किशोर पाटील, सतीश रुपणर, बाळू दिगंबरे, पंकज क्षीरसागर, मास शिंदे, सूरज पेटकर तसेच युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

केंद्र सरकारने तातडीने पेट्रोल-डिझेल दर कमी करून महागाई नियंत्रणात आणावी, अन्यथा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## मुस्लिम स्मशानभूमीसाठी सुरक्षा भिंत व मूलभूत सुविधांची मागणी



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ३० मे : येथील मुस्लिम स्मशानभूमी परिसरात नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्या ठिकाणी तातडीने मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी एम आय एमच्या वतीने करण्यात आली आहे.

एम आय एमचे वलांडी अध्यक्ष सिराज बौडीवाले यांनी जिल्हा परिषद अध्यक्षांकडे निवेदन देऊन मुस्लिम स्मशानभूमी परिसराला सुरक्षा भिंत बांधण्यात यावी, बसण्यासाठी योग्य व्यवस्था करावी तसेच लाईटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली.

तसेच अंत्यविधीला येणाऱ्या नागरिकांचे ऊन व पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी शेड उभारण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

मुस्लिम स्मशानभूमी परिसरात आवश्यक सुविधा नसल्यामुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत असून प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा एम आय एमच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

## जि. प. शाळांतील पट घसरण चिंता वाढवणारी

तभा वृत्तसेवा

लातूर,दि.३०मे : जिल्हा परिषद शाळांतील पट घसरण चिंता वाढवणारी बाब असल्याच्या प्रतिक्रिया खुद्द शिक्षकांतून उमटत आहेत. इयत्ता पहिली व अन्य वर्गांत प्रवेश वाढण्यासाठी शिक्षकांसह ग्रामपंचायती, गावकरी व शिक्षण यंत्रणेने पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

जिल्हा परिषद शाळांनी शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या तोंडावर प्रवेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. तसेच शाळेच्या पहिल्याच दिवशी, गणवेश, पाठ्यपुस्तके देण्याचा प्रयत्न चालवला असून, यामुळे पट वाढेल, असे वाटत असले तरी पालकांनी आपल्या पाल्यास शाळेत प्रवेश देतेवेळी जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची गुणवत्ता, शाळांतील सोयी-सुविधा पाहिल्या पाहिजेत. खाजगी शाळांतील शिक्षकांची गुणवत्ता जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांच्या तुलनेत म्हणावी तशी नसते. याची माहिती असूनही पालक खाजगी शाळांकडे का झुकत आहेत, हा खरा प्रश्र्न आहे. जिल्हा परिषद शाळांकडील कमी होणारा कल विचार करायला लावणारा असून, यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. पट घसरणे ही काही चांगली बाब नाही.

# विद्यापीठ तक्रार निवारण समितीवर डॉ विनोद माने



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ३० मे : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर येथील प्रभारी क्रीडा संचालक डॉ. विनोद माने यांची स्वारातीम विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण समितीच्या सदस्यपदी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती केली असून, सदरील निवडीबाबतचे विद्यापीठाचे पत्र महाविद्यालयास नुकतेच प्राप्त झाले आहे. या समितीच्या अध्यक्षपदी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे आहेत. तर सदस्य सचिव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर हे असून, सदस्यामध्ये डॉ विनोद माने यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या निवडीबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला असून, विचार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी. कदम व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांनी डॉ. विनोद माने यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ना. बाबासाहेब पाटील यांच्याकडून कव्हेकर यांच्या प्रकृतीची विचारपूस

तभा वृत्तसेवा

लातूर,दि. ३० मे : भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या डोक्याची छोटीसी शस्त्रक्रिया पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये करण्यात आली. याची माहिती मिळताच राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांची पुणे येथील हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच प्रकृतीची योग्य ती काळजी घेऊन आपण लवकरात लवकर बरे व्हावे, अशी ईश्वरचरणी प्रार्थना, अशी भावणिक प्रतिक्रियाही त्यांनी यावेळी बोलताना दिली.

यावेळी पुणे येथील दिनानाथ हॉस्पिटलचे ट्रस्टी डॉ.माधव भट, सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ विधिज्ञ धनंजय कूर्जेकर, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे प्रोटोकॉल ऑफीसर पंडीत धुमाळ, शादूल शेख आदी

# बौद्ध विहारे ही प्रबोधनाची केंद्रे बनली पाहिजेत : डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ३० मे : समाजाच्या प्रगतीसाठी सामाजिक चळवळीची आज नितांत आवश्यकता आहे. विशेषतः युवकांनी व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. शिक्षण, संघटन आणि सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येऊ शकते.यासाठी बौध्द विहारांची भूमिका महत्त्वपूर्ण असून बौध्द विहारे ही प्रबोधनाची केंद्र बनली पाहिजे असे प्रतिपादन

युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.

मौजे नांदगांव येथील आम्रपाली बुद्ध विहारामध्ये भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमास काळेगाव येथील पूज्य भंते महाविरो थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

यावेळी श्रामनेर सोनूत्तर,श्रामनेर राहूल, भारतीय बौध्द महासभेचे प्रा.बापू वाघमारे,दिनेश कांबळे,गौतम बनसोडे,राज भालेराव,मारोती कांबळे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, बौद्ध विहारे ही केवळ धार्मिक उपासनेची केंद्रे नसून ती सामाजिक आणि वैचारिक प्रबोधनाची केंद्रे बनली पाहिजेत. प्रत्येक बुद्ध विहारामध्ये दर्जेदार साहित्य असलेले पुस्तक कपाट अथवा ग्रंथालय उभारण्याची गरज आहे. पुस्तके ही ज्ञान, विचार आणि प्रगतीची साधने असून त्यांच्यामुळेच माणसाच्या बुद्धीचा विकास होतो. त्यामुळे वाचन संस्कृती वाढविण्यासाठी समाजाने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा संदेश आत्मसात करून युवकांनी समाज परिवर्तनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या वेळेस प्रा. बापू वाघमारे यांचे समायोचीत भाषणे झाली.तर पूज्य महाविरो थेरो यांच्या धम्मदेसनेनी कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमास परिसरातील उपासक-उपासिका, युवक, महिला तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना मराठा आरक्षणासाठी निवेदन




तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ३० मे : मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आमरण उपोषणाचे हत्यार उपसणार आहेत.

या पार्श्र्वभूमीवर अहमदपूर तालुका आणि लातूर जिल्ह्यातील मराठा समाज कमालीचा आक्रमक झाला आहे. २८ मे रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अहमदपूर दौऱ्यावर आले असता, 'अखंड मराठा समाज, अहमदपूर'च्या वतीने त्यांना मागण्यांचे जाहीर निवेदन देण्यात आले.

मनोज जरांगे पाटील यांचे आगामी उपोषण शासनाने तातडीने मध्यस्थी करून थांबवावे, अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा या निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# कार्स २४' ची फसवेगीरी दोन लाखांची भरपाई देण्याचे आदेश

## वकिलाशिवाय ग्राहकाने जिंकली लढाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

ऑनलाईन सेकंड हँड वाहन विक्री करणाऱ्या 'कार्स २४' कंपनीविरोधात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, नांदेड यांनी महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. विशेष म्हणजे तक्रारदार ओंकार श्यामसुंदर शिंदे यांनी कोणत्याही वकिलाची मदत न घेता स्वतः हा खटला लढवून न्याय मिळवला.

तक्रारदार ओंकार शिंदे यांनी डिसेंबर २०२३ मध्ये 'कार्स२४' मार्फत होंडा अमेझ कार खरेदी केली होती. वाहन विक्रीवेळी कंपनीकडून गाडी अपघातमुक्त असून ओडोमीटरमध्ये कोणतीही छेडछाड नाही असे सांगण्यात आले होते. मात्र वाहनात बिघाड झाल्यानंतर सर्व्हिस सेंटरमध्ये तपासणी केली असता गाडी पूर्वी अपघातग्रस्त असल्याचे आणि ओडोमीटरमध्ये फेरफार झाल्याचे समोर आले. त्यानंतर तक्रारदाराने स्वतः पुरावे, सर्व्हिस हिस्ट्री, इन्शुरन्स रिपोर्ट आणि इतर कागदपत्रे गोळा करून ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली. सुनावणीदरम्यान 'कार्स२४' कंपनीकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आयोगाने कंपनीची सेवा त्रुटी आणि अन्यायकारक व्यापार पद्धती सिद्ध झाल्याचे नमूद केले.आयोगाने 'कार्स२४' कंपनीला मानसिक त्रासापोटी २ लाख रुपये आणि तक्रार खर्चापोटी १० हजार रुपये असे एकूण २ लाख दहा हजार रुपये ४५ दिवसांत देण्याचे आदेश दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास पुढील कायदेशीर कारवाईचा इशाराही तक्रारदाराने दिला आहे.

ग्राहकांनी आपली फसवणूक झाली असे लक्षात आल्यास कोणत्याही वकिलामार्फत आपले गाऱ्हाणे न मांडता स्वतःही आपला लढा लढू शकतात हे सदरील प्रकरणावरून लक्षात येते.

# अमेरिकेच्या भूमीवर घुमणार समतेचा स्वर! पहिल्या 'डॉ. आंबेडकर बुद्ध महाविहारा'चा ३१ मे रोजी लोकार्पण सोहळा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३० मे -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार जागतिक स्तरावर पोहोचवण्याच्या प्रवासातील एक सुवर्णक्षण जवळ आला आहे. अमेरिकेतील व्हर्मोंट (तशींपीं) राज्यातील लोवेल शहरात उभारण्यात आलेल्या 'दि फर्स्ट अमेरिकन आंबेडकर बुद्ध महाविहार'या ऐतिहासिक वास्तूचा भव्य लोकार्पण सोहळा येत्या ३१ मे २०२६ रोजी संपन्न होणार आहे.



या ऐतिहासिक महाविहाराचा लोकार्पण सोहळा भारत, तेलंगणा येथील सुप्रसिद्ध भंते डॉ. शाकू बोधी धम्मा यांच्या पावन हस्ते संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी त्यांचे विशेष आगमन होत असून त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला मोठे आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती वर्षाचे आणि 'वैशाख पौर्णिमे'चे (बुद्ध पौर्णिमा) औचित्य साधून या महाविहाराचे लोकार्पण करण्यात येत आहे. अमेरिकेतील हे अशा प्रकारचे पहिलेच महाविहार असल्याने जगभरातील आंबेडकरवादी अनुयायांमध्ये कमालीचा उत्साह आहे. हा ऐतिहासिक सोहळा ७५१ पेज रोड, लोवेल, व्हर्मोंट (तढ) ०५८४७, यु.एस.ए. (णड) येथे ३१ मे २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आणि वैशाख पौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला आहे.

हे महाविहार केवळ एक वास्तू नसून अमेरिकेतील भारतीयांसाठी आणि विशेषतः बहुजन समाजासाठी एक महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र ठरेल. धम्म प्रचारासोबतच डॉ. बाबासाहेबांच्या समता, बंधुता आणि न्याय या विचारांचा प्रसार करणे हा या महाविहाराचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. ३१ मे रोजी होणाऱ्या या सोहळ्यासाठी स्थानिक प्रशासनाची परवानगी आणि आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी अमेरिकाभरातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाद्वारे अमेरिकेच्या भूमीवर बुद्ध धम्माचा आणि महामानवाच्या विचारांचा जागर केला जाणार आहे.

## भाजपा किसान मोर्चा नांदेड उत्तर जिल्हा चिटणीसपदी उद्धवराव मुंडे

**किनवट** -भारतीय जनता पक्षाच्या किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा चिटणीसपदी उद्धवराव मारोतराव मुंडे यांची नियुक्ती केल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. त्याच्या नियुक्तीमुळे शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीतील



ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या खरेदीविषयक समस्या मार्गी लागणार असल्याचा विश्वास बहूतांश शेतकऱ्यांनी व्यक्तविला आहे. उद्धवराव मुंडे हे सधन शेतकरी असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच ते संघर्ष करताना दिसतात. त्यांच्या कार्याची दखल घेत भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने उशिरा का होईना परंतु जिल्हा चिटणीसपदाची त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आल्याने शेतकऱ्यांसह सर्व स्तरातून त्यांच्या नियुक्तीचे स्वागत होतांना दिसते. भाजपा किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर गणपतराव कदम देळूबकर यांनी २७ मे २०२६ रोजी नियुक्ती केली आहे. नियुक्तीनंतर किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम, भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी आणि बहूतांश शेतकऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. उल्लेखनीय म्हणजे किनवट तालुक्यातील ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या भरडधान्य खरेदीचा प्रश्न सद्या ऐरणीवर आला आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापक किनवट कार्यालयाच्या अधिपत्याखाली इस्लापूर येथे खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. मध्येच शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा मुद्दा समोर आला आहे. यातील तथ्यता जाणून घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला प्राधान्यक्रम देण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून उद्धवराव मुंडे यांच्याकडे पाहिले जात आहे.

# महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदी राजश्री पाटील बिनविरोध निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नांदेडच्या ज्येष्ठ क्रीडाप्रेमी, यशस्वी खेळाडू आणि संघटक राजश्री पाटील यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे मराठवाड्यासह राज्यातील रिंग टेनिस क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच निवडणुकीत माजी आमदार मोहन जोशी यांची अध्यक्षपदी तर अनिल वरपे यांची महासचिवपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा यापूर्वी माजी खासदार विजय दर्डा यांनी यशस्वीपणे सांभाळली होती. आता ही महत्त्वपूर्ण जबाबदारी राजश्री पाटील यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांच्या नेतृत्वगुणांवर, कार्यक्षमतेवर आणि संघटन कौशल्यावर राज्य संघटनेने दाखविलेला विश्वास अधोरेखित झाला आहे.



राजश्री पाटील या बालवयापासूनच क्रीडा क्षेत्राशी जोडलेल्या असून त्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर सात राष्ट्रीय पदके मिळवली आहेत. खेळाडू म्हणून यश मिळवतानाच त्यांनी सहकार, शिक्षण, सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सन २००७ मध्ये नांदेड जिल्हा रिंग टेनिस असोसिएशनची स्थापना झाल्यापासून त्या संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली २०१९ आणि २०२५ या वर्षांत राज्यातील सर्वात मोठ्या रिंग टेनिस स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट नियोजन, व्यवस्थापन कौशल्य आणि खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या कार्यामुळे त्यांना राज्यभरात विशेष मान्यता मिळाली आहे.

रिंग टेनिस या खेळाच्या प्रसार व विकासासाठी त्यांनी दिलेल्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत त्यांची राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे राज्यातील रिंग टेनिस चळवळीला अधिक बळ मिळेल आणि संघटनेच्या कार्याला नवी दिशा प्राप्त होईल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला आहे. राजश्री पाटील यांच्या निवडीबद्दल नांदेड जिल्हा रिंग टेनिस असोसिएशनचे उपाध्यक्ष टी. एन. रामनबैनवाड, सचिव बालाजी सैनवाड तसेच विविध क्रीडा संघटना, खेळाडू, प्रशिक्षक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

खेळातील राष्ट्रीय यश, संघटनात्मक नेतृत्व आणि क्रीडा विकासाची तळमळ यामुळेच राजश्री पाटील यांच्यावर राज्य संघटनेच्या कार्याध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील रिंग टेनिस चळवळीला अधिक गती आणि व्यापक दिशा मिळेल, अशी भावना क्रीडा वर्तुळातून व्यक्त होत आहे. या निवडीबद्दल राजश्री पाटील यांनी महाराष्ट्र रिंग टेनिस संघटनेचे अध्यक्ष मा.आ.मोहन जोशी, महासचिव अनिल वरपे, राज्यातील सर्व पदाधिकारी, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी यांचे आभार मानले. राज्य संघटनेच्या सहकार्याने रिंग टेनिसच्या सर्वांगीण विकासासाठी आणि खेळाडूंना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**नांदेड** -देगलूर तालुक्यातील जेतवन शैक्षणिक सामाजिक चॅरिटेबल ट्रस्ट सुजायतपूर येथे दहा दिवसाच्या श्रामणेर प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला असून पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहापूर, सुजायतपूर नगरीचे प्रतिष्ठित नागरिक शिवाजी कनकंटे यांच्या हस्ते श्रामणेरांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी नांदेड जिल्हा भिक्खू संघाचे अध्यक्ष भंते पय्याबोधी महाथेरो यांच्या शुभेच्छा घेऊन पुढील कार्यक्रमास दिपरत्न भंते यांनी सुरूवात केली. पहिला, दुसरा व तिसरा दिवस उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. पहिल्या दिवसाचा सकाळचा नाष्टा शोभाताई निवडंगे यांनी दिला, तर सकाळचे भोजन आयु. शोभाताई वाघमारे नागपूर यांनी दिले असून संध्याकाळचे भोजन दान आयु. चंद्रकलाताई लेंदे परभणी यांनी दिले. तसेच गावातील सर्व उपासिका ललिता विनोद वाघमारे, त्रिशला राजकुमार वाघमारे मरसांगवी, पूजा गौतम माने टाकळगा, दिक्षा संजय कांबळे, मिणलताई मिलिंद कांबळे, रमाताई संजय पवार, सुरेखा संजय सर्जे यांनी भोजन दान देवून धम्म कार्याला हातभार लावला. या श्रामणेर शिबिराच्या आयोजिका सावित्रीताई शेवाळकर या आहेत. हे श्रामणेर शिबीर दि. २८ मे ते ६ जूनपर्यंत संपन्न होत आहे. श्रामणेर शिबिरामध्ये एकूण २१ मुले-मुली सहभागी झाले असून, त्यांना त्रिशरण, पंचशील, बुद्ध वंदना, धम्म संस्कार, ध्यान साधना तसेच बौद्ध धम्मातील विविध विचारधारांचे प्रशिक्षण दिले जात आहे

# आदमपूर परिसरात मान्सूनपूर्व मशागतीत शेतकरी मग्न

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ३० मे -**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरातील गावोगावी अनेक शेतकऱ्यांकडून मान्सूनपूर्व मशागतीला वेग आल्याचे शेतोशेती सद्यस्थितीत चित्र पहावयास मिळत आहे.यंदा डिझेल इंधनाचा तुटवडा भासत असल्याने ट्रॅक्टर द्वारे मशागत आणि पेरणी करणाऱ्या शेतकरी व शेती व्यावसायिक ट्रॅक्टर चालकांची पुरती गोची झाल्याने एक नवीन चिंता आवासून उभी टाकली आहे.

परिसरातील शेतकऱ्यांकडून अगदी रामप्रहरापासून व सायंकाळी ट्रॅक्टर किंवा बैलांच्या सहाय्याने शेतीची कामे केली जात आहेत. नांगरणी,वखरणी, कल्टीवेटर, पंजी, कचरा वेचणी,पालवी तोडणे,कचऱ्यास जाळ लावणे,नाला काढणे,कट्टा टाकणे,दगड धोंडे



लावणे,नादुरुस्त बोअरवेल दुरूस्ती आदी कामांना शेत शिवारात वेग आलेला दिसून येत आहे.

आगामी खरीप हंगामाच्या तयारीत असताना शेतकऱ्यांकडून बी बियाणांची,खतांची बाजारात खरेदीची रेलचेल दिसून येत आहे. काही अवधीनंतर बी बियाणांच्या किंमतीत चढ उतार होण्याचे संकेत असल्याने सद्यस्थितीत शेतकरी सोयाबीन बॅगांची खरेदी उरकून घेत आहेत.वातावरणातील बदलाने मान्सून मागे पुढे होईलंच,मात्र पेरणीसाठी शेत शिवारे सज्ज करण्यात शेतकरी,महिला मजूर वर्ग कडक उन्हातही मग्न झाले आहेत.

एकीकडे खरीप हंगाम अगदी तोंडावर येऊन ठेपल्याने डिझेल इंधनाची भारी समस्या निर्माण झाली आहे. परिसरातील शेतकरी व ट्रॅक्टर व्यावसायिकांनी आक्रमक भूमिका अंगीकारून शासन व इंधन पंपचालक व्यावसायिकांप्रती आपला रोष व्यक्त केलेला होता.

डिझेल च्या तुटवड्यामुळे शेतकरी पुन्हा बैल खरेदीकडे वळतील की काय असेही आश्वासक सकारात्मक चित्र तयार होत चालले आहे,अशीही चर्चा परिसरात आपसूक नागरिकांकडून होताना दिसून येत आहे.

# नांदेड जिल्हयामधील दहा कृषी निविष्ठा केंद्राचे परवाने निलंबीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

नायगांव तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारी, प्रसद्धि झालेल्या बातम्या व तक्रारीच्या अनुषंगाने जल्हिा अधिक्षक कृषी अधकिारी, नांदेड यांनी नायगांव तालुक्यातील सात कृषी सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करुन त्यांचे खत परवाने सहा महिन्यासाठी निलंबीत केले आहेत.

सात कृषी नविष्ठिा केद्रांचे नावे पुढीलप्रमाणे (दशरथ कृषी सेवा केंद्र, केदार कृषी सेवा केंद्र, वसंत अग्रो सर्वसि सेंटर, गजानन कृषी सेवा केंद्र, हनुमान कृषी सेवा केंद्र, मातोश्री ग्रो एजन्सी, शविकृपा कृषी सेवा केंद्र, नायगांव) तसेच मे.वर्षा ग्रो ट्रेडर्स, खांबाळा ता.मुदखेड, मे.व्यंकटरमणा कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार, मे.तिरुमला कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार केंद्राचे सुनावणीअंती नदिर्शनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने परवाने नलिंबीत केले आहेत.

तसेच मे.शिवकृपा कृषि वकिास केंद्र , माळकौठा ता.मुदखेड व व्यंकटेश कृषि भांडार नविन मोंढा, नांदेड यांच्या खत वाटपामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटया आढळल्यामुळे पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल झाल्यामुळे यांचे परवाने कायमस्वरुपी रद्द केले आहेत.

## साकेत बुद्ध विहार येथे माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन

**नांदेड** -येथील राजनगर-चंद्रगुप्तनगर साकेत बुद्ध विहारात महामाया महिला मंडळाच्या वतीने आयोजित माता रमाई आंबेडकर स्मृतिदिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. प्रसंगी तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तदनंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मोलाची साथ साथ देणाऱ्या जीवनसंगिनी माता रमाईने केलेला त्याग व त्यांच्या जिवनचरित्रवर प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमास शंकराव पवार, गणपत बनसोडे, कांताबाई वाघमारे, अनुसयाबाई कांबळे, पंचशीला रसाळे, कुसुमबाई वाघमारे व सुमनबाई कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या अभिवादन सभेस परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# तंबाखूमूक्त समाजाकडे एक पाऊल नांदेड डेंटल कॉलेजातर्फे जनजागृती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

३१ मे हा दिवस जागतिक तंबाखूविरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात तंबाखू खाणे, सिगारेट ओढणे याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत जात आहे. या प्रसंगी जनजागृती व्हावी म्हणून नांदेड ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या वतीने खुलताबाद येथील विद्यार्थ्यांनी शहरातील वजीराबाद, रेल्वे स्टेशन, आय.टी.आय चौक येथे या प्रमुख चौकात पथनाट्याच्या माध्यमातून तंबाखू ही शरीरासाठी किती हानिकारक आहे हे दर्शवून दिले.

तंबाखूविरोधी जनजागृतीसाठी नांदेड रस्ते डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मागच्या वर्षी भारतातून पहिला नंबर आला होता. आणि यंदाही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नांदेडचे पी.एस.आय. वजीराबाद पोलीस उपनिरीक्षक जयपालसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

आज अनेक तरुण तंबाखूच्या आहारी जन आहेत. तंबाखूचे सेवन केल्याने कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसरोगाचे आजार तसेच तोंडाच्या कॅन्सर विकार होऊ शकतात. तंबाखू सेवनामुळे केवळ स्वतःचेच नव्हे तर कुटुंबाचे आणि समाजाचेही नुकसान होते.

या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तंबाखूच्या वाढत्या समस्येविरोधात, विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाच्या महत्त्वपूर्ण संदेशाचे नागरिकांनी कौतुक केले.

हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष विनोदकुमार श्रीरामवार, व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास डागवार, वरिष्ठ प्राध्यापक व मार्गदर्शक डॉ. राजेश कुमार दासी तसेच डॉ. सुजाता देशमुख व डॉ. सुजेल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाला.

# पोलीस ठाण्यांतील पारदर्शकतेसाठी एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढवून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवारचे शहर जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी निवेदन सादर केले.

निवेदनामध्ये पोलीस ठाण्यांमध्ये एफआयआर फीडबॅक प्रणाली सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. अनेक वेळा नागरिकांकडून गुन्हा नोंदविण्यासाठी किंवा तक्रारीवर कारवाई करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी समोर येतात. यामुळे सामान्य नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास कमी होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



प्रस्तावित प्रणालीअंतर्गत प्रत्येक एफआयआर किंवा तक्रार नोंद झाल्यानंतर २४ ते ४८ तासांच्या आत पोलीस अधीक्षक कार्यालयातून फिर्यादीशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पोलीस ठाण्यातील वागणूक, कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी, कामकाजाबाबतच्या तक्रारी अथवा सूचना आणि पोलीस सेवेबाबतचे समाधान याविषयी माहिती घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे पोलीस प्रशासनातील पारदर्शकता वाढून भ्रष्टाचारावर नियंत्रण मिळविण्यास मदत होईल. तसेच नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल, असे फैसल सिद्दीकी यांनी सांगितले. हा उपक्रम नांदेड जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबवून राज्यासाठी आदर्श मॉडेल निर्माण करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी निवेदनाची दखल घेत सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले. यावेळी निवेदन देताना मोहम्मद अरसलान, शेख नजीब हे उपस्थित होते.

## इंजि.विश्वंभर पवार यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**नांदेड** -राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते इंजि. विश्वंभर पवार यांनी हदगाव येथील शिवसंवाद मेळाव्यात शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. खा. डॉ. श्रीकांत एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केला. हदगाव येथे २८ मे रोजी खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत पवार यांनी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी महाराष्ट्र



राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आ. हेमंत पाटील, शिवसेना संपर्कप्रमुख नांदेड रमाकांत मडावी, माजी खा. आनंद परांजपे, आ. बालाजी कल्याणकर, आ. बाबुराव कोहळीकर, आ. आनंद बोंढारकर यांच्यासह जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, गंगाधर बडूरे, उमेश मुंडे, गजानन पाटील आदींची उपस्थिती होती. डॉ. पुरुषोत्तम कल्याणकर, चेतन पाटील सोनारीकर, सरपंच संतोष पाटील चिंचाळकर, रवी गेंटेवार, सिद्धू पाटील चिंचाळकर, विजय पा. सोळंके, राष्ट्रवादी शहराध्यक्ष मोहम्मद बुऱ्हाण यांच्यासह ४५ पदाधिकाऱ्यांनी प्रवेश घेतला.

# आ. बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त राहुल देशपांडे यांची संगीत संध्या

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मे -**

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त एक जून रोजी सायंकाळी ७ वाजता ए. के. संभाजी मंगल कार्यालय नांदेड येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांची संगीत संध्या आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान सकाळी १० वाजता मरळक येथे भव्य कीर्तन आणि आरोग्य तपासणी शिबाराचे आयोजन करण्यात आला आहे.

जनतेच्या हितासाठी सदैव तत्पर असणारे आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात विकासाची असंख्य कामे करून लोकांना खरा दिलासा देणारे लोकनायक आ. बालाजीराव कल्याणकर यांचा वाढदिवस १ जून रोजी याही वर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाने आणि धार्मिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त सकाळी दहा वाजता





मरळक येथे सकाळी दहा वाजता हरिभक्त परायण विशाल महाराज खोले यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून याचवेळी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील जनतेसाठी भव्य मोफत आरोग्य शिबिर ही आयोजित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांच्या संगीत संध्या या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ए.के संभाजी मंगल कार्यालयात सायंकाळी सात वाजता संगीत रजनीचा कार्यक्रम रंगणार आहे . तत्पूरी सायंकाळी पाच वाजता आ.बालाजीराव कल्याणकर ए के संभाजी मंगल कार्यालयात जनतेच्या गाठीभेटी घेतील. आयोजित करण्यात आलेल्या संगीत संध्या कार्यक्रमाला आणि मरळक येथे आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळा आणि आरोग्य शिबिराला आणि अभिष्टचिंतन सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे यांनी केले आहे .

**ए. के. संभाजी मंगल कार्यालयात सायंकाळी पाच वाजता आ. कल्याणकर घेणार भेटीगाठी**

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त ए के संभाजी मंगल कार्यालय येथे संगीत संध्या आयोजित करण्यात आली असून सायंकाळी पाच वाजता आ. कल्याणकर जनतेच्या गाठीभेटी घेणार आहेत.

**मरळक येथे कीर्तन आणि आरोग्य शिबिर**

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त मरळक येथील विमलेश्वर मंदिर येथे हरिभक्त परायण विशाल महाराज खोले यांच्या कीर्तनाचा सोहळा सकाळी साडेदहा वाजता आयोजित करण्यात आला असून याच वेळी नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी मोफत भव्य आरोग्य शिबिर ही आयोजित करण्यात आले आहे.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पाणी विक्रेत्यांनी टँकरचे दर वाढविले

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० मे : सध्या शहरात पाणी विक्रीच्या व्यवसायातून मोठी उलाढाल होत आहे.

टँकर, ट्रॅक्टरद्वारे घरोघर जाऊन पाणी विक्री करणाऱ्यांनी यावर्षी भावही वाढविले. डिझेल दरवाढीने तर आणखी भाव वाढले असून, ज्यांची परिस्थिती चांगली आहे, ते विकत पाणी घेऊन वापरतात. ज्यांची परिस्थिती नाही, ते मिळेल तेथून पाणी उपलब्ध करून वापरत आहेत.

नळाला आठ दिवसांतून एकदा पाणी येते. अनेकांकडे पाणी साठविण्याची व्यवस्था नसल्याने ते महाग झालेले पाणी घेऊन वापरतात



## विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी 'बेनिफिशरी सत्यापन ॲप'द्वारे डिजीटल हयात प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० मे : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ७ मे, २०२६ च्या शासन निर्णयानुसार, विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांसाठी आता हयात प्रमाणपत्र (डिजीटल लाईफ सर्टिफिकेट) ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लातूर तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच इतर सर्व विशेष सहाय्य योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र विहित पद्धतीने सादर करावे, असे आवाहन लातूर तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

मोबाईल किंवा सेतू केंद्रावरून सुविधा उपलब्ध

लाभार्थ्यांना हे प्रमाणपत्र सादर करणे सोपे जावे यासाठी 'बेनिफिशरी सत्यापन प' विकसित करण्यात आले आहे. लाभार्थी हे प्रमाणपत्र स्वतःच्या किंवा आपल्या नातेवाईकांच्या मोबाईलवरून या पचा वापर करून सादर करू शकतात. तसेच ज्यांना मोबाईलवर ही प्रक्रिया करणे शक्य नाही, त्यांनी जवळच्या सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्राला भेट देऊन आपले डिजीटल हयात प्रमाणपत्र काढून घ्यावे.

ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक लाभार्थ्यांना ही ऑनलाईन प्रक्रिया स्वतः करणे शक्य नसते. अशा वेळी लाभार्थ्यांनी आपल्या नातेवाईकांची मदत घ्यावी अथवा जवळच्या सेतू सुविधा केंद्राचा लाभ घेऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी. जेणेकरून लाभार्थ्यांचे अनुदान विनाअडथळा सुरू राहण्यास मदत होईल, असे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# खाजगी शिकवणी वर्गांमुळे कनिष्ठ महाविद्यालयांनी विश्वासार्हता गमावली !

तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी

लातूर, दि. ३० मे : कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा अधिक झाली की ती नुकसानच करते,असे म्हटले जाते. मनुष्याचा स्वभाव, सत्ता, संपत्ती, पैसा यासह अनेक बाबींना हा मुद्दा लागू पडतो. लातूरला शिक्षणाची पंढरी समजले जाते. या पंढरीत खाजगी शिकवणी वर्गांच्या नावाखाली शिक्षणाचे बाजारीकरण सुरु झाले अन शिक्षणाचे पावित्र्याच जणू संपुष्टात आले. लातूरमधील खाजगी शिकवणी वर्गांच्या वाढत्या संख्येमुळे सद्यःस्थितीत येथील कनिष्ठ महाविद्यालयांनी आपली विश्र्वासार्हता गमावल्याचे दृष्टीपथास येत आहे. विद्यार्थी व पालकांनी याकडे आत्ताच डोळसपणे नाही पाहिल्यास नीट पेपर फुटीपेक्षाही गंभीर परिणामांना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही असा मतप्रवाह वाढीस लागला आहे.

मोह कधीही वाईटच. तो कोणाला, कधी आपल्या जाळ्यात ओढून घेईल याची शाश्र्वती नाही. ग्रामीण भागातून आलेल्या शिवराज मोटेगावकर नावाच्या बुद्धिमान तरुणालाही या मोहाने आपल्या जाळ्यात ओढले. धनाच्या अतिरिक्त लालसेने हा तरुण मानवाचा राक्षस कसा झाला हे कोणाच्याही लक्षात आले नाही.स्वार्थ माणसाला अंध बनवतो,असे म्हटले जाते. त्याची प्रचिती शिवराज मोटेगावकर नावाच्या तरुणाच्या नीट पेपर फुटी प्रकरणातील सहभागावरून आली. सीबीआयने या तपासाला आता गती घेतली आहे. त्यामुळे नीट पेपर फुटी कधीपासून सुरु झाली, त्यात आणखी किती जणांचा सहभाग आहे, आणखी किती ' मोहरे' सीबीआयच्या कचाट्यात जाण्यापासून सुटण्याचा प्रयत्न करत आहेत ? याचा सुगावा आगामी काळात लागणारच आहे. असंख्य तरुणांच्या भवितव्याशी, भावनांशी खेळणाऱ्या नराधमांना कोणत्याही परिस्थितीत माफी मिळालीच नाही पाहिजे,असा आग्रह समाजाच्या सर्वच क्षेत्रातून वाढताना दिसतोय.

लातूरच्या यशस्वी ' लातूर पॅटर्न' चा पुरेपूर लाभ हा पॅटर्न घडवणाऱ्यांपेक्षा स्वार्थी, संधीसाधू मंडळींनीच लुटला आहे, हे वास्तव आहे. ज्यांनी हा पॅटर्न घडवला त्यांनी पैशांपेक्षा विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचे काम प्रामाणिकपणे केले होते. परंतु त्याची दुकानदारी करणाऱ्यांचीच संख्या आजच्या काळात वाढली आहे. लातूर पॅटर्नची मुळे आठवी , नववी, दहावीत मजबूत केली गेली. त्या मुळांना तत्कालीन पॅटर्नकर्त्यांनी व्यवस्थित रुजविण्यासाठीची मेहनत घेतली. मुळातच बुद्धिमान आणि हुशार असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीकौशल्याच्या बळावर नेत्रदीपक यशही संपादन केले.

लातूरच्या मातीतच गुणवत्ता परिपूर्ण भरली असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. लातूरची माती गुणवत्तेची खाण असल्याचे आजही अभिमानाने नमूद केले जाते. अशा या लातूरमध्ये मागच्या काही वर्षांत खाजगी शिकवणी वर्गांचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले. पालकही आपल्या पाल्याला दर्जेदार शिक्षण संस्थेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्याऐवजी स्वतःला नामांकित म्हणवून घेणाऱ्या खाजगी शिकवणी वर्गात प्रवेश घेण्यासाठी गर्दी करू लागले. या खाजगी शिकवणी वर्गासाठी विद्यार्थी पूर्णवेळ देऊ लागले. पण, त्यांना शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी अकरावी बारावीकरीता एखाद्या नाममात्र कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे आवश्यक होते. कारण, त्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. चांगल्या महाविद्यालयात केवळ नावालाच प्रवेश घेता येत नाही, तेथे उपस्थिती अनिवार्य असते.

अशावेळी लातुरात शिकण्यासाठी असंख्य पालकांनी खाजगी शिकवणी चालकांच्या आश्र्वासनाला भुलून शिक्षणाचा कोणताही दर्जा नसलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात आपल्या पाल्यांचे प्रवेश केले आहेत. असे हजारो विद्यार्थी आजही लातुरात आढळून येतात. जेथे खाजगी शिकवणी वर्गात विद्यार्थी दिवसभर हजेरी लावतात आणि नाममात्र प्रवेश घेतलेली कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थी हजर नसतानाही त्यांची उपस्थिती कागदोपत्री दर्शवण्यात मग्न असतात. याच कारणामुळे लातूर शहर परिसरात आजमितीस मोठ्या प्रमाणात कनिष्ठ महाविद्यालयांचे पेव फुटले आहे. ही बाब शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्यालक्षात येत नाही,असे नाही. मात्र, ते याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करण्याचे काम सातत्याने करत आले आहेत. यामागच्या कारणांचा शोध घेतल्यास ते कोणाही सुजाण नागरिक आणि पालकाच्या लक्षात येईल. हा विषय एकाच बातमीपुरता मर्यादित नाही. त्याच्या मुळाशी गेल्यास त्याचा पुरता थांग लागणार आहे. यावरून खाजगी शिकवणी वर्गांमुळे लातूर शहर परिसरातील अनेक कनिष्ठ महाविद्यालयांनी आपली विश्र्वासार्हता गमावल्याचे दृष्टीपथास येते.

## आचारसंहितेमुळे १ जून रोजीचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## विधान परिषद निवडणुकीची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवरी निवडणुक आयोगाकडून प्रारुप मतदार यादी अधिकृतरित्या प्रसिद्ध करण्यात आली आहे. या घोषणेमुळे तिन्ही ज्ह्यिांतील स्थानिक राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. सध्या मतदार यादी पडताळणीचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. दुरुस्तीचे आवाहन करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा पुरवठा सुरळीत; साठवणूक करू नका : जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ३० मे : जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून आगामी काळातही यात कोणताही खंड पडणार नाही, अशी हमी पेट्रोलियम कंपन्यांनी दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये तसेच अनावश्यक इंधनाची अतिरिक्त खरेदी किंवा साठवणूक करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यातील पेट्रोल व डिझेल पुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील पेट्रोल पंप असोसिएशनचे पदाधिकारी व पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील इंधनाच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्याला आवश्यक असणारा पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा नियमितपणे सुरू असून भविष्यातही हा पुरवठा असाच अखंडित सुरू राहील, अशी माहिती पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींनी यावेळी दिली.

ग्रामीण भागात सध्या मान्सूनपूर्व शेती मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा सतत उपलब्ध ठेवण्यात यावा आणि शेती मशागतीच्या कामासाठी शेतकऱ्यांना, तसेच उद्योग-व्यवसाय आणि जलसंधारणाच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणात डिझेल तात्काळ उपलब्ध करून दिले जावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी दिल्या. पेट्रोलियम कंपन्यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, जिल्ह्यात कुठेही पेट्रोल किंवा डिझेलचा तुटवडा निर्माण होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी प्रशासनाला दिली.

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास न ठेवता अतिरिक्त स्वरूपात पेट्रोल किंवा डिझेलची खरेदी करू नये. आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करून पेट्रोल पंपांवरील अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्हा प्रशासन सर्व पेट्रोलियम कंपन्या व पेट्रोल पंप चालकांच्या सतत संपर्कात असून जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



तभा वृत्तसेवा

लातूर,दि. ३० मे : संत गोरोबा सोसायटी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शुक्रवार (दि. २९) मोठ्या भक्तिमय वातावरणात करण्यात आली. या सप्ताहाची सुरुवात २२ मे रोजी करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्यात महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या हस्ते शेवटची महाआरती करण्यात आली. कार्यक्रमाला प्रभाग क्रमांक ३ चे नगरसेवक विकास कांबळे, भालचंद्र सोनकांबळे, संत गोरोबा सोसायटीचे चेअरमन सतीश कांबळे, संजय गव्हाणे, जनार्दन आप्पा कुंभार, प्रकाश पाटोळे, काशिनाथ वाघमारे, देविदास गायकवाड, विनायक कसबे, रमेश कांबळे, बब्रुवान उदारे, विलास कांबळे, लिंबराज मगर, हरी पवार, शाम गायकवाड, उत्तम कसबे, बळी गायकवाड, शिवाजी वाघमारे तसेच सप्ताह कमिटी, संत गोरोबा सोसायटीचे संचालक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सप्ताहामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन आणि हरिनामाच्या गजराने परिसर भक्तिमय झाला होता.

## आ. विक्रम काळे यांचा सत्कार




तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समितीच्या लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्याच्या प्रभारी म्हणून मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रम वसंतराव काळे यांना महत्त्वपूर्ण जबाबदारी मिळाल्याबद्दल वसंतराव काळे खाजगी माध्यमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने वसंत विहार लातूर येथे पतसंस्थेचे

व्हॉईस चेअरमन युवराज शिंदे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रा. अंकुश नाडे, पतसंस्थेचे सचिव गफार सय्यद, कोषाध्यक्ष राजाराम भिसे, संचालक बंडू खोसे, राजकुमार जाधव, दत्ता कवडे, संचालिका प्रा. वैशाली फुले, बाबासाहेब भिसे, व्यवस्थापक राजाभाऊ सरडे, सुधाकर डिसले आदी उपस्थित होते.

## वाहतुकीस अडथळा; पिकअप जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : मुरूड बसस्थानक परिसरातील मुख्य रस्त्यावर अडथळा ठरेल अशा पद्धतीने वाहन उभे करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी एका पिकअप चालकाविरुद्ध मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ मे रोजी सायंकाळच्या सुमारास मुरूड बसस्थानकाच्या पश्र्चिमेस एका चालकाने आपली बोलेरो पिकअप (क्र. एमएच २४ एबी ७३८८) रस्त्याच्या मधोमध उभी केली होती. यामुळे सार्वजनिक वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला होता. पोलीस अंमलदार हनुमंत माने यांच्या फिर्यादीवरून या निष्काळजी चालकाविरुद्ध भादंवि कलम २८५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : जेएसपीएम संचालित आयटीआयचा कोर्स उत्तीर्ण झालेला मनोज भताने या विद्यार्थ्यांने १२ परीक्षा समकक्षता या प्रस्तावानुसार १२ परीक्षा देऊन कनिष्ठ महाविद्यालयामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. त्याबद्दल भाजपा नेते तथा भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते सत्कार करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी युवा नेतृत्व विश्वजित पाटील कव्हेकर, स्वामी विवेकानंद आयटीआयचे प्राचार्य एस.एम.पांचाळ, स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत गौड, जननायक संघटनेचे तालुका अध्यक्ष उध्दवराव काळे आदी उपस्थित होते.

# पेपर फुटीतील दोषींवर कठोर कारवाई करावी शिवसेना उबाठा पक्षाची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : देशभर गाजत असलेल्या नीट पेपर फुटीच्या केंद्रबिंदू स्थानी आल्याने लातूरची बदनामी होत आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

नीट पेपर फुटीनंतर लातूर शहरातील ज्या भागात खाजगी शिकवणी चालतात अशा उद्योग भवन परिसरातील शिक्षणाचा बाजार बंद करावा, त्या ठिकाणी चालणारे बेकायदेशीर कला असेच तात्काळ बंद करण्यात यावीत, ही कार्यवाही करीत असताना विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याचीही काळजी घ्यावी, असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळात जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, महानगर प्रमुख विष्णूपंत साठे, शिव आरोग्य सेनेचे जिल्हा समन्वयक त्र्यंबक स्वामी, शहर प्रमुख माधव कलमुकले, राजेंद्र कतारे, सोमनाथ झुंजारे, विष्णू कांबळे, भास्कर माने, कैलास पाटील, संतोष माने, लक्ष्मण पेटकर, निलेश मद्रेवार, सुभाष गुंडीले, मच्छिद्र कांबळे, आकाश तिरूके, महादेव काळे, नेताजी ऐतनबोणे, गजानन होणराव, सतीश सावळे, संतोष घोडके, ऋषिकेश पाटील, अण्णा कोळी, जनार्दन हंचाटे, प्रमोद देशमुख, सुरज बाहेती आदी उपस्थित होते.

# ३० हजारांची दुचाकी लंपास !

तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : घरासमोर उभी केलेली ३० हजार रुपये किमतीची टीव्हीएस अपाचे मोटारसायकल (क्र. एमएच २४ बीएन ३३१८) अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना हरंगुळ येथे घडली. या प्रकरणी सोहेल गणीसाब सय्यद (वय २४) यांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही चोरी २५ मे रोजी दुपारी १२:३० ते रात्री ९:०० च्या दरम्यान घडली. पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार धुमाळ करत आहेत.

# १२६ विद्यार्थ्यांचा कॉक्सिटमध्ये सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर, ३० मे : येथील कॉक्सिट महाविद्यालयात विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये (आयटी) कॅम्पसमुलाखतीतून मोठ्या पॅकेजची नोकरी मिळालेल्या १२६ विद्यार्थी व पालकांचा गौरव सोहळा माजीमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

येथील कॉक्सिटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजीमंत्री संजय बनसोडे, संस्थचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील,संस्थेचे नागोराव पाटील, जिल्हा परिषदेचे आरोग्य व बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, जळकोटचे नगराध्यक्ष मन्मथप्पा किडे, विशेष कर्तव्य अधिकारी डॉ. ई. यू. मासूमदार, कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, डॉ. व्ही. व्ही. भोसले, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, प्रबंधक संतोष कांबळे, प्रा. जितेंद्र बनसोडे उपस्थित होते.

आ. बनसोडे म्हणाले,ग्रामीण विद्यार्थ्यांनी बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये मिळविलेले स्थान हे कौतुकास्पद आहे. त्यांनी या संधीचे सोने करून देशाच्या प्रगतीत आपले योगदान द्यावे, असे सांगून कॉक्सिटने मागील अनेक वर्षांपासून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात संगणकशास्त्राच्या रुपाने ज्ञानाचा दिवा लावण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच एकाच वर्षात तब्बल १२६ विद्यार्थ्यांना नामांकित आयटी कंपन्यांमध्ये मोठ्या पॅकेतजच्या नोकर्या मिळाल्या आहेत. डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात सर्व प्राध्यापकांनी घेतलेल्या परिश्रमाचे हे चीज आहे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समरोपात डॉ. एम. आर. पाटील म्हणाले, बहुराष्ट्रीय आयटी कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी सलग तीन वर्षे महाविद्यालयाच्यावतीने तयारी करून घेण्यात आली. कंपन्यांना हवे असलेलाच अभ्यासक्रम कॉक्सिटमध्ये शिकविला जातो. त्याचेच फलित म्हणजे म्हणून १२६ विद्यार्थ्यांच्या निवडी झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे फळ आहे, विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट जगतात संस्थेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. एस. अवस्थी यांनी कॉक्सिटने घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणजे एकाचवेळी १२६ विद्यार्थ्यांना नोकर्या मिळाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे यांनी केले.

अद्यापही विप्रो या कंपनीच्या वतीने घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीत निवड झालेल्या सुमारे ६०० विद्यार्थ्यांच्या निवडी जाहीर होणार असल्याचे महाविद्यालयाच्यावतीने सांगण्यात आले.